साप्ताहिक

# माणूस

१६ मार्च ८५/२ रुपये






## प्रभावी
## लोकशिक्षक

साप्ताहिक

माणूस

वर्ष : चोविसावे
अंक : बेचाळिसावा

१६ मार्च १९८५

किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी
साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्र इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

पत्ता :
साप्ताहिक माणूस,
१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
सुरेश नावडकर

## प्रभावी लोकशिक्षक

# डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

श्री. ग. मा.

डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांचे दि. ४ मार्चला पुणे येथे वृद्धापकाळामुळे व अल्पशा आजाराने निधन झाले.

गेल्या जून महिन्यात त्यांच्या वयाला ऐंशी वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने त्यांच्या एकूण वैचारिक कामगिरीचा परामर्ष घेणारा विस्तृत लेख 'माणूस' मध्ये यावा अशी त्यांच्या काही विद्यार्थ्यांची कल्पना होती. शेवटी डॉक्टरांचे सर्वात जवळचे व आवडते विद्यार्थी, प्रसिद्ध शेती-अर्थशास्त्रज्ञ प्रा. स. ह. देशपांडे यांनी ही जबाबदारी स्वीकारली व डॉक्टरांचे सर्व प्रसिद्ध वाङमय या निमित्ताने पुन्हा एकदा डोळ्याखालून घातले; डॉक्टरांशी या लेखासबंधी १।२ वेळा प्रत्यक्ष चर्चाही केली गेल्या वर्षीच्या १९८४ 'माणूस' दिवाळी अंकात हा विस्तृत लेख आलेला आहे. या लेखाचे स्वागतही वाचकांकडून चांगल्या प्रकारे झाले. या लेखात डॉक्टरांच्या विचारांबद्दल काही ठिकाणी मतभेद व्यक्त करण्यात आलेले असूनही डॉक्टरांना हा लेख आवडला. आपल्याच एका आवडत्या व जाणकार विद्यार्थ्याकडून, आपल्या विचारांचे तटस्थपणे झालेले परीक्षण-समीक्षण पाहणे, हा तसा एक दुर्मिळच योग म्हटला पाहिजे. आपण इतके लिहिले, भाषणे दिली, शेवटी या सगळ्याचे मोल काय, परिणाम काय, यातले किती टिकणार, अशी एक काळजी, खंत वैचारिक क्षेत्रात काही कामगिरी करू पाहणाऱ्यांना नेहमीच वाटत असते. सत्कार-समारंभ वगैरे झाले तरी ते तात्पुरते, औपचारिक स्वरूपाचे असतात. ही खत, ही रुखरुख त्यामुळे कमी होत नाही. असा एखादा समारंभ डॉक्टरांच्या ऐंशिव्या वर्षपूर्तीनिमित्त करताही आला असता. तसे डॉक्टरांचे सत्कार साठाव्या, सत्तराव्या वर्षपूर्तीनिमित्त त्यांच्या विद्यार्थ्यांकडून, ते ज्या संस्थेत शिकवत होते त्या शिक्षण प्रसारक मंडळीकडून पूर्वी झालेलेही आहेत. पण डॉक्टरांनीच आणखी अशा एका नव्या समारंभाला नकार दर्शवला— टि. व्ही. वर त्यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम जुळवून आणण्यासाठीही त्यांच्या विद्यार्थ्यांना–चाहत्यांना खूपच यातायात करावी लागली होती! घरी गेले की तास। दोन तास ते सहज व मन:पूर्वकतेने बोलत. पण बाहेरचे कार्यक्रम, लोकसंपर्क त्यांनी शेवटी शेवटी अगदी कमीच केला होता. म्हणून सत्कार, त्यातील भाषणे याऐवजी स. ह. देशपांडे यांनी डॉक्टरांच्या वैचारिक क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेणारा लेख लिहिण्याचे ठरवले; डॉक्टरांनाही हा पर्याय मनापासून आवडला. कारण त्यांचा बोलण्या-सांगण्यापेक्षाही लिहिण्यावर अधिक भर होता. अशी कामे नेहमी व्यक्ती दृष्टिआड झाल्यावर हाती घेतली जातात. डॉक्टरांचे हे एक भाग्यच की, त्यांना हे काम हाती घेतलेले, पूर्ण झालेले आपल्या डोळ्यांनी पाहता आले.

लोकशाही आणि राष्ट्रवाद या डॉक्टरांच्या मूलभूत निष्ठा. नवस्वतंत्र राष्ट्रातून लोकशाही राजवटी धडाधड कोसळताना पाहिल्यावर, व आपल्याकडील प्रचंड दारिद्र्य, अज्ञान, धर्मभोळेपणा, विषमता यांचे प्राबल्य पाहून, डॉक्टर लोकशाहीबद्दल कधीकधी साशंक व उदास होत, त्यांना या सर्व अनिष्टातून, थोड्या वेळात, देशाला बाहेर काढू शकणाऱ्या एखाद्या स्टॅलिनसारख्या लोहपुरुषाचे आकर्षणही वाटे. पण हे वाटणे, हा डळमळितपणा एकूण तात्पुरताच. राष्ट्रवाद या मूल्याबाबत मात्र असा तात्पुरता डळमळितपणाही डॉक्टरांच्या लिखाणातून–भाषणातून कधी डोकावताना दिसला नाही. त्यांनी मार्क्सवादासारख्या निखळ आंतरराष्ट्रवादाला सुसंगतपणे व ठोस विरोधच केला व राष्ट्रवाद हीच या काळातील प्रधान समाजजीवननिष्ठा कशी आहे, हे जगातील अनेक घडामोडींवरून पुन्हा पुन्हा दाखवून दिले. त्यांच्यावरचे मूळ संस्कार टिळकांचे. त्यांच्या पहिल्या–जुन्या घरी, ते लिहित असत त्या टेबलाच्या वरती भिंतीला जे एकमेव चित्र होते ते टिळकांचे; त्यांच्या नव्या घरी, ते बसत असत त्या पलंगाच्या मागे टिळकांचे एक मोठे छायाचित्र शेवटपर्यंत होतेच. खरं म्हणजे टिळकांनी जो राष्ट्रवाद, जो लोकशाही विचार-आचार मांडला, तोच वारसा डॉक्टरांनीही पुढे चालवला. आचार्य जावडेकरांनी टिळक आणि गांधी यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. तसे डॉक्टरांनी केले नाही. एकंदरीत गांधीजींना जरी ते ' महात्माजी ' म्हणत असले, त्यांच्याविषयी जरी एकप्रकारचा पूज्यभाव बाळगून होते तरी डॉक्टरांच्या टिळकविचारांचा सांधा गांधीयुगाशी, त्यातल्या अहिंसेशी–अध्यात्माशी शेवटपर्यंत जमलाच नाही. टिळकांचा निष्काम कर्मयोग डॉक्टरांनी जीवनभर आचरला; पण टिळकांचे अध्यात्म, गीतारहस्य त्यांनी दूरच ठेवले. पूर्वायुष्यात विज्ञानप्रणीत समाजरचनेचा डॉक्टरांनी पुरस्कार केला हे खरे आहे; पण उत्तरायुष्यात धर्मप्रेरणेचा डॉक्टर गंभीरपणे विचार करीत होते, हेही त्यांच्या आसपास वावरणाऱ्यांना जाणवत होते. ख्रिस्ती मिशनऱ्यांची श्रद्धा त्यांना स्तिमित करीत असे. रा. स्व. संघाशी त्यांचे मतभेद होते; पण वनवासी क्षेत्रात संघ स्वयंसेवक कार्य करीत आहेत हे पाहून त्याना बरेही वाटत असे–ते त्यांच्या घरी येणाऱ्यांजवळ–एखाद्या प्रकट कार्यक्रमात, अशा प्रयत्नांचे खूप म्हणजे खूपच कौतुकही करीत असत. नवे अनुभव, नवे ज्ञान पुढे आले की त्यातील तथ्य स्वीकारण्याची त्यांची नेहमी तयारी असे; ते हटवादी किंवा कर्मठ नव्हते. त्यांच्या प्रतिक्रिया उत्कट व तीव्र मात्र असत. त्यांनी जे जे ज्यावेळी केले ते टोकाला जाऊन, अगदी उत्कटतेने. पूर्वायुष्यात ईश्वराचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तो अगदी थेट हिमालयापर्यंत प्रवास करून, पर्वतीच्या टेकडीवर तासनतास चिंतनमनन – ध्यानधारणा करून. धर्म नाकारला तेव्हा एकही साधूसंत-महंत त्यांच्या जहरी टीकेतून, तीव्र उपहासातून सुटला नाही. स. प. कॉलेजमध्ये सोनोपंत दांडेकर व सहस्रबुद्धे एकाच काळात शिकवत होते. दोन टोकेच ही. पण दांडेकरांचा भलेपणा असा की, कधीही त्यांनी डॉक्टरांच्या विचारप्रदर्शनावर, वर्गात व वर्गाबाहेर, जराही आडकाठी केली नाही. लेडी रमाबाई हॉल डॉक्टरांच्या व्याख्यानांसाठी, व्याख्यानमालांसाठी सदैव खुलाच होता. वर्षानुवर्षे डॉक्टरांची ही व्याख्याने येथे होत राहिली–हॉल नेहमीच तुडुंब भरलेला. ऐकणारे केवळ विद्यार्थीच नसत. बाहेरचेही अनेक यायचे. विनामूल्य व्याख्याने – अशी शेकडो आवर्तने. विषय एकच – ' राष्ट्ररचना ! ' यात मग यशस्वी राष्ट्रनिर्मितीचे युरोपातील ते पाच कालखंड हटकून असणारच. पहिला कालखंड ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनाचा–रेनायसन्स ! यात डॉक्टर फार रंगून जात. कारण धर्म आणि निवृत्तीवादाच्या अंधारयुगाकडून युरोपला प्रवृत्तीच्या प्रखर सूर्यकिरणांकडे आणणारा हा आधुनिक युरोपचा जणू उषःकालच होता. पुढचे व्याख्यान रेफर्मेशनवर-धार्मिक सुधारणावादावर-ल्युथरवर ठरलेले. मग यायची फ्रेंच राज्यक्रांती–रूसो आणि व्हॉल्टेअरचे गुणगान. कोशकार, ग्रंथकार, लेखक यांनी या क्रांतीत फारच महत्त्वाची भूमिका बजावली होती. आणि ग्रंथ आणि ग्रंथकार हा तर डॉक्टरांचा श्रद्धाविषय ! त्यामुळे डॉक्टरांच्या रसवंतीला या वेळी अगदी बहर आलेला असायचा. ' टेल ऑफ टू सिटिज ' हा सिनेमा पाहिला नसल्यास पाहायला, डिकन्सची कादंबरी वाचली नसल्यास वाचायला ते आग्रहपूर्वक सांगत–यातील एखाद्या प्रसंगाचे वर्णन करीत. त्यामानाने पुढचे 'राष्ट्रवाद' आणि 'समाजवाद' हे विषय रंगत कमी. पण समारोप झाला की श्रोत्यांना जाणीव होई की अरे ! ही सुटी सुटी व्याख्याने नव्हती, हे एक कोरीव शिल्पच डॉक्टरांनी उभे केले आहे. अमुक विषय अमुक इतक्या शब्दात, वेळात संपायचा म्हणजे संपायचाच. त्यांच्या दृष्टीने निबंधरचना आणि राष्ट्ररचना ही एकाच मानसिक-बौद्धिक ठेवणीचे आविष्कार होते. जुन्या सरंजामशाही-धार्मिक युगात निबंधवाङ्मय संभवतच नाही. निबंधात्मक लेखनप्रकाराचा उदय अलिकडच्या बुद्धिवादी

कालखंडातला–त्यामुळे डॉक्टरांसारखा राष्ट्रवादी विचारवंत आणि त्यांची निबंधस्वरूप व्याख्याने हे रसायन अगदी एकजीव होत असे. विषयावरील प्रेम आणि अभ्यास या दोन्हीचा येथे मिलाफ होता. त्यामुळे श्रोतेही खिळून बसलेले असत. तास–दीड तास, अशा गंभीर विषयावर, टिळक रोड रंगत-तरंगत असताना, ऐन संध्याकाळी, तरुण विद्यार्थ्यांना, लेडी रमाबाई हॉलमध्ये खिळवून ठेवणे, ही किमया डॉक्टरच करू जाणे ! कशासाठी हा अट्टाहास डॉक्टरांनी वर्षानुवर्षे चालवला होता ? आजचा हा विद्यार्थी–उद्याचा हा नागरिक; याचेवरच संस्कार व्हायला हवेत. या देशात लोकशाही रूजायची, राष्ट्रवाद बळकट व्हायचा तर तो तरुणांच्या कानामनापर्यंत भिडायला हवा. असे राष्ट्रवादाच्या महामंत्राने भारलेले सहस्रावधी तरुण खेड्यापाड्यापर्यंत जेव्हा पोचतील, तेथे धर्मसुधारणा, विज्ञानवाद यांचे वारे जेव्हा वाहू लागतील, तेव्हाच हा देश एक वैभवसंपन्न राष्ट्र म्हणून उभा राहील. विद्यार्थी तरुणच हे कार्य करू शकतील, असे त्यांना वाटत असे. विद्यार्थी घडू शकतो, आपण तो घडवू, अभ्यास आणि प्रयत्न यांना अशक्य – असाध्य असे काही नाही, अशी त्यांची ठाम समजूत होती. त्यामुळे लेखन-व्याख्याने याशिवाय ते खास विद्यार्थ्यांसाठी दर आठवड्याला घरी अभ्यासवर्गाही घेत. यात अनेक ग्रंथांचे वाचन या 'खास' विद्यार्थ्यांकडून करून घेतले जाई–त्यावर चर्चाही होई. विद्यार्थ्यांना घेऊन सहलीला जाण्यात मजेपेक्षा-मोकळ्या वातावरणात हिंडण्याफिरण्याच्या मुक्त आनंदापेक्षा 'विद्यार्थी घडवणे' हाच उद्देश अधिक. सगळे कसे आखीव-रेखीव, मोजून-योजून ठरवल्यासारखे. शेवटच्या आजारात त्यांना, संगीत ऐका, जरा मनावरचा-बुद्धीवरचा ताण यामुळे हलका होईल असे डॉक्टरमडळींनी सहज सुचवले. लगेच डॉक्टरांनी टेपरेकॉर्डर वगैरे आणला व दिवसाकाठी दीड तास–सकाळी पाऊण तास आणि दुपारी पाऊणतास-ते संगीत श्रवणात घालवू लागले. मी एकदा नेमका दुपारी त्यांच्याकडे गेलो होतो. त्यावेळो त्यांचा संगीताचा हा तास–पाऊणतास चालू होता. नवीन जागेत-ब्लॉकमध्ये राहायला आल्यावर, शेवटची ४।५ वर्षे मात्र हे सगळे थांबले होते. त्यांच्यातला सगळा उत्साहच आटला होता. नवराष्ट्रधर्मप्रसारार्थ खेडोपाडी त्यांना अभिप्रेत असलेले विद्यार्थीसंघ पोचलेले दिसत नव्हते; त्यांनी जोपासलेल्या लोकशाही वृक्षाला अधुनमधून भलतीच विषारी फळेही लागत होती. त्यामुळे त्यांनी थाबायचे ठरवले असणे शक्य आहे. किंवा हा वृद्धापकाळाचा स्वाभाविक परिणामही असावा. काहीही असो. असे लोकशिक्षक आता दिसत नाहीत, हे खरेच आहे. 'शहाणे करून सोडावे। सकल जन' अशी प्रेरणा असणाऱ्या लोकशिक्षकांच्या मालिकेतील डॉक्टर हे बहुधा आपल्याकडचे एक शेवटचेच नाव ठरेल.

उद्याच्या कॉम्प्युटर युगात 'विज्ञानप्रणीत समाज' रचनेत अशा प्रेरणा असणाऱ्या व्यक्तीना काही स्थान असू शकते का ? □

---

दिनाक २२-७-७१

श्री. श्री. ग. माजगावकर यासी

स. न. वि. वि.

'माणूस'चा २४-७-७१ चा अंक मिळाला. 'म्हैसाळ गरिबी हटाव प्रकल्प' हा आपला लेख वाचला.

भावी क्रांतीचा हा खरा पाया आहे असे वाटते. श्री. काबळे व श्री. देवल यानी फार मोठया सामाजिक परिवर्तनाचा पाया घातला आहे असे वाटते. हल्ली युरोपात मिशनरी हे कार्य करतात. युक्रादला हेच कार्य करावे असे मी सांगत असे. विद्यार्थ्यांना वर्गात व इतरांना व्याख्यानांत याच धर्माचा उपदेश करीत असे; पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही.

पण हेच कार्य देवल यानी केले हे वाचून फार आनद झाला. वास्तविक संघाच्या हजारो स्वयसेवकानी हे कार्य करावयास हवे होते, हवे आहे. १९४२ साली नू. म. विद्यालयात 'अशा गोशाळा गावोगाव संघाने काढाव्या' असे मी ओ. टी. सी. कॅंपमधल्या स्वयंसेवकाना बरेच वेळा सांगितले होते; पण त्यावेळी हे कोणालाच मानवले नाही.

पण आज संघातल्याच एका स्वयंसेवकाने हे कार्य केले याबद्दल फार समाधान वाटत आहे.

मधुकर देवल याचे छायाचित्र पाहता त्याना मी ओळखतो असे वाटते.

अंक पाहताच सोसायटीला रु. ५० चा चेक पाठवून दिला आहे.

'माणूस'ने या कार्याला व प्रयत्नाला प्रसिद्धी दिली हे 'माणूस'च्या उद्दिष्टाला साजेसेच आहे. माणूसने अशा रीतीने फार मोलाचे कार्य चालविले आहे. परवा 'भूमिपुत्र' (अंक) वाचून हाच विचार मनात आला. म्हैसाळसारखे प्रकल्प जेथे जेथे असतील तेथे तेथे जाऊन त्याची माहिती अशीच नेहमी द्यावी. मागे एक-दोनदा एक–दोन गावची अशी माहिती माणूसमध्ये वाचल्याचे आठवते. संपादकाचे हेच खरे कार्य आहे. ते आपण करीत आहात याने धन्य वाटते.

– पु. ग. सहस्रबुद्धे

गाव तिथं पाणी आणि विहिर तिथं वीज ही परवाच्या विधानसभा निवडणुकीतील मुख्य घोषणा होती. वीज देऊ, पाणी देऊ अशा घोषणा देत, कित्येक वर्ष पुढाऱ्यांनी खेड्यातल्या लोकांना हुलकावण्या दिल्या. किती निवडणुका आल्या आणि गेल्या, किती विकास योजना तोंड दाखवून गेल्या. खेडी मात्र खेडीच राहिली. जास्त जास्त बकाल होत गेली.

पाण्या अभावी शेती बंद म्हणजे सगळंच बंद.

पाण्याअभावी कित्येक खेडी नामशेष झाली. रिकामटेकड्या व्यसनी लोकांचे अड्डे बनली.
हे बदलणार कोण ? सरकार ? सरकार पुरस्कृत विकास योजना ? स्वयंसेवी संस्था–संघटना ?
की गाव स्वत: ?

□

सांगवी–सांडस.पुण्याच्या अगदी जवळचं एक खेडं. विसाव्या शतकाचं कोणतंच वारं न लागलेलं. एकेकाळच्या वैभवाच्या, समृद्धीच्या आठवणीत रमणारं, पावसाच्या प्रतिक्षेत दिवस मोजणारं पाण्याअभावी गाव शुष्क झालं. काम–धाम संपलं. मोलमजुरीत मन लागेना, कोरड्या जमिनीकडे बघवेना. गावातल्या गड्यांचा वेळ चौकात जायला लागला. रिकामपणाचा रोग गावाला लागला. दारुची भट्टी जमायाला लागली. नाईलाजानं चोऱ्यामाऱ्याही सुरू झाल्या. शाळा बंद पडल्या, तरुण पोरं शहरात पळायला लागली.
गावाला अवकळा आली.

□

एक दिवस याच गावावरनं एका विकास योजनेचा चकवा गेला, लिफ्टचं वारं गेलं. गाव जागं झालं; पण एकदा सुरू झालेली लिफ्ट कायमची बंद पडली. माणसं कर्जात रुतली.

□

पण आज गाव बदलतंय–
गावात लिफ्टचं पाणी खेळतंय
गावात चैतन्य आलंय
शाळा मार्गी लागल्यात
भजनी मंडळं रंगताहेत
दारुचा रोग कमी झालाय

**हे झालं कसं ? केलं कोणी ?**
**– ग्रामायनच्या कार्यकर्त्यांनी**

# एका गावाच्या नवजीवनाची ही कहाणी
# माणूस

**यापुढील ‘ग्रामायन’ विशेषांकात**

# मुंबापुरी

## □ निकालानंतरचे रंग

विधानसभा निवडणुकांचे निकाल इतके नमुनेदार लागलेत की, राजकीय निरीक्षकांनी मांज्याला आस्ते–आस्ते ढील द्यायला सुरुवात केली आहे.

नवा नेता निवडण्यासाठी होणारी कांग्रेस (आय) विधीमंडळ पक्षाची बैठक काबळेसाहेबांनी दोनदा पुढे ढकलली. त्या दोन दिवसात राजकीय निरीक्षकानी किती नावं फ्लोट करावी ? सुधाकरराव नाईक अन् प्रभा रावपास्नं ते गेला बाजार विलासराव देशमुखांपर्यंत सगळी नावं आम्ही खुबीनं पेरली.

सुरुवातीच्या इंट्रोमध्ये वसंतदादा मुख्यमंत्री कसे होतील हे सागून टाकायचं. मग दोन प्यार्‍यानंतर वसंतदादा मुख्यमंत्री होण्यास कसा अतर्गत विरोध आहे हे सागायच. शेवटी माहितगार गोटांचा हवाला देऊन सगळी गोळाबेरीज करून मोकळं व्हायचं. आमचे थोर पत्रकार–मित्र चंद्रकांत देसाई कदाचित यालाच ' *उडाला तर कावळा बुडाला तर बेडूक* ' असं म्हणत असावेत.

आता साप्रत सगळयांचे लक्ष शरद पवारांकडे लागलंय. पवार काय (अन् काय काय) करतील या विषयी चहूकडे होष्यमाण वर्तवले जात आहे. येत्या तीन महिन्यात पवार काँग्रेस (आय) सरकार पाडून स्वत: सत्तारूढ होतील असा एक सूर आहे. काहीच्या मते पवार चंबुगबाळं घेऊन काँग्रेस (आय) मध्ये (म्हणजे ' स्वगृही ' ) जातील. दुसरीकडे, अशीही अटकळ आहे की, वसतदादा स्वत:च आपल्या सौंगड्यांसह काँग्रेस (आय) शी काडीमोड घेऊन विधानसभेत अत्यत शालीन सौजन्याने आपला वेगळा गट घेऊन बसतील अन् पर्यायाने पवारांना पाठिंबा देतील. थोडक्यात काय, पवार इज द टॉक ऑफ द टाऊन !

परवा, पवारानी ' सारंग 'वर पत्रकार परिषद घेतली. आता पवार म्हणजे मुंबईच्या प्रेसचे ' ब्लू आईड बॉय ' आहेत. बाणेदार प्रश्नही शक्य तेवढ्या अजिजीच्या स्वरात विचारले जातात. तरीही, परवाच्या प्रेस *कॉन्फरन्समध्ये आमच्या यु. एन. आयच्या* नाईकांनी सुरेख प्रश्न विचारला. कांग्रेस (आय) मध्ये जाणार का, वसंतदादा पाटलांचं नवं सरकार पाडणार का अस बरंच चर्वितचर्वण झाल्यावर नाईकानी आपला गुगली टाकला. ' महाराष्ट्राला स्थिर विरोधी पक्ष द्यायला हव असं आपल्याला वाटत नाही का ?' पवाराच्या दिलखुलास हास्यात या प्रश्नाचं उत्तर मिळालं नाही, हे मात्र खरं.

असो. पवारांचा विजय दैदिप्यमान तर खास नाही. पण त्यांच्या एकशेचार जागांमुळे सत्ताधीशांना थोडासा का होईना पण अकुश राहील असं वाटते. आता महाराष्ट्राच्या राजकारणाला कोणता रंग चढतो. (अन् कसकसा ) तेवढं पाहात राहायचं. एरवी, सगळं कस भणग अन् रंगहीन वाटतंय ऐन वसंतात.

## □ फर्नांडिस–काय नेम ?

*जॉर्ज फर्नांडिस यानी परवा* मुंबई मराठी पत्रकार सघात वार्ताहर परिषद बोलावून खलिस्तानची मागणी करणाऱ्या शिखांशी आपला काहीही सबंध नसल्याचे जाहीर केले, याचा आम्हाला परम संतोष झाला. खुद्द आम्हालाही शीख लोक असा मूर्खपणा करणार नाहीत याची खात्री होती. पण जॉर्जचा काय नेम ? ते हाडाचे समाजवादी आहेत !

लडनमध्ये जॉर्जनी जगजितसिंग चौहान यांची भेट घेतली असा पंतप्रधान राजीव गांधीनी आरोप केला होता. त्याला उत्तर म्हणून फर्नांडिस म्हणाले की, उलट जनता पक्षाच्या कारकिर्दीत चौहान भारतात आले आणि जनता पक्षाचे सरकार पाडण्याबाबत त्यानी इंदिरा गांधीबरोबर चर्चा केली. आतापर्यंतची आमची समजूत, केन्द्रातील जनता सरकारचा पाडाव हे जॉर्ज, मधू लिमये, राजनारायण यांसारख्या तत्त्वनिष्ठ समाजवादी नेत्यांच्या परिश्रमाला आलेले फळ आहे, अशी होती. परतु विरोधी पक्षांची इतकी खंबीर एकजूट चौहान याच्या प्रयत्नामुळे मोडकळीस यावी याचे आम्हाला भारी वाईट वाटले, असो.

काँग्रेस आयचे जनरल सेक्रेटरी श्रीकांत वर्मा यानी तर जॉर्जने खलिस्तानवादी नेत्यांबरोबर भांगडा नृत्यात भाग घेतला असाही आरोप केला हे नृत्य अतिशय कठीण असते. त्याला सातत्याची आवश्यकता असते. त्यामुळे जॉर्जने त्यात भाग घेतला असेल असे आम्हाला वाटत नाही. उगाच वाट्टेल ते आरोप करायचे म्हणजे काय ?

एक मात्र खरे की, जनता पक्षाचे सरकार गेले तरी अजूनही फर्नांडिसना देशाच्या परराष्ट्रीय धोरणास आकार देण्याची इच्छा प्रबळ आहे. मागे बहुगुणांबरोबर पाकिस्तानला जाऊन त्यांनी झियांची भेट घेतली आणि परत आल्यावर झिया किती उत्तम प्रशासक आहेत आणि त्यांच्या अधिपत्याखाली पाकिस्तानात कशी आबादीआबाद आहे याची रसभरित वर्णने पत्रकाराकडे केली. आता याच उत्तम प्रशासकाच्या सात मंत्र्यांचा पाकिस्तानातील लोकांनी सार्वत्रिक निवडणुकीत पराभव केला. झियानी लष्करी बळावर पाकिस्तानातील लोकशाहीचा पोरखेळ करून ठेवला आहे, हे दिसत असतानाही त्याचे गोडवे गाण्याची जनता पक्षाच्या नेत्यांना का बरे गरज भासावी ?

फर्नांडिस पत्रकार परिषदेतही परळच्या कामगार मैदानात भाषण करीत असल्या प्रमाणे बोलतात. पंतप्रधानानी जाहीर आरोप केल्याने सात्विक संतापाने त्याची भाषा शिवराळ व्हावी हे आम्हाला समजू शकते; परंतु राष्ट्रीय पातळीवरच्या पक्षाच्या नेत्याची भाषा ही गल्लीबोळात पुढारीपण गाजवणाऱ्या नेत्यासारखी नसावी हेही तितकेच खरे.

लंडनला गेल्यावर खरोखरच फर्नांडिस खलिस्तानवादी नेत्यांना भेटले आणि त्यानी पंजाबच्या प्रश्नावर चर्चा केली की नाही हा वादाचा मुद्दा आहे. तशी ती केल्याने, केवळ ते विरोधी पक्षाचे आहेत, या कारणाने त्यांच्या देशभक्तीबद्दल जाहीर शंका घेतली जावी की नाही, हा देखील वादाचा मुद्दा ठरू शकतो.

पण जॉर्जसाहेबांना आमचा एक प्रेमाचा सल्ला आहे. सिझरच्या बायकोचे चारित्र्य केवळ शुद्ध असून भागत नाही तर तसे ते दिसावेही लागते असे म्हणतात. ' इश्श ऽ ! इतकी काय मेली काळजी घेत बसायचं !'

अशी जर भूमिका तिने घेतली तर त्यामुळे सिझरची फारच पचाईत होईल. फर्नांडिस साहेब, तुमचे काय म्हणणे आहे ?

### ☐ अचानक साक्षात्कार ?

पत्रकारसघात झालेली दुसरी महत्त्वाची प्रेस कॉन्फरन्स म्हणजे विद्याधर बुडबाडकर यांची. त्यानी ऐन युद्धाच्या धुमश्चक्रीत दत्ता सामंतांच्या कामगार आघाडीचा त्याग केला. पण सामंतांनी युद्ध जिंकले. बुडबाडकर म्हणजे सामतांचे उजवे हात. (आणि हाताचे सामर्थ्य आम्ही काय वर्णावे ?) मुबापुरीत गेली दोन वर्षे चाललेल्या गिरणी कामगाराच्या संपात कामगारांना एकत्र ठेवण्यात बुडबाडकरांनी मोठ्या हिरीरीने पुढाकार घेतला होता. त्यामुळे या पत्रकार परिषदेला चागलीच गर्दी लोटली होती.

आता या पत्रकार परिषदेबद्दल आम्ही निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यावर लिहित आहोत, त्यामुळे त्यात उशिरा सुचलेले शहाणपण आहे असे तुम्ही म्हणाल. त्याला इलाज नाही. आधी वेळ झाला नाही म्हणून आता.

बुडबाडकरांनी सामंतांची युनियन सोडण्याचा निर्णय जाहीर केला तेव्हा आता कामगार आघाडीची विजयाची आशा सपुष्टात आली असे पत्रकारांनी भाकित केले. निवडणुकांच्या बाबतीत भाकिते सहसा खरी ठरत नाहीत. हवे तर 'इडिया टुडे'च्या प्रणय रॉयना विचारा.

बुडबाडकरानी सामतांवर टीकेची झोड उठवली. सामंतानी कामगार चळवळीत घराणेशाही आणली. महिनो न् महिने सप चालवून हजारो कामगाराचे नुकसान केले असे त्याचे म्हणणे होते. आम्ही बुडबाडकरांशी सहमत आहोत. मात्र इतकी वर्षे सामंताच्या छायेखाली तपःश्चर्या करून त्यांना जो साक्षात्कार झाला नाही तो अचानक निवडणूक ऐन तोडावर आली असताना कसा झाला याचे मात्र आम्हाला आश्चर्य वाटले.

कामगारांनी मात्र बुडबाडकराचे म्हणणे फारसे मनावर घेतलेले दिसत नाही. परळ, शिवडी आणि वरळी ह्या कामगार विभागांतील मतदारसघात आघाडीचे उमेदवार निवडून आले. वरळीहून चक्क सामतांच्या पत्नी विनिता सामंत निवडून आल्या.

आपण आघाडीतून बाहेर पडलो तरी कामगार आघाडीचे टी. एस्. बोराडे यांच्या उमेदवारीला आपला पाठिंबा आहे असे बुडबाडकरानी जाहीर केले होते. बोराड्याचा मात्र पराभव झाला.

—विष्णु जयदेव

---

'मॉडरेट' चित्र

## विधानसभा निवडणूक

अॅड. रमन देशपांडे

---

निवडणुका झाल्या, निकाल लागले, मुख्यमंत्रीपदाचे गोंधळ इत्यादी कवित्वही झाले. आकडेवारी, तुलना, विश्लेषणांना बहर आला आणि ओसरला. खरच या निवडणुकात नेमक काय घडलं हे तपासणं या सर्वांपेक्षा जास्त महत्त्वाचे आहे.

सर्वसाधारणपणे महाराष्ट्र हा कायमस्वरुपी सत्तारूढ कॉंग्रेसच्या मागे असतो. सुमारे ३० ते ३५ टक्के अशी हमखास म्हणून कॉंग्रेसची परपरागत मते असतात. अर्थातच याच्याबरोबरीने उमेदवाराचे व्यक्तिमत्त्व, मतदार सघातील काम, इतर 'पुण्याई' व विरोधी उमेदवाराची प्रतिमा हे घटक कार्यरत असतात. मनमानी व पक्षपातीपणाने उमेदवाराची निवड झाल्यास कार्यकर्ते स्वस्थ रहातात, एवढेच नव्हे तर जनताही त्याना झुगारून देते हे या निवडणुकात अतिशय स्पष्ट झाले आहे चिमणराव कदम, तनपुरे, पतगराव कदम, संजयसिंह गायकवाड अशा सुमारे १० बडखोराचे विजय याची साक्ष देतात. एवढेच नव्हे तर कॉंग्रेस (आय)ने ज्यांना तिकिटे नाकारली व कॉंग्रेस (एस्)ने ज्याना दिली असे सुरेश जैन, विक्रमसिंग पाटणकर व सदाशिव मडलीक हे माजी आमदारही सहजपणे निवडून आले.

कॉंग्रेस (आय) पक्षांतर्गत साखर–सम्राट व जिल्हा सुभेदारांचे वर्चस्व संपविण्याचा कॉंग्रेस (आय)ने जो एक देखावा केला होता तो अशा रीतीने फोल ठरला. एवढेच नव्हे तर सूर्यभान गडाख, यशवंत पाटील इत्यादींनी बंडखोरी केल्यामुळे किमान १० जागा 'पुलोद'ला मिळाल्या. पक्षाची नवी प्रतिमा निर्माण करण्याच्या प्रयत्नात स्वतःचे घर तो जेमतेम वाचवू शकला प्रचार कार्यक्रम व नेतृत्वाची एकसंध फळी उभी करून एक आशादायी वातावरण व चित्र उभे न करता आल्यामुळेच सत्तारूढ पक्षाचे हे बळ एवढे घटले. तिकिट वाटपातील 'नाट्यमय' उशीर व कार्यकर्त्यांना विश्वासात न घेतल्यामुळेच हा परिणाम झाला. परंपरागत पश्चिम महाराष्ट्रातून १११ पैकी जेमतेम ५१ जागा कॉंग्रेस (आय)ला मिळाल्या. मुबईने ३४ पैकी २७ जागा पदरात देऊनच जरा धीर वाढवला; पण सर्वसाधारणपणे शहरी भागात सर्वत्रच कॉंग्रेस (आय)ला चागल्या जागा मिळाल्या विरोधी पक्षाना सहानुभूती दाखवणाऱ्या मध्यमवर्गावरील राजीव गांधींच्या प्रतिमेची पकड अद्याप तितकीशी सैल झालेली नाही हे खरे.

विखुरलेले विरोधक या नेहमीच्या चित्रापेक्षा वेगळे असे वातावरण यावेळी महाराष्ट्रात होते.

प्रमुख विरोधी पक्षाची 'पुलोद'बाबत एकवाक्यता, शरद पवाराची भावी मुख्यमंत्री म्हणून घोषणा आणि १५ कलमी कार्यक्रम यामुळे पुलोदची 'हवा' निर्माण व्हायला सोपे झाले. शरद पवारानी बारामतीतून अर्ज भरून वातावरण तापवले शरद पवार हे कॉंग्रेसच्याच मुशीतून घडलेले व्यक्तिमत्व ! ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी या नीतीने त्यानी कॉंग्रेस (आय)ला जंग जंग पछाडले. विदर्भ वगळता मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात 'पुलोद'ला पाठिंबा मिळाला तो शरद पवारांच्या प्रतिमेमुळेच ! प. महाराष्ट्रात ६० जागा जिंकून 'पुलोद'ने चागलीच आघाडी घेतली. कॉंग्रेस (स)चे ५६ आमदार निवडून आले व मुबई वगळता सपूर्ण महाराष्ट्रात त्यानी पुरेसे काम व नाव असल्याचे दाखवून दिले. ८० निवडणुकात कॉंग्रेस (स)चे फक्त ४७ आमदार आले व त्यांपैकी बहुसख्य कॉंग्रेस (आय)ला मिळाले. या पार्श्वभूमीवर हा विजय निश्चितच महत्त्वाचा आहे मुबईत कामगार आघाडी व व दोन्ही कम्युनिस्ट पक्षाशी जर यशस्वी समझोता झाला असता तर किमान १५ जागा

पृष्ठ ३२ वर

ह्या ना त्या निमित्ताने....

# चेहरे आणि मुखवटे

फिरोझ रानडे

'ह्या चेहऱ्यानी आणि मुखवट्यानी तर अगदी उच्छाद मांडलाय. आता हेच बघ.'

'अहो, चेहरे आणि मुखवटे नाही काही.' श्यामचे सांगणे पुरे होण्याआधीच त्याला काटून टाकत राधा म्हणाली, 'दूरदर्शनवर अहो तो कार्यक्रम 'मुखवटे आणि चेहरे' असा आहे.'

राधाचे म्हणणे अगदी बरोबर होते· दूरदर्शनवर भारभार कार्यक्रम होत असतात. त्यातले काही लोकांना आवडतात तर काही अगदी टाकावू वाटतात. आवडणाऱ्या कार्यक्रमाचे वेळी पुष्कळ लोक आवर्जून घरी रहातात व तो तो कार्यक्रम बघतात. असाच बहुतेकाच्या आवडीचा कार्यक्रम म्हणजे 'मुखवटे आणि चेहरे' हा आहे. श्याम व राधाही हा कार्यक्रम मोठ्या आवडीने पहातात.

हा कार्यक्रम तसा साधा असतो. कोणातरी नाटकातल्या वा सिनेमातल्या गेल्या काळातल्या मान्यवर व्यक्तीला आमंत्रित केलेले असते. त्याना त्याच्या कलाजीवनाबद्दल प्रश्न विचारले जातात, माहिती मिळवली जाते. बहुतेक आमंत्रित व्यक्ती त्या त्या क्षेत्रात पुष्कळ वर्षे कामे केलेल्या असल्यामुळे कार्यक्रमाला घनता येते व काही तरी चागले बघितल्याचे समाधान वाटते.

बाकी पुष्कळ लोकाप्रमाणे राधा-श्यामचाही हा एक आवडता कार्यक्रम होता. म्हणून श्यामने 'चेहरा आणि मुखवटा' म्हटल्याबरोबर त्याची चूक काढायला मिळाली ह्याचा आनद व आपल्या एवढ्या आवडत्या कार्यक्रमाचा चुकीचा मथळा सांगितल्याबद्दलचा राग, अशा रागानंदाच्या मजेशीर मिश्रणात राधा श्यामचे वाक्य काटून टाकत म्हणाली होती,

'अहो, चेहरे आणि मुखवटे नाही काहो. दूरदर्शनवर असतो तो 'मुखवटे आणि चेहरे.'

'अग बाई, मी काही दूरदर्शनच्या त्या कार्यक्रमाबद्दल बोलत नाही आहे. हे बघ आज कोणीतरी हे काय आणून दिले आहे ते.'

लोकसभा निवडणुका होऊन गेल्या होत्या. आता विधानसभेच्या निवडणुका होऊ घातल्या होत्या. अर्थात ह्या निवडणुकांचा आवाका फार लहान होता. जसं एखाद्या घरात प्रथम मोठ्या बहिणीचे लग्न असावे व नंतर धाकट्या भावाची मुंज असावी तसे आत्ताचे वेळी झाले होते. खरं म्हणजे दोन्ही शुभ–कार्यंच; पण मुलीचे लग्न म्हणजे मोठा खर्च, वराच्याकडल्या लोकाचे मानापमान वगैरे गोष्टी. त्यामानाने मुंज म्हणजे सगळे घरचेच लोक.

तशी आता राज्यात राजकीय मुंजीची तयारी चालली होती. गावात पताका व भित्तीपत्रके लागली होती; पण आता देशाच्या ऐक्याकरता, वगैरे मते मागितली जात नव्हती तर त्या भागात पाण्याची व्यवस्था करण्याकरता, बाग–बगिचे लावण्याकरता वगैरे करता आता मताची विनती केली जात होती.

विनंती करण्याचे अनेक प्रकार होते. दैनिकातून अर्ध्या–अर्ध्या पानाच्या जाहिराती दिल्या जात होत्या. राजीवजीचे व राजीवमातेचे रंगीत छायाचित्र असलेल्या भित्तीपत्रिका जागा मोकळी सापडेल तेथे लावल्या जात होत्या. राजीवजीच्या व माताजीच्या चित्राबरोबर स्थानिक पक्षीय उमेदवाराचे छायाचित्र असलेल्या भित्तीपत्रिका पण लावल्या जात होत्या आणि आज कोणीतरी कोणा उमेदवाराचे विनंती कार्ड आणून दिले होते. त्या कार्डावर मतदानाची तारीख होती, पक्षाची नाव–निशाणी होती व मुख्य म्हणजे उमेदवाराचे छोटेसे छायाचित्र पण होते.

श्यामच्या म्हणण्याप्रमाणे राधा त्याच्याजवळ आली व त्याच्या हातातून कार्ड घेऊन पाहू लागली.

राधाने ते कार्ड काळजीपूर्वक वाचले, उलट-सुलट करून पाहिले; पण तिला त्यात वावगे असे काही वाटले नाही.

'काय विशेष आहे ह्या कार्डात ? सगळेच अशी कार्डे काढतात व पाठवतात.'

'नीट पहा !' श्यामचा हेका चालूच होता. राधाने कार्ड नीटपणे परत एकदा पाहिले. ते कार्ड तिच्या नावाचेच होते. नाव बरोबर होते, पत्ता बरोबर होता, वय बरोबर होते, अगदी सेक्सपण बिनचूक लिहिलं होतं. आता कदाचित विभाग नंबर व क्रमाक बरोबर नसेल पण तो काय निवडणुकीच्या दिवशी बूथवर जाऊन पहाता आला असता. त्याच्याकरता श्यामने आता मुखवटे व चेहऱ्यावर भडकण्याची गरज नव्हती. तेव्हा ती निष्पापपणे म्हणाली.

'मला तर काही चुकीचे वाटत नाही आहे ह्या कार्डात.'

'अग, ह्या कार्डावरसुद्धा त्या उमेदवाराचे छायाचित्र छापले आहे !' श्याम रागाने म्हणाला.

राधाने त्या विनती-कार्डावरचे छायाचित्र परत एकदा पाहिले. दहा जणासारखाच तो उमेदवार होता. मध्यम वयाचा वाटत होता. केसाची पद्धत थोडी अमिताभ बच्चनसारखी होती; पण त्यात आजकाल राग येण्यासारखे वा काही कमीपणाचे मानले जात नव्हते. डॉक्टर, वकील, पोलिस अधिकारीसुद्धा अशा पद्धतीचे केस ठेवत होते. थोडक्यात म्हणजे ज्याना टक्कल पडले आहे ते सोडून बाकी सगळे अमिताभ–पद्धतीचे केस ठेवत होते. श्यामच्या रागाचे ते कारण असावे असा राधाने अंदाज केला

'अहो केसाच्या पद्धतीवरून आता चिडून

कसे चालेल. आता अमिताभ नुसता अभिनेता राहिला नाही आहे, नेता झाला आहे. आज-काल सगळे, म्हणजे ज्यांना टक्कल पडले आहे वा ज्यांचा भालप्रदेश मोठा होत चालला आहे ते सोडून सगळे आजकाल असे केस ठेवतात.' राधा श्यामच्या दिवसेंदिवस भव्य होणाऱ्या कपाळाकडे पहात मोठ्या खडूसपणे म्हणाली.

'मी त्याकरता व त्या मत्सराने काही म्हटले नाही. तू माझे म्हणणे तर ऐकून घे!' राधाने आपल्या चागल्या वृत्तीने बोलण्याला मत्सरवृत्तीचे बोलणे समजावे ह्याचे त्याला वाईट वाटले.

'मला आता खरंच वेळ नाही आहे हो. सकाळच्या वेळी तुम्हाला हे सगळे कसे सुचते हो? मला अजुनी कुकर लावायचा आहे, पोळ्या करायच्या आहेत!' असे म्हणून राधा स्वैपाकघरात गेलीसुद्धा.

आता श्याम एकटाच होता. त्यामुळे त्याला मनाशी विचार करण्याशिवाय काही करण्यासारखे राहिले नाही. म्हणून तो मनाशी विचार करू लागला.

पूर्वी असे होत नव्हते. पूर्वी उमेदवार कोणत्या पक्षाचा आहे? त्याची पत काय आहे? जात काय आहे? 'आपल्या'तला आहे की 'परक्या' तला आहे वगैरे गोष्टी पाहिल्या जायच्या; पण तो दिसायला कसा आहे हे कोणी विचारतही नसे व सागतही नसे.

मुबईत स्वातंत्र्यानतर पहिल्या-पहिल्या निवडणुका झाल्या त्यात स. का. पाटील, कृष्णा मेनन, डॉ. आंबेडकर, स. गो. बर्वे वगैरे नामवत मडळी उमेदवार होती. त्या वेळी ह्या उमेदवारांची वा त्याच्या पुढाऱ्याची छायाचित्रे प्रसिद्ध झाली नव्हती. आता हे खरे आहे की, कृष्णा मेननचे छायाचित्र छापून मते मिळण्याऐवजी मते गमावण्याचीच जास्त भीती होती; पण डॉ. आंबेडकर, स. का. पाटील वा स. गो. बर्व्यांबद्दल तशी भीती वाटण्याचे कारण नव्हते.

स. का. पाटील म्हणजे मुबईचा अनभिषिक्त राजा समजले जायचे. कोकणातला हा साधा शाळा-मास्तर कुठल्या कुठे पोहोचला होता. त्याची सगळीच मते वा सगळ्या कृती पटल्या नाहीत तरी एक कर्तृत्ववान मराठी माणूस म्हणून सर्वांना त्याचेबद्दल अभिमान वाटे. त्याचे व्यक्तिमत्त्व पण फार रुबाबदार होते; पण त्याची कोणी खास पर्वा केली नाही, महत्त्व दिले नाही.

तसेच आपले चितामणराव देशमुख! किती भव्य व बुद्धिमान व्यक्तिमत्त्व होते त्यांचे, व चेहराही किती प्रसन्न व शांत होता. पण त्या बुद्धिमान व्यक्तिमत्त्वापेक्षा ते रिझर्व बँकेचे पहिले हिंदी गव्हर्नर होते. विमा योजना त्यांची ह्याबद्दल लोकाना आदर होता व म्हणून ते निवडून आले होते. त्याचे व्यक्तिमत्त्व चागले नसते, ते जाडे, काळे, बुटके असते तरी त्याना एकही मत कमी पडले नसते.

पाटील, देशमुख दोघेही खासदार होते. ते मोठ्या मतांनी निवडून येत असत. त्यानीही निवडणूक प्रचार केला होता, त्याच्याही भित्ती-पत्रिका जागोजागी लावल्या गेल्या होत्या; पण त्यांचीच नव्हे तर सरदार पटेल, गोविंद वल्लभपंत अगदी पडित नेहरूंची छायाचित्रे असलेल्या भितीपत्रिका कधी लावल्या गेल्या नव्हत्या.

मग ही पद्धत सुरू कधी झाली व इतकी बोकाळली कशी? आता तर फक्त कॉंग्रेस (आय) पुढाऱ्यांची नव्हे तर बाजपायी, चद्रशेखर, शरद पवार वगैरे विरोधीपक्षाच्या पुढाऱ्याची छायाचित्रेसुद्धा मोठ्या प्रमाणात लावली जातात. व्यक्तिपूजेची ही अगदी परमावधी आहे नाही?

सोवियेट रशियातून हिंदुस्थानात पुष्कळ वाईट-साईट गोष्टी आल्या. त्यातली सगळ्यात वाईट जर कोणती असेल तर पुढाऱ्याची मोठी-मोठी छायाचित्रे लावण्याची, त्याचे प्रदर्शन करण्याची पद्धत. रशियापासून ती पद्धत पूर्व युरोपातल्या देशांनी घेतली. तशीच अफगाणिस्तान वगैरे देशांनीही घेतली. आज-काल 'तिसऱ्या' जगताच्या सर्व देशात ही पद्धत बोकाळू पहात आहे.

हिंदुस्थानात ही पद्धत इंदिराजीनी आणली, राबवली व यशस्वी करून दाखवली. त्यामुळे बाकीच्यानाही मागे रहाणे शक्य झाले नाही आपण 'आननी' कसे दिसतो हे लोकांना दाखवण्याची हौस राष्ट्रीय पुढाऱ्यात वाढली, मग प्रातिक, मग जिल्हा पुढाऱ्यात! आता तर साखर कारखान्याच्या अध्यक्षांची व चिटणीसाची आनने वार्षिक हिशोबाबरोबर वर्तमानपत्रात छापली जातात!

स्वत:चा फोटो-छायाचित्र छापून घेण्यात ह्या लोकाना काय मोठे सुख वाटत असेल, आनंद वाटत असेल बुवा! असा प्रश्न श्याम पुढे उभा राहिला

तेवढ्यात त्याच्या घराच्या दारावरची घंटी वाजली. लवालवा जाऊन राधाने दार उघडले. पोस्टमन आला होता.

त्याने दिलेले पत्र वाचून राधा मोठ्या आवाजात म्हणाली,

'अहो तुम्ही आपल्या संघाच्या दादर-शाखेचे अध्यक्ष म्हणून निवडून आला आहात ना? संघ आता एक स्मरणिका प्रसिद्ध करणार आहे. त्याकरता तुमची माहिती व छायाचित्र म्हणजे फोटो मागवला आहे. त्या स्मरणिकेत छापायचा आहे म्हणे.'

राधाच्या बोलण्यात फार मोठा आनंद व अभिमान नुसता ऊतू जात होता

'अरे वा! छान कल्पना आहे स्मरणिका छापण्याची.' श्यामने राधाच्या हातातून पत्र घेतले, वाचले व म्हणाला, 'अग माझी आणि माझ्या कार्याची माहिती मागवली ते ठीक आहे, पण हे फोटोच प्रकरण काय आहे? तो फोटो आणखी कशाला?'

'वा, वा, असं कसं, माहितीबरोबर फोटो पाहिजेच.' राधाने श्यामच्या मनात फोटोबद्दल काही अमगळ विचार येण्याआधीच त्याना मोडता घातला. मेला तुमचा चांगला फोटोपण नाही आहे घरात. आता असं करा कचेरीतून येतायेता फोर्टमधल्याच कोणा चागल्या स्टुडिओतून एक चागला फोटो काढून घ्या. थोडे जास्त पैसे पडले तरी हरकत नाही.'

'अग पण... माझा चागला फोटो येत नाही.' खरं म्हणजे आपली माहिती छापून येणार त्याचबरोबर आपला फोटोपण छापून येणार म्हणून श्याम अगदी हबकून गेला होता; पण फार उतावळेपणा दिसू नये म्हणून त्याचं 'अग, अग, म्हशी' चाललं होतं.

'चांगला फोटो न यायला काय झालं? चागले पैसे दिले की चागला फोटो येतो. तुमचा असा उजव्या बाजूने जरा तिकडे बघताहात असा फोटो किती रुबाबदार येईल.' आता राधानेच त्याचा रुबाबदार फोटो येईल म्हटल्यावर आपण खरंच रुबाबदार आहोत ह्यावर श्यामचा विश्वास बसला. त्या विश्वासातच तो म्हणाला,

'अग मग संध्याकाळी फोटो कशाला? आत्ताच आघोळ करून फ्रेश दिसतो आहे तोवर कचेरीत जाण्याआधीच फोटो काढून घेतो.' व घाईघाईने बाथरूमकडे पळाला.

'ह्यांना चटकन माझं म्हणणं पटलं हे नशिबच म्हणायच. मला भीती होती की काही खुसपट काढतात की काय.' राधा घाईघाईने बाथरूमकडे जाणाऱ्या श्यामकडे बघत म्हणाली.

श्यामने राधाचे म्हणणे तर ऐकले नाहीच पण काही वेळापूर्वी आपण ह्या चेहऱ्या व मुखवट्याबद्दल राग व नाराजी दाखविली होती हेही तो विसरून गेला होता. □

# करवाढीपेक्षा कर्जवाढ सोपी असते

प्रा. ज. वि. देशपांडे, मुंबई

निवडणुकीनंतर राजीव गांधीनी नवे मंत्रिमंडळ बनविले त्याच सुमारास त्यांनी योजना मंडळातही नवी माणसे नेमली व रिझर्व बँकेचे गव्हर्नर मनमोहन सिंग यांना योजनामंडळाचे उपाध्यक्ष नेमले. पूर्वीही ते योजनामंडळात सचिव म्हणून काम करीत होतेच स्वराज पॉल याचे बेकायदा व्यवहार, लंडनचे सेठिया याना दिलेली प्रचंड कर्जे ह्या गोष्टी मनमोहनसिंग रिझर्व बँकेचे प्रमुख असतानाच झाल्या. असो. सहाव्या योजनेची मुदत आता संपत आली असून लौकरच सातवी पंचवार्षिक योजना सुरू होत आहे. व त्याचे तपशील आता ठरवावयाचे आहेत. त्यामुळे योजना मंडळास सध्या विशेषच महत्त्व आहे.

एक एप्रिलपासून नवी योजना सुरू करावयाची असेल तर त्याचा निदान आराखडा तरी आता बाहेर पडला पाहिजे; परंतु त्याबद्दल काही जुजबी माहिती आता आता प्रसिद्ध होऊ लागली आहे त्यावरून सातव्या योजनेमुळे काय काय घडणार आहे हे सागणे जरा धाष्टर्याचेच होईल नव्या योजनेबद्दल सरकारचे काय विचार आहेत याचा जरा अंदाज करता येईल इतकेच. योजनेची ध्येये व उद्दिष्टे काय आहेत, ती पुरी करण्यासाठी किती पैसा लागेल व तो कसा उभा करणार व या योजनेमुळे देशात, समसजात काय फरक पडेल, लोकाच्या गरजांच्या मानाने योजना किती पुरी पडेल हे पाहिले पाहिजे; परंतु या घटकेला, नव्या योजनेला एकूण खर्च किती आहे व त्यासाठी लागणारा पैसा उभा करण्याची सरकारची काय योजना आहे यावद्दल काही माहिती उपलब्ध झाली आहे.

योजनेबाबत राजीव गांधीची दोन व्यक्तव्ये प्रसिद्ध झाली आहेत. एक म्हणजे योजनेचा पसारा न वाढविता, खर्चिक, बिनफायद्याचेच उपक्रम सध्या बाजूला ठेवून फक्त महत्त्वाच्या, फायदा सुटणाऱ्या प्रकल्पांच्या मागे नेटाने लागून ते आधी पुरे करावेत. त्यानी दुसरे असेही म्हटले आहे की, योजनेत काटछाट होणार नाही. योजनेतील काही प्रकल्प मागे टाकले म्हणजे योजनेत काटछाट झालीच. मग हे कसे ? योजनेवरील एकूण खर्चात काटछाट करू नये असे बहुधा राजीवच्या मनात असावे, देशाची सर्व शक्ती महत्त्वाच्या प्रकल्पांवर केंद्रित करून ते आधी पुरे करावेत. हा खरा योग्यच मार्ग आहे; पण तसे करण्यासाठी राजकीय धैर्य लागते. पाचव्या योजनेच्या काळात इदिराजीनी फक्त उत्तर प्रदेशमध्ये एका वर्षातच सुमारे ८५ प्रकल्पाच्या कोनशिला बसविल्या. (आज त्यातले अनेक दगडही चोरीला गेले आहेत) राजीव देशाला काही धडा घालून देणार असतील तर ती मोठीच सुधारणा होईल.

सातव्या योजनेत सरकारी क्षेत्रातच १८० हजार कोटी रुपये खर्च करावा असा सध्याचा विचार आहे सहाव्या योजनेत हाच आकडा ९७·५ हजार कोटी रुपये इतका होता. म्हणजे या क्षेत्रातच सुमारे दुपटीची वाढ होईल यापैकी १४० हजार कोटीची तरतूद करता येईल असे सरकारला आज वाटत आहे. बाकीचे ४० हजार कोटी कसे उभे करता येतील हा सरकारपुढे प्रश्न होता. मनमोहनसिंग उपाध्यक्ष झाल्यापासून देशाची स्थिती एकाएकी सुधारली असल्यास न कळे; पण योजना मंडळाच्या एका बैठकीनंतर व राजीवजीचे उत्तेजनपर शब्द ऐकल्यानंतर योजना मंडळाने आता असे ठरविले आहे की, तूट फक्त १० हजार कोटी रुपयांचीच येईल. हे खरे असेल तर ती आनंदाचीच गोष्ट आहे. फक्त ही अपेक्षित तूट ४० हजार कोटीवरून एकदम दहा हजार कोटींवर कशी आली याचा जरा खुलासा मिळाला असता तर बरे झाले असते.

या १४० हजार कोटी रुपयांचा तपशील खालीलप्रमाणे आहे. (स्वतंत्र कोष्टक पहा)

या आकड्याची बेरीज सुमारे १४२ हजार कोटी रुपये इतकीच होते. उरलेली रक्कम नोटा छापून, चलनवाढ करून किंवा नंतर काही उपाय योजून उभी करण्याचा सरकारचा मानस असावा; पण निदान वर जे अदाज दिले आहेत ते तरी कितपत विश्वासार्ह आहेत ?

गेली कित्येक वर्षं करांमधून सरकारला मिळणारे उत्पन्न अगदी हळूहळू वाढत आहे. इन्कमटॅक्स कमी केल्यामुळे लोक तो चुकवणे कमी करतील व उत्पन्न वाढेल हा आशावाद फोल ठरला आहे उलट उच्च उत्पन्नाच्या गटातील लोकाची मिळकत ज्या प्रमाणात वाढत आहे त्या प्रमाणात त्यांच्याकडून मिळणारे कराचे उत्पन्न वाढते नाही. उत्पादनशुल्क ( Excise ) कमी केल्याने उत्पादन वाढेल व सरकारी उत्पन्न शेवटी वाढेलच ही आशाही फोल ठरली आहे. शेती उत्पादनावर प्राप्तीकर अजूनही सरकार बसवत नाही. एवढेच नव्हे तर राज्यनिवडणुकीच्या जाहीरनाम्यात इदिरा काँग्रेसने एकूण कर कमी करण्याचे आश्वासन दिले आहे. अशा स्थितीत दरसाल सरासरी ८ हजार कोटी रुपये कर वाढवून इंदिरा काँग्रेसचे सरकार मिळवणार आहे काय ? दोन वर्षापूर्वीपेक्षा गेल्या वर्षी (८४–८५ मध्ये ) कर उत्पन्न १८२७ कोटी रुपयानी वाढले. त्याच काळात सैन्यदल, सरकारी नोकराचे पगार, भत्ते व सरकारने घेतलेल्या कर्जावरील व्याज या तीन गोष्टीवरील खर्च १४१६ कोटीनी वाढला.१९७९-८० पासून दरसाल भारत सरकारचा जमाखर्च तुटीचा आहे. त्यातून विकासामध्ये किती पैसा घालता येणार ?

सरकारी मालकीचे कारखाने, कंपन्या याच्या फायद्याबद्दल पाहिले तर असे दिसेल

| रक्कम उभी करण्याचा मार्ग | रक्कम ( हजार कोटी रु. ) |
|---|---|
| सरकारी कर्जे, अल्पबचत योजना वगैरे | ६०·०९५ |
| नवीन कर, वाढीव कर | ४०·१०३ |
| सरकारी कारखान्याचा, कंपन्याचा फायदा | २२·५६४ |
| परदेशी मदत, अदाजपत्रकातील शिल्लक | १९·९८८ |

की सध्या फक्त पेट्रोल कपन्यांना भरघोस फायदा होत आहे. गतवर्षीचा त्यांचा १६२७.८ कोटी रुपयांचा फायदा बाजूला ठेवला तर बाकीच्या कंपन्यांना एकूण सुमारे १०० कोटी रुपयांचा घाटाच आलेला आहे. पेट्रोल, डीझेल बाजारही बदलत चालला आहे व यापुढे त्यांना एवढा प्रचंड फायदा तर नक्कीच होणार नाही. अशा स्थितीत त्यांच्याकडून दरसाल सरासरी ५००० हजार कोटी रुपये अधिक मिळतील असा हिशोब कुठल्या आधारावर करावयाचा ? अंदाजपत्रकात हल्ली शिल्लक किती राहत आहे हे वर आलेच आहे. परदेशी मदत, कर्जे या बद्दलही भरवसा काहीच नाही.

राहता राहिली अंतर्गत कर्जे, अल्पबचत योजना वगैरे. जर करवाढ करावयाची नसेल व जर सरकारी कारखाने, कंपन्यांमधून फारसा फायदा सुटत नसेल तर सरकारला देशांतरचा कर्जाचा बोजा आणखी वाढविण्याखेरीज गत्यंतर नाही. परदेशातून घेतलेल्या कर्जाचा जितका बोभाटा होतो तितका सरकारने देशातच कर्जरोखे विकून उभ्या केलेल्या कर्जाचा होत नाही. त्यामुळेच गेल्या दहा वर्षात कर्जात जी दसपट वाढ झालेली आहे तिकडे फारसे कोणी लक्ष दिलेले नाही.

सरकारी कर्जरोखे तसे म्हटले तर कोणालाही घेता येतात, पूर्वी सामान्य नागरिक, छोटया कंपन्यासुद्धा सुरक्षिततेच्यासाठी आपली शिल्लक सरकारी कर्जरोख्यात गुंतवत असत. ही परिस्थिती आता केव्हाच बदलली आहे. बँकक्षेत्राच्या बाहेरही आज पुष्कळ रोकड खेळत असली तरी त्यापैकी बरीचशी काळया व्यवहारातून जमा झालेली असते किंवा त्यात वापरली जाते असे मानण्यास जागा आहे. १९८१–१९८४ या तीन वर्षात देशातील रोकड सुमारे ५० % वाढली; परंतु बँकक्षेत्राबाहेरील कोणी सरकारी कर्जरोख्यातील गुंतवणुकीत वाढ केली असल्यासारखे वाटत नाही. सध्या एकूण कर्जरोख्यांपैकी ६७% रिझर्व बँक व इतर बँकांकडेच आहेत. एवढेच नव्हे तर त्यातील रिझर्व बँकेतील कर्जरोख्यांचे प्रमाण २०% वरून २८% इतके वाढले आहे.

इतर बँकांनी कर्जरोखे घेणे व रिझर्व्ह बँकेने घेणे यात एक मोठा फरक आहे. समजा महाराष्ट्र बँकेने १०० कोटी नपयाचे कर्जरोखे घेतले तर ते त्यांच्याकडे जमा झालेल्या रकमेतून ते घेणार म्हणजे देशात खेळत असलेला पैसाच सरकार परत वापरणार. या उलट रिझर्व्ह बँकेने १०० कोटीचे कर्ज घतले म्हणजे ती बँक सरकारकडून प्रॉमिसरी नोट घेऊन त्यांना तेवढ्या रकमेच्या नवीन नोटा छापून देते परिणामी देशात चलनवाढ होऊन महागाई वाढण्यास मदतच होते.

रोजच्या खर्चासाठी व विकासयोजनांसाठी करवाढीऐवजी कर्जवाढीवर सरकार जास्त अवलंबून राहू लागल्यामुळे व्याजाचा दरही वाढत चालला आहे दीर्घ मुदतीच्या कर्जावर पूर्वी ५ ५ टक्के दर असे तो आता १०.५ टक्के झाला आहे. तसेच दीर्घमुदतीच्या कर्जाचे प्रमाणही (एकूण कर्जात) ५७.२ टक्क्यांवरून ७२ ४ टक्के इतके वाढले आहे. साहजिकच व्याजापोटी द्यावयाच्या रकमेतही सरकारला वाढ करावी लागली आहे. १९७५–७६ मध्ये १२२८ कोटी रुपयांवरून ती आता ५६७४ कोटींवर गेली आहे. विशेष म्हणजे सरकार स्वतः जबर व्याजाने कर्ज घेत असले तरी इतरांना (राज्य सरकारे, रेल्वे वगैरे मोठे प्रकल्प यांना) हलक्या दराने कर्ज देत असते. व्याजापोटी होणाऱ्या आवकीपेक्षा जावक १९७५-७६ साली २९५ कोटी जास्त होती तर ८४–८५ साली १९८१ कोटी इतकी फुगली आहे

दिवसेंदिवस विकासयोजनांवरील खर्च तसेच संरक्षणावरील व इतरही खर्च वाढतच जाणार हे तर उघडच आहे. तो भागविण्यासाठी वायफळ खर्चात कपात करणे, करवाढ करणे हे कठीण वाटले तरी हे खरेखुरे योग्य मार्ग आहेत. त्याऐवजी देशावरील कर्जाचा बोजा दरसाल वाढविणे, त्यावरील व्याजाचा बोजा वाढविणे हा जरी सोपा मार्ग असला तरी देशहिताच्या नव्हे. त्यामुळे फारफार तर आजचे मरण उद्यावर ढकलले जाईल एवढेच ! □



मुलाखत — हवाईसुंदरीची

# चारचौघींसारखं असावं असं कधी वाटलं ?

एअर हॉस्टेस– आणि तीही एका मध्यमवर्गीय मराठी सुशिक्षित घरातली मुलगी? ही गोष्ट तशी दुर्मिळच ! पण अशी एक एअर हॉस्टेस गेली १॥–२ वर्षं मी जवळून पहाते आहे. मी तिला, ती २–३ वर्षांची असतापासून पाहिलीय... वेगवेगळ्या टप्प्यांवर पाहिलीय... म्हणूनच मनात कौतुक, कुतूहल, शंका असं बरच काही होतं. ते एकदा बोलून टाकाव असं मनाने घेतलं. तिनेही तत्काळ, मोठ्या आनंदाने होकार दिला. तिच्याशी मोकळेपणाने मारलेल्या गप्पामधून आकाराला आलेली ही अंजली रानडे हिची मुलाखत–

**मी :** अंजू, अशी अवघडून जाऊ नकोस. आपण तुझ्या व्यवसायाबद्दल नुसत्या गप्पा मारू या. यात गंभीर चर्चा वगैरे काही नाही बरं का !

**अंजली :** हो, दडपण आलंय खरं माझ्या मनावर, पण तू विचार काय हव ते, मी देईन उत्तरं

**मी :** ही वेगळी वाट निवडण्यामागे काही पार्श्वभूमी आहे का ? याच व्यवसायाचं तुला आकर्षण होतं म्हणून ? पाश्चिमात्य देशात हिंडण्याची संधी मिळेल म्हणून ? काही तरी वेगळं करून दाखवण्याची जिद्द होती म्हणून ? यापैकी काय ?

**अंजली :** वेगवेगळे देश पहायला मिळतील हे आकर्षण होतच; पण खरं तर मी हा व्यवसाय निवडला अचानकच. मी Social Communication चा Course करीत होते त्यात खूप वेगवेगळ्या प्रकारच्या वाटा दिसल्या. नवीन संधी डोळ्यांपुढे आल्या. एक दिवस या व्यवसायाची वर्तमानपत्रातली जाहिरात मला माझ्या वडिलांनीच दाखवली. म्हणाले, 'कर अर्ज.' सहज अर्ज केला. संधी मिळाली.

**मी :** वडिलानी अर्ज करायला सांगितल? आश्चर्य आहे नाही ? साधारणपणे आपल्याकडे वेगळं काही करू म्हटलं की मोठ्या माणसांचा विरोध !

**अंजली :** तसं असतं खरं; पण माझा या बाबतीतला अनुभव अगदी वेगळा आहे. मुळातच नवीन, वेगळं काही करण्याची प्रेरणा मला माझ्या आईवडिलांनी दिली. तुला माहितच आहे, लहानपणी मी तशी लाजरी, संकोची होते पण मी बदलले ते त्याच्यामुळे !

**मी :** ए, पण तुझ्या वडिलांच्या मनात तुझ्याविषयी काही वेगळ्या अपेक्षा कशामुळे निर्माण झाल्या ? तुम्हा दोघी बहिणींबद्दल खूप अभिमान आहे नाही त्यांना ?

**अंजली :** हो तर ! वडिलाना स्वतःला त्यांच्या मनाप्रमाणे काही वेगळ करता आलं नाही परिस्थितीमुळे ! म्हणून त्यानी आमची घडणच चाकोरीबाहेरची केली.

**मी :** हं, मग तुला निर्णय घेताना फारसा त्रास झाला नसेल ना ? का झाला काही मानसिक संघर्ष ?

**अंजली :** माझ्या मनाला काहीच संघर्ष वगैरे करावा लागला नाही. माझ्या आईवर, भोवतालच्या ओळखीपाळखीच्या माणसाचं, नातेवाईकाचं काहीस दडपण आलं होतं हे बरोबर की चूक असं तिला वाटायला लागलं; पण ती खंबीर राहिली.

**मी :** अरे वा ! म्हणजे तू खरंच भाग्यवान आहेस. आणि आधी विरोध केलेल्याची आता दृष्टी बदलली असेल ना ? गेल्या मे महिन्यात आपल्या एका नातेवाईकाच्या साठीसमारंभात आपण भेटलो होतो. तिथे तू जीनची पॅंट घालून पक्तीत अगदी वाकून वाढत होतीस सगळ्यांशी हसूनखेळून वागत होतीस. सगळ्यांची नाराजी नाहीशी झाल्याच मला जाणवल.

**अंजली :** हो, बरोबर आहे. प्रथम जरी टीका झाली तरी आता कौतुक होत. आणि मुख्य म्हणजे माझ्यात आणि माझ्या आईवडिलांमध्ये generatian gap अजिबात नाही. त्यानी माझ्यावर पारंपारिक सस्कारही केले आणि स्वातंत्र्यही दिलं; पण स्वातंत्र्य दिलं ते त्यातले धोके दाखवून. त्यामुळे मी तोल राखू शकते.

**मी :** काय ग, तुझ्या आईने तुला काही विशेष सूचना दिल्या होत्या का या व्यवसायात पाऊल ठेवताना ?

**अंजली :** हो, काय वाटेल ते झालं तरी आपलं शील प्रथम जपायचच हे आईने सागितल. माझीही भारतीय सस्कृतीवर श्रद्धा आहे. चारित्र्य जपता येणार नाही असं मला जेव्हा वाटेल तेव्हा मी हा व्यवसाय सोडून देईन.

**मी :** एक स्त्री म्हणून या व्यवसायात काही अवमान आहे अस तुला वाटतं का ? कारण इथे स्त्रीचं रूप केंद्रस्थानी मानलं जातं. आज आपण स्त्री मुक्ती चळवळ करतो आहोत, आपण 'माणूस' आहोत हे पटवून द्यायला धडपडतो आहोत. स्त्रीचं रूप गौण माना, कर्तृत्व पहा अस सागतो आहोत.

**अंजली :** स्त्री म्हणून या व्यवसायात थोड्याफार प्रमाणात अवमान आहे हे मला कबूल केलेच पाहिजे. कसा ते सागते. इथे फक्त स्त्रियांना अपमानकारक नियम आहेत. या व्यवसायाची सुरुवात करताना २१ ते २५ वयोगट असला पाहिजे. वयाच्या पस्तिशीनतर पुन: मेडिकल टेस्ट द्यावी लागते. स्त्रियांना चार वर्षांचा बॉंड द्यावा लागतो. चार वर्षे नोकरी झाल्यावरच लग्न करता येतं. हे नियम पुरुषांना नाहीत शिवाय पुरुषांना प्रमोशन्स असतात. स्त्रियांना नाहीत. स्त्रियाच वजन, उची इ, गोष्टींना काटेकोर महत्त्व असत शिवाय त्वचा नितळ असावी लागते. त्यावर डाग, फोड असं काहीही असता कामा नये. म्हणजे एकूण स्त्रीदेहाला महत्त्व आलंच; पण एक सागते. पूर्वी प्रथम रूप, वजन, उची यांची चाचणी आणि मग लेखी परीक्षा अशी पद्धत होती. ती आता बदलली आहे. आता आधी लेखी परीक्षा पास झालात तरच शारीरिक चाचण्यांसाठी बोलावलं जात

**मी :** अच्छा, म्हणजे लेखी परीक्षाही असते तर ! काय स्वरूप असतं या परीक्षेचं ?

**अंजली :** लेखी परीक्षेचे दोन भाग असतात. एक इग्रजी आणि हिंदी भाषेचं ज्ञान आणि दुसऱ्यात काही मानसशास्त्रीय चाचण्या घेतल्या जातात. ज्यातून तुमचा स्वभाव, वृत्ती इ. वर प्रकाश पडतो

**मी :** मग या परीक्षेची पूर्वतयारी तू कुठे आणि कशी केलीस ?

**अंजली :** अशी काही परीक्षा असते हे मलाही आधी ठाऊक नव्हत. या परीक्षेची तयारी करण्याची कुठे काही सोय नसते म्हणून मी घरच्या घरीच General Knowledge चा अभ्यास केला. वेगवेगळ्या देशाचे नकाशे पाहिले. भाषांच्या अभ्यासावर लक्ष दिलं

**मी :** मगाशी तू म्हणालीस की फक्त स्त्रियांनाच नियम आहेत. मग त्यासाठी काही

चळवळ वगैरे नाही का करीत तुम्ही हवाई सुंदरी ? 'हवाई–सुंदरी' हा शब्दच खूप काही सुचवतो नाही का ?

**अंजली :** हो, तो शब्द प्रचलित आहे खरा पण अन्यायाकडे लक्ष वेधण्यासाठी आता स्त्रियाची स्वतंत्र संघटना स्थापन झाली आहे पूर्वी पुरुष आणि स्त्रिया या दोघाची मिळून एकच संघटना होती. आता स्त्रियाचे प्रश्न वेगळे आहेत याची जाणीव झाली आहे. थोडफार यश मिळतं आहे

**मी :** तुझी पहिली फ्लाइट कुठे होती ? काय वाटल प्रथमच हवाई–सुंदरी म्हणून विमानात चढताना ?

**अंजली :** पहिली फ्लाइट ही ट्रेनी फ्लाइट असते माझी होती गल्फला. मुंबई–अबूधाबी–दुबई–त्रिवेंद्रम–मुंबई असा प्रवास होता. खूप excitement होती त्यावेळी !

**मी :** ट्रेनी फ्लाइट म्हणजे काय ?

**अंजली :** म्हणजे प्रात्यक्षिक परीक्षा असं म्हटलं तरी चालेल. या व्यवसायाचं आम्ही जे शिक्षण घेतलेलं असतं, जी पूर्वतयारी केलेली असते, ती प्रत्यक्षात येते की नाही हे पाहिल जातं. या ट्रेनी फ्लाइटमध्ये आमच्याबरोबर एक इन्फ्लाइट सुपरवायझर असतो. ( ही पोस्ट फक्त पुरुषाना मिळते ) शिवाय पर्सर असतो. सिनियर एअरहॉस्टेस आमच्याबद्दलचा म्हणजे नव्या हवाई सुंदरीबद्दलचा रिपोर्ट लिहिते. त्यात बदल करण्याचा अधिकार इन्फ्लाइट सुपरवायझरला असतो. मात्र या रिपोर्टवर इन्फ्लाइट सुपरवायझर, पर्सर, सिनियर हवाईसुंदरी आणि ट्रेनी हवाईसुंदरी या चौघाच्या सह्या असतात. जर आपल्याबद्दलचा रिपोर्ट चुकीचा आहे असं ट्रेनीला वाटल तर ती सही देण्याच नाकारू शकते. मात्र सहसा अशी वेळ येत नाही.

**मी :** या नोकरीत तुला काही तडजोडी कराव्या लागल्या ? खाण्या–जेवण्याच्या सवयी, मद्यपानाची सक्ती वगैरे कधी झाली?

**अंजली :** आपल्याला हवं त्या प्रकारच जेवण विमानात मिळतं मात्र त्या त्या देशात उतरल्यावर तिथे जे मिळेल ते खाव लागतं मद्यपानाची सक्ती वगैरे कुठेच नसतं. हे सगळ आपल्या वागणुकीवर अवलंबून आहे.

**मी :** एखादा क्षण असा आला का, की सोडून द्याव हे सारं, आणि चारचौघीसारखं आयुष्य घालवावं अस वाटलं ?

**अंजली :** नाही. अजून तरी कधी वाटलं नाही. कधी कधी मी होमसिक होते; पण तरीही या कामात charm वाटतो.

**मी :** विमानातल्या प्रवाशाचे तुला कोणते अनुभव आले ?

**अंजली :** वेगवेगळ्या थरातले प्रवासी असतात. बहुतेक अनुभव चांगले येतात. मी महाराष्ट्रियन आहे हे कळल्यावर बरेचदा महाराष्ट्रियन प्रवासी आपुलकी दाखवतात. कधी पत्र-मैत्री होते, ग्रीटिंग्ज पाठवली जातात, भेटवस्तूंची देवाण-घेवाण होते. सहसा वाईट अनुभव येत नाहीत. एकदा एक प्रसंग आला होता; पण इनफ्लाइट सुपरव्हायझर अशावेळी मदत करतो विमानात एक VIP प्रवासी होता. नशेत त्याने माझा हात धरला. शेजारच्या जागेवर बस असं सागायला लागला. वास्तविक प्रवाशासाठी असलेल्या जागेवर आम्ही बसायचं नाही असा नियम आहे. आमच्यासाठी स्वतंत्र जागा असते तर त्यावेळी मला प्रसगावधान ठेवावं लागल. इतर प्रवाशात थोडी खळबळ झाल्याच लक्षात आल्याबरोबर इनफ्लाइट सुपरव्हायझरने येऊन मला बाजूला केलं नि तो स्वतः तिथे serve करू लागला.

**मी :** मला वाटतं, मध्यमवर्गीय महाराष्ट्रीयन मुली घाबरत असतील त्या अशाच प्रसगाना नाही ? आपण खूप दडपणाखाली वाढतो, खूप protected असतो. त्यामुळे अशा व्यवसायात आपल्या मुली कमीच, नाही का ?

**अंजली :** महाराष्ट्रियन मुली आहेत; पण सुशिक्षित मध्यमवर्गीय कुटुबातल्या कमी आहेत. त्याची सख्या वाढली पाहिजे. या व्यवसायात तसे धोके फार नाहीत.

**मी :** या व्यवसायात शिरू इच्छिणाऱ्या मुलीना, तू तुझ्या अनुभवातून काय सागू शकशील ?

**अंजली :** या व्यवसायात यायचं असेल तर you must be mentally prepared. स्वत वर नियत्रण ठेवता आल तर हा व्यवसाय चांगला आहे Protected atmosphere मधून आम्ही Free world मध्ये जातो. हातात पैसा असतो, सर्व तऱ्हेचं स्वातंत्र्य असत, जाब विचारणारं जवळ कुणी नसत. अशा वेळी मन आवरता येण्यातच खरी कसोटी असते. घरचे सस्कार प्रबळ असतील, स्वतःचा स्वत.वर विश्वास असेल तर आपण मोहाना बळी पडणार नाही.

**मी :** समाजाचा या व्यवसायाकडे पहाण्याचा दृष्टिकोन कसा आहे ? नि कसा असावा ?

**अंजली :** समाज ऐकीव गोष्टीवरून मतं बनवतो. म्हणून गैरसमजच फार असतात. Negative approach असतो. सुशिक्षित, सुसस्कृत घरातल्या मुलींची संख्या वाढत जाईल, तसतसे गैरसमज दूर होतील.

**मी :** या व्यवसायात आल्यावर तुझ्या एकूण व्यक्तिमत्त्वात कोणते बदल झाले ?

**अंजली :** खूपच बदल झाले. International atmosphere मिळाल. विचार प्रगत झाले. स्वतंत्र thinking आल. निर्णयशक्ती वाढली. ज्ञान तर दररोज वाढतं. शिवाय अनुभवाचा साचा बनत नाही इथे ! कालचा अनुभव आज नाही, आजचा उद्या नाही !

**मी :** तुझे आतापर्यंत कोणकोणते देश पाहून झाले ? या चुटपुटत्या भेटीतून तो देश, तिथली माणस कितपत कळतात ?

**अंजली :** अमेरिका सोडून बहुतेक सर्व ठिकाणी जाऊन आले. फ्रान्सच्या फक्त विमानतळावर पाय ठेवला. प्रत्येक ठिकाणी २–३ दिवसाचाच मुक्काम असतो. त्यामुळे फार माहितो वगैरे मिळत नाही मात्र मी ऑस्ट्रेलियात तीन महिने राहिले. माझ्या वडिलांना बरोबर नेल होतं. country of landscapes ! सुंदर समुद्र... आनंदी, मोकळी माणसं, मजा आली.

**मी :** अग, भराऱ्या खूप मारून झाल्या; पण जमिनीवर पाय टेकवण्याचा काही विचार आहे की नाही ? लग्नासबधी काय विचार केला आहेस ?

**अंजली :** वाटलच, अजून तू मूळपदावर कशी आली नाहीस ? खरं सागू ? अजून तरी मी लग्नाचा काही विचार केलेला नाही. बॉंड सपल्यावरही ही नोकरी चालू ठेवायला काही हरकत नाही अस आता तरी वाटतं. माझ्या आईवडिलाच्याही मनाची तयारी आहे. बघू पुढे !

**मी :** तुला मिळालेल्या या संधीच श्रेय तू कुणाला देशील ?

**अंजली :** अर्थातच आईवडिलाना. त्यांनी जर परवानगी दिली नसती तर त्याना दुखवून मी गेले नसते हे नक्की !

**मी :** त्याच्या तुझ्याकडून काय अपेक्षा आहेत ?

**अंजली :** मी माझा जास्तीतजास्त विकास करून घ्यावा एवढीच अपेक्षा आहे

**मी :** हा सुसंवाद खरच दुर्मिळ आहे नाही दोन पिढ्यामध्ला ? तुला मनःपूर्वक शुभेच्छा !

**अंजली :** धन्यवाद ! भेटू या पुनः...

—मेधा सिधये

# दारूचे व्यसन समस्या आणि उपाय

● डॉ. प्रकाश वरेकर ●

दारू पिणे ही एक फॅशनच झाली आहे. शाळा कॉलेजच्या मुलांपासून मोठमोठ्या ऑफिसरांपर्यंत दारू पिणे हा जीवनाचा एक अविभाज्य भाग बनू पहात आहे. वकील, डॉक्टर्स नेते, ऑफिसर्स सगळे दारू पितात. 'आमचं कंट्रोलमध्ये आहे' म्हणूनही सांगतात. मोठमोठ्या पार्टीजमध्ये, गॅदरिंगजमध्ये, ऑफिस गेट टुगेदरमध्ये तसेच समाजसेवी संस्थांच्या मीटिंगजमध्ये दारू न पिणारे अलग फेकले जातात. पूर्वी दारू पिणारा 'वाळीत टाकला' जायचा. हल्ली दारू न पिणाऱ्यास अशा पार्टीजमध्ये सहभाग घेता येत नाही हे दारूचे व्यसन म्हणजे शास्त्रीयरित्या आहे तरी काय ?

दारू पिणारा मद्यपी किंवा दारूड्या इतकेच आपण मानतो. पण दारूच्या व्यसनाच्या पाच मुख्य पायऱ्या असतात. ह्या प्रत्येक पायरीची व्याख्या करता येते.

१) प्रॉब्लेम ड्रिंकर – प्रॉब्लेम ड्रिंकिंग म्हणजे मानसिक ताण, चिंता, काळज्या वगैरेपासून सुटका मिळविण्यासाठी सतत किंवा अधून मधून दारू पिणे. अथवा शारीरिक वेदना कमी करण्यासाठी दारू पिणे. प्रॉब्लेम ड्रिंकिंगमध्ये तो किंवा ती प्रमाणाबाहेर दारू पितात; पण त्यांचे खरे व्यसन त्यांना नसते. ह्यांच्या वैवाहिक जीवनात तसेच इतर मैत्रींच्या संबंधात बाधा येते. ह्या पायरीत पिणारा दारूच्या आधीन झालेला नसतो. तसेच दारू प्यायला तरी तो स्वतःला काबूत ठेवू शकतो. तसेच पिण्याचे प्रमाणही ठरवू शकतो. तितके प्यायल्यानंतर थांबू शकतो.

२) हार्ड ड्रिंकर : ह्यांना आहाराच्या कमतरतेमुळे अनेक विकार जडलेले असतात. जसे यकृताचे विकार, जठराचा दाह, मज्जातंतूचे विकार वगैरे. ह्या पायरीत देखील पिणारा 'कंट्रोल'मध्ये असतो, हार्ड ड्रिंकरच्या खाण्याच्या सवयी नीट नसतात. अनियमित, कमी अधिक खाणे अथवा दारू पिऊन न खाताच झोपणे वगैरे सवयी असतात. हार्ड ड्रिंकरवर दारूचे वाईट परिणाम 'शारीरिक' असतात. त्याची पैसे कमवण्याची कुवत कमी होते. त्यामुळे वैवाहिक जीवनात कलह माजतात. कुटुंबियांना हलाकीत दिवस काढावे लागतात.

३) पिरियॉडिक ड्रिंकर : हे खूप पीतच रहातात. मग दारू एकदम सोडतात. दारू सोडलेल्या काळात ते कधी रागाने आदळआपट करतात. मारहाण करतात तर कधी अगदी निराश होऊन खिन्न होऊन बसतात. अशा खिन्नतेच्या काळात पुन्हा ते दारू पिऊ लागतात. असे पिणारे पिऊन वहकतात. गोंधळ करतात. तसेच पिऊ लागले तर कित्येक दिवस ते सतत रोज पीतच रहातात.

४) स्टेडी ड्रिंकर : दारूचे व्यसन असलेले हे पिणारे आहेत. दारू घेतल्याशिवाय त्यांना राहवतच नाही. किती प्यावे, काय प्यावे यावर त्यांचा ताबाच नसतो. यांना दारू जास्त चढत नाही. त्यामुळे ते जास्त पितात. अशा पिणाऱ्यांचे सर्व बाजूने नुकसान होते. ते कामावर नीट काम करू शकत नाहीत. समाजात नीट वागत नाहीत वैवाहिक जीवनात कलह निर्माण होतो. तसेच त्याचे आरोग्यही बिघडत जाते.

५) प्लॅटो ड्रिंकर : असे पिणारे, ज्यांना रात्रंदिवस सतत अर्धवट नशेतच रहावे लागते. असे पिणारे सततच नशेत असल्याने ते झिंगत नाहीत किंवा दारूड्यासारखे वागतही नाहीत. त्यामुळे अगदी जवळच्यादेखील अनेकांपासून ते आपले व्यसन कित्येक वर्षे लपवू शकतात. ह्यांचे सार्वजनिक जीवन हळूहळू संपुष्टात येते. दारू पिण्यावर मर्यादा राहत नाही. आरोग्य बिघडते.

वरील पायऱ्या 'सायंटिफिक अल्कोहोलिजम् रिसर्च'चे प्रणेते इ. एम. जेलीनेक यांनी सांगितल्या आहेत. वरील पायऱ्यांमध्येच थोडा बदल करून दारू पिणाऱ्याचा 'एकच प्याला' पासून दारूड्या होण्यापर्यंतचा प्रवास खालील १५ भागात होतो.

१. जास्त वेळा दारू घेणे.

२. अशा मंडळींमध्ये अथवा मित्रांच्या टोळक्यात सामील होणे, जेथे 'दारू पिणे' हा मीटिंग्ज किंवा एकत्र येण्यातला अविभाज्य भाग असतो.

३. हळूच जाऊन एकट्याने दारू पिणे.

४. मधेच जाऊन झटक्यात घोट दोन घोट पोटात घालून येणे.

५. नेहमीच्या नशेसाठी जास्त दारू आवश्यक होणे.

६. अधूनमधून नशेत असताना 'सर्व काही' विसरायला होणे.

७. शारीरिक तसेच मानसिक बदल होतात– एक पेग घेतल्यावर दुसरा घ्यायची इच्छा होणे, दारूची खरोखरच गरज भासणे. पहिला पेग पोटात गेल्याबरोबर मानसिक बदल होणे. त्या वेळी कुणी दारू पिण्याबद्दल बोलले तर भयंकर राग येणे, उगीच कुणावरही कसलाही संशय घेणे, कुणावरही उगीच संताप येणे. ही पायरी एकदा गाठली गेली की, पिणारा दारूडा होत जातो. असा पिणारा मग पार्टी किंवा मीटिंगमध्ये सभ्यपणे मुळीच पिऊ शकत नाही. तसेच कुणाच्या घरी पार्टीला बोलावण्याच्या लायकीचा नसतो.

८. सकाळी दारू आवश्यक होणे. उतारा किंवा 'आय ओपनर.'

९. खूप वेळ, तासन् तास पीत बसणे.

१०. पिऊन भांडणे करणे, शिव्यागाळ करणे अथवा मोठेपणाच्या बाता मारणे.

११. भौगोलिक उपाय करणे – म्हणजे पिणारा आपल्या शहरातून दुसरीकडे रहायला जातो, नोकरी बदलतो, दैनंदिन व्यवहार बदलतो दारू सोडण्याची शपथ घेतो, नवीन जीवन सुरू करण्याचे ठरवतो. पण पुन्हा पिऊ लागतो.

१२. दारूचा साठा करून लपवून ठेवणे.

१३. भन्नाट कल्पना सुचणे.

१४. दारू पचवण्याची ताकद कमी होणे. त्यामुळे थोडी दारू देखील खूपच चढणे.

१५. शारीरिक दुष्परिणाम जठर, यकृत, हृदय आणि रक्ताभिसरण संस्था, तसेच मज्जासंस्थेमध्ये बिघाड होणे.

वरीलपैकी पहिल्या सात पायऱ्या प्रॉब्लेम ड्रिंकरच्या आहेत. तर पुढील सर्व पायऱ्या व्यसनाधीन दारूड्याच्या आहेत.

दारूचे व्यसन असणे अथवा 'अल्कोहोलिजम्' हा एक मानसिक विकार मानला जातो. त्यानुसार त्यावर उपाय केले जातात. त्याबद्दल माहिती पहाण्याआधी आपण दारूबद्दल शास्त्रीय माहिती पाहू.

## 'दारू'

दारूतील मुख्य भाग अल्कोहोल हा एक रंगविरहीत, उडून जाणारा, जळजळ करणारा असा द्राव आहे. औषधांमध्ये भूक लागण्यासाठी तसेच काही औषधी विरघळण्यासाठी अल्कोहोल वापरतात.

दारूसाठी अल्कोहोल फर्मेंटेशन पद्धतीने बनवतात. पिष्टमय पदार्थाचे जतूद्वारे विघटन होऊन दारू तयार होते. यासाठी मका, बार्ली, तादूळ, बटाटे, द्राक्षे, ऊसाची मळी, गूळ वगैरे पदार्थ वापरतात. जो पदार्थ वापरला असेल त्यानुसार दारू बनते. जसे माल्ट आणि बार्ली, पासून बियर, द्राक्षापासून वाईन वगैरे. बियर आणि वाईन फक्त फर्मेंटेशन पद्धतीने तयार करतात. परतु अधिक अल्कोहोल प्रमाण असलेली पेये तयार करण्यासाठी फर्मेंटेशन नतर डिस्टिलेशन प्रक्रिया देखील करावी लागते. यात बाष्पीभवनाने अधिकाधिक अल्कोहोल जमा केले जाते. व्हिस्की, जीन, व्होडका, लीकर वगैरे वरील प्रकारे तयार करतात. काही वेळा बियर आणि वाईन, स्ट्राँग बनवण्यासाठी त्यात डिस्टिल्ड अल्कोहोल टाकतात. शेरी, पोर्ट वाईन तसेच स्ट्राँग बियर्स अशा तयार करतात.

भारतात दारू वरील पद्धतीने निरनिराळ्या पदार्थांपासून तयार करता येत नाही. बहुतेक अल्कोहोल साखर कारखान्यातून आणला जातो. ह्या अल्कोहोलमध्ये निरनिराळे रंग आणि इसेन्स टाकून त्याचे व्हिस्की, रम, व्होडका, जीन, ब्रँडी हे प्रकार बनवले जातात काही महाग ब्रॅन्डस्‌मध्ये इंपोर्टेड व्हिस्की मिसळलेली असते, यास ब्लेंडिंग म्हणतात. अन्यथा प्रत्येक पिणारा कुठलीही व्हिस्की किंवा रम किंवा जीन वगैरे निरनिराळी दारू पीत असला तरी रंग आणि वास वगळता सर्वजण एकच दारू पीत असतात दारू ही त्या त्या पदार्थांपासून बनलेली असली तरच ती खरी दारू म्हटली पाहिजे दारू फर्मेंटेशन डिस्टिलेशन ह्या दोन प्रक्रियेनंतर कास्किंग आणि एजिंग प्रक्रियेतूनही गेली पाहिजे. म्हणजे दारू तयार केल्यावर मोठमोठ्या लाकडी पिंपामध्ये भरून ती अनेक वर्षे तळघरामध्ये ठेवावी लागते. मगच त्याचा खरा स्वाद अनुभवायला मिळतो. आपल्याकडे कास्किंग आणि एजिंग होत नाही याचे महत्त्वाचे कारण म्हणजे दारूला इतकी प्रचंड मागणी आहे की, जितकी दारू बनते तितकी लगेच खपते. उलट मागणी जास्त आणि पुरवठा कमी असा प्रकार असतो. त्यामुळे कास्किंग आणि एजिंगसाठी साठाच नसतो. तसे न करताच भरमसाठ खप असल्याने कुणी त्या भानगडीत पडतही नाही; पण पूर्ण शास्त्रीय पद्धतीची परपरा असलेली पेये जगभर प्रसिद्ध आहेत. व्हिस्कीत अमेरिकेतील 'शिवाज रिगल' बिअरमध्ये ऑस्ट्रेलियातील 'स्वान' बियर, जीनमध्ये लंडन येथील 'बाँबे जीन', ब्रँडीमध्ये 'रेमी मार्टीन' कोनॅक' वगैरे पेये जगभर सर्वोत्तम म्हणून प्रसिद्ध आहेत भारतीय पेयामध्ये गोव्यातील 'फेणी' जगप्रसिद्ध आहे. नुकत्याच झालेल्या 'चोगम' मध्ये सर्व विदेशी देशप्रमुख आणि नेते फेणीचे प्राशन करून तृप्त झाले होते.

दारूच्या बाटलीवर त्यात अल्कोहोलचे प्रमाण काय आहे हे नोंद-

---

'दारूचे व्यसन सोडा, सिगारेटचे व्यसन सोडा' असा प्रचार करणारे डॉक्टर्स स्वतः मात्र दारू पिताना सिगारेटस् ओढताना दिसतात. ह्या टीकेवर एका अमेरिकन शास्त्रज्ञाने उत्तर दिले की डॉक्टर्स व्यसनाधीन होत नाहीत, त्यांचे संसार दारूपायी उध्वस्त होत नाहीत की ते स्वतः दारूमुळे अधःपतीत होत नाहीत व याचे कारण त्यांना ह्या व्यसनाविषयी सर्व शास्त्रीय माहिती असते.

त्यामुळे कुठपर्यंत व्यसन जाऊ द्यायचे हे ते ठरवू शकतात. कुठल्या स्टेजनंतर धोका आहे हे ते जाणू शकतात. दारूच्या सौम्य नशेपासून आनंद मिळवणे, रिलॅक्स होणे, बुजरेपणा लाजरेपणा तसेच व्यवसायाचा मुखवटा उतरवून शारीरिक आणि मानसिक रिलॅक्सेशनचा अनुभव घेणे इतकाच दारूचा उपयोग ते करतात. प्रमाणात पिऊन देखील शरीरावर त्याचा यत्किंचितही परिणाम होऊ नये यासाठी काय करावे हे त्याना माहीत असते म्हणून त्यांचे दारू पिणे हे व्यसन मानता येणार नाही.

म्हणूनच दारूचे व्यसन सोडा, दारू पिऊ नका असा तगादा न लावता दारूच्या व्यसनासंबंधी अथपासून इतिपर्यंत माहिती देणे आम्ही योग्य मानतो. पिणाऱ्यांनी स्वतःच विचार करावा की ते कुठे चालले आहेत ?

---

लेले असते. आपल्याकडे फक्त २५ अंश अंडरप्रुफ आणि ७५ अंश प्रुफ अशा प्रकारचीच पेये मिळतात. अमुक डिग्रीप्रुफ किंवा अमुक डिग्री अंडरप्रुफ ही पेयाची 'स्पेसिफिक ग्रॅव्हिटी' दर्शवते. प्रत्येक देशात प्रुफ मोजण्याचे नियम निरनिराळे आहेत. अमेरिकेतील पेयातील अल्कोहोलची टक्केवारी डिग्रीप्रुफच्या अर्धी असते. 'शिवाज रीगल', 'वॅट सिक्सटी नायन', 'जॉनीवॉकर', वगैरे व्हिस्कीमध्ये शंभर डिग्री प्रूफ म्हणजे ५० टक्के अल्कोहोल असते. बियरमध्ये ३ ते ५ टक्के अल्कोहोल असते. स्ट्रॉंग बियर ६ ते ८ टक्के, वाईनमध्ये ९ ते १५ टक्के, तर व्हिस्की आणि रम, जीन वगैरेमध्ये २५ अंश अंडर प्रुफ असल्यास साधारण १५ टक्के आणि ७५ अंश प्रुफ असल्यास ४३ टक्के अल्कोहोल असते.



हातभट्टी
'कडक'
बनवण्यासाठी...
परिणामांचं काय ?

भारतात जी देशी दारू मिळते ती २५ टक्के अंडरप्रुफ असते. त्यामध्ये अनेक ठिकाणी पाणी मिसळले जाते, त्यामुळे ती आणखी कमी अल्कोहोलची बनते. ही दारू अत्यंत स्वस्त असल्याने गरीब आणि कनिष्ठ मध्यम वर्गात जास्त प्यायली जाते; पण हातभट्टीची पिणारे मात्र हातभट्टीकडेच जातात हातभट्टीच्या दारूत अल्कोहोलचे प्रमाण भरमसाठ असते. मध्यप्रदेशात छत्तीस प्रकारच्या वनस्पतीपासून 'छत्तीसा' तयार करतात. गोव्यात काजू आणि नारळाच्या नीरापासून 'फेणी' तयार करतात. इतर सर्व ठिकाणी बहुतेक गुळापासून हातभट्टीचा 'बेवडा' तयार करतात. हातभट्टीची दारू पिणारे ती 'कडक' म्हणून पीत असतात. काहीना मग फक्त अल्कोहोलचा 'कडकपणा' कमी पडतो त्यामुळे हातभट्टीचे दारूत बॅटरी, नवसागर वगैरे टाकून ती अधिक जहाल बनवतात. हातभट्टीतही चांगली दारू मिळू शकते. मुंबईत सांताक्रुझ येथील वाकोला गावात सर्वोत्तम हातभट्टी मिळते. काही भागात मोहाच्या फुलांपासूनही दारू बनवतात.

काही ठिकाणी फ्रेंच पॉलिश पिणारेही मद्यपी आढळतात. फ्रेंच पॉलिशमध्ये स्पिरीटही असते. स्पिरीट म्हणजे डिनेचर्ड अल्कोहोल. स्पिरीट दारू म्हणून उपयोगात येऊ नये म्हणून त्यात मिथायल अल्कोहोल थोड्या प्रमाणात मिसळलेले असते. मिथायल अल्कोहोल हे विषारी असते. ह्याच्या प्राशनाने एक तासात अंधत्व आणि २४ तासात मृत्यू येतो. स्पिरीट अनेक प्रकारे विघटीत करून त्यातील अल्कोहोल काढून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. अनेक वेळा तो साध्यही होतो. ही प्रक्रिया डालड्याच्या डब्यामध्ये करतात म्हणून ह्या प्रक्रियेने मिळालेल्या दारूला 'डालडा' 'खोपडी' किंवा 'डब्बा' असे म्हणतात. प्रक्रिया नीट न झाल्याने विषारी 'डब्बा' पिऊन शेकडो एकाच वेळी मरण्याच्या दुर्घटना अनेक ठिकाणी होतात. —

## दारूचे शरीरावर परिणाम

जितकी दारू घेतली जाते त्यातील साधारणपणे २० टक्के जठरात तर राहिलेली ८० टक्के लहान आतड्यात शोषली जाते. हे अल्कोहोल मग रक्तातून शरीरभर फिरत रहाते. यकृतात अल्कोहोलचे ऑक्सिडेशन होऊन कार्बन डायॉक्साईड आणि पाणी असे रूपांतर होते. असे साधारण ९० टक्के अल्कोहोल यकृतात विघटीत होऊन संपते तर बाकीचे १० टक्के फुफ्फुसातून तसेच घामाद्वारे बाहेर फेकले जाते.

अल्कोहोलचे शरीरात चार मुख्य परिणाम होतात.

१. अल्कोहोलमुळे भरपूर शक्ती मिळते. अल्कोहोलमध्ये कॅलरीज खूप असतात पण अन्न घटक काहीच नसतात.

२. अल्कोहोल मज्जासंस्थेवर बधीरीकरण करते त्यामुळे मज्जासंस्थेचे कार्य बिघडते किंवा त्याची कार्यक्षमता कमी होते.

३. अल्कोहोलमुळे लघवीचे प्रमाण वाढते. खूप दारू घेतल्याने लघवीद्वारे तसेच घामातून शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते आणि शरीरपेशी शुष्क होतात.

४. अल्कोहोलमुळे यकृताचा काही भाग तात्पुरता कार्य करण्यास असमर्थ होतो. जास्तीत जास्त दोन तृतीयांश यकृत असे अकार्यक्षम होऊ शकते; पण काही दिवसातच ते पुन्हा नीट कार्य करू लागते. अर्थात दारू सतत, रोज किंवा आठवड्यातून दोन–तीनदाही घेतली तरी यकृतातील हा भाग कायम कार्य न करता राहू शकतो.

दारूचा नशा किती चढेल हे रक्तातून किती अल्कोहोल मेंदूपर्यंत पोहोचते यावर अवलंबून असते. रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण खालील चार बाबींवर अवलंबून असते.

(अ) यकृताच्या आकारावर अल्कोहोलचे विघटन आणि नष्ट होण्याची प्रक्रिया अवलंबून असते.

(ब) पिणाऱ्या शरीराच्या आकारावर रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण ठरते कारण शरीर जितके मोठे तितके रक्त जास्त असते त्यामुळे रक्तात अल्कोहोलचे प्रमाण विशिष्ट टक्क्यात होण्यासाठी बारीक शरीराच्या पिणाऱ्यापेक्षा जास्त दारू प्यावी लागते.

(क) ज्या वेगाने आणि ज्या प्रकारे दारू घेतली जाते त्यावरही नशेचे प्रमाण अवलंबून असते. जर हळूहळू आणि अधिक वेळ लावत दारू घेतली तर नशा कमी येते.

(ड) रिकाम्यापोटी दारू घेतली तर नशा झटकन येते. जेवणाबरोबर अथवा जेवणानंतर घेतली तर नशा कमी येते. कारण अन्न दारूचे जठरात आणि लहान आतड्यात शोषणाचे कार्यात 'बफर' प्रमाणे काम करते.

रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण जसे वाढत जाते तसे पिणाऱ्यावर निरनिराळे परिणाम होत जातात. ते परिणाम खालील कोष्टकाप्रमाणे घडतात.

००.२ टक्के – ०.०३ टक्के :– शरीरातील ताण नाहीसा होतो.

मित्रत्वाची आणि प्रेमाची भावना निर्माण होते

०.०४ टक्के :– वेगानं वहान चालवण्याची क्षमता कमी होते.

०.०५ टक्के ते ०.०६ टक्के :– 'रिलॅक्स' वाटते. प्रतिक्षिप्त क्रियेला वेळ लागतो. स्नायूंची कार्यक्षमता आणखी घटते.

०.०८ ते ०.०९ टक्के :– शरीराचा तोल सांभाळणे कठीण जाते, बोलणे अस्पष्ट होते. दृष्टी आणि श्रवणशक्ती घटते भावना आणि वागणूक यात अतिशयोक्ती येते. मोठ्याने बडबड करू लागतो.

०.११ ते ०.१२ टक्के :– शरीराचा तोल सावरत नाही. विचार करण्याची तसेच निर्णय घेण्याची कुवत घटते.

०.१४ ते ०.१५ टक्के :– मनावरचा आणि शरीरावरचा ताबा जातो. बोलणे इतके अस्पष्ट होते की, समजू शकत नाही. डबल दिसू लागते. ऐच्छिक हालचाली अशक्य होतात.

०.२० टक्के :– शरीरावरचा ताबा पूर्ण सुटतो. हालचाली करणे अशक्य होते, उलटीही होते, तसेच मलमुत्रावरील ताबाही सुटतो.

०.३० टक्के :– दारूचा विषारी परिणाम, शुद्ध हरपू लागते.

०.४० टक्के :– बेशुद्धी. 'कोमा'.

०.५० टक्के :– 'डीप कोमा'. बेशुद्धीतून शुद्धीवर आणणे अशक्य.

०.६० टक्के व त्यापुढे :– इतके प्रमाण वाढल्यास हृदय आणि श्वसन क्रिया बंद पडून मृत्यू येतो.

(प्रत्येक तासाला रक्तातील साधारण ०.०१५ टक्के अल्कोहोल शारीरिक प्रक्रियेने नष्ट होत असते.)

## दारू कशी चढते ?


अल्कोहोल हे 'फिजीओलॉजिकल डिप्रेसंट' आहे. म्हणजे जसजसे दारूचे रक्तात शोषण होत जाते तसतसे मज्जासंस्थेतील संदेश वहनाचे कार्य थंडावत जाते. सर्वप्रथम मेंदूतील काही 'हायर' केंद्रे बधीर होतात. त्यामुळे चिंता, बुजरेपणा, भीती नाहीशी होते आणि बरे वाटते. जसे मेंदूच्या खालच्या पातळीतील केंद्रावर परिणाम होतो तसे तोल, दृष्टी आणि वाचाचे कार्यात बिघाड होऊ लागतो. त्वचेतील सूक्ष्म रक्तवाहिन्या प्रसरण पावतात. त्यामुळे त्वचेतून उष्णता बाहेर पडते आणि पिणाऱ्याला 'उबदार' वाटते; पण ह्या वेळी शरीरांतर्गत अवयवापासून रक्ताचा पुरवठा कमी होतो आणि त्वचेकडे जास्त रक्त पुरवले जाते. आतील अवयवांना पुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या मज्जातंतूवरील अल्कोहोलच्या परिणामामुळे आकुंचन पावलेल्या असतात. त्यामुळे शरीरांतर्गत अवयवाचे तपमान थोडे घटते. जसे अल्कोहोलचे प्रमाण वाढत जाते तसे वरील प्रमाणे विषारी परिणाम होऊ लागतात. त्यामुळे मळमळ होते आणि काही वेळा ओकारी होते आणि पिणाऱ्याला 'हँग ओव्हर' होतो.

हँग ओव्हर म्हणजे जास्त दारू घेतल्याने शारीरिक अस्वस्थता. यात डोके दुखणे, मळमळ, तोंडाला कोरड पडणे, गरगरणे आणि अशांततेचा अनुभव येतो. हँग ओव्हर होण्यास खालील तीन कारणे कारणीभूत ठरतात.

अतिप्रमाणात अल्कोहोलमुळे जठरातील आतल्या अस्तराची जळजळ होते आणि त्याचे कार्यात बाधा येते. दुसरे म्हणजे अल्कोहोलमुळे मुत्र विसर्जन संस्था अधिक काम करून मुत्र बाहेर फेकते त्याप्रमाणात शरीरातील पाणी कमी होऊन शरीरपेशी शुष्क होतात. तिसरे म्हणजे अल्कोहोलचा मज्जासंस्थेवर 'आघात' होतो. त्यातून सावरायला मज्जासंस्थेला वेळ लागतो.

हँगओव्हर होऊ नये यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे जास्त दारू न पिणे. दारू जेवणाबरोबर घेणे, मद्य नसलेली इतर साधी पेये दारूबरोबर किंवा नंतर घेणे. तसेच मैत्रीच्या, आरामशीर आणि प्रसन्न वातावरणात दारू घेणे. मद्यपानाबरोबर धुम्रपान न करणे किंवा अत्यल्प प्रमाणात करणे.

हँगओव्हरवर उपाय वरील कारणानुसार केला तर लगेच आराम मिळतो. प्रथम जठराच्या अस्तराला मुलामा बसेल असे खाणे किंवा पिणे. दूध, कच्चे अंडे किंवा चांगली न्याहारी असे खाल्ल्यावर डोकेदुखीसाठी अॅस्पिरीनची गोळी घ्यावी. काही खाल्ल्याशिवाय अॅस्पिरीन घेतल्यास अधिकच त्रास होतो. फळांचा रस घेतल्याम त्यातील 'क' जीवनसत्व आणि चांगली चव यामुळे बरे वाटते. पेयामुळे शुष्क शरीरपेशींना पाणी मिळते आणि त्या पूर्व स्थितीत येण्यास मदत होते.




अल्कोहोल वाढते तसे विषारी परिणाम येऊ लागतात.

कॉफी किंवा चहा घेतल्यास डोके थोडे मोकळे होते कारण त्यातील कॅफिन मज्जासंस्थेला तरतरी आणते आणि साखर शक्ती पुरवते. परंतु चहा कॉफीचा असर संपताच हँगओव्हर परत जाणवू लागतो. त्याचप्रमाणे हँगओव्हरसाठी थोडेसे आणखी मद्य पिणे, 'उतारा' लगेच मज्जासंस्थेला तरतरी आणतो, पण थोड्या वेळाने आधीचा हँगओव्हर, सोबत अधिकच्या मद्याचा हँगओव्हर असा डबल हँगओव्हर त्रास देऊ लागतो.

प्रॉब्लेम ड्रिंकर ते दारूचे व्यसन लागणे इथपर्यंत पिणाऱ्यांची स्थित्यंतरे हा एक आजार आहे असे तज्ज्ञ मानतात. ज्याचा संबंध व्यक्तिमत्त्वातील असंतुलनाशी जोडला जातो. परंतु तितक्याच महत्त्वाच्या इतर बाबी आहेत. आसपासचे वातावरण, आजुबाजूची वस्ती–माणसे आणि लहानपणीचे संस्कार यावरही व्यसन लागणे न लागणे अवलंबून असते काही समाजात, काही कुटुंबात दारू पिणे ही जेवण्याइतकीच रोजची बाब असते. मोठे ऑफिसर्स, त्यांच्या बायका, सेल्समन, जर्नलिस्ट, अॅक्टर्स तसेच अल्कोहोलिक्सची मुले यांच्यात पिण्याचे प्रमाण जास्त असते. तो त्याच्या जीवनक्रमाचा भागच बनलेला असतो.

दारूचे जे वाईट परिणाम होतात त्यात मुख्य खालीलप्रमाणे आहेत.

**पचन संस्था :** दारूमुळे जठरातील आतल्या अस्तराची जळजळ होते हे आपण हॅंगओव्हरच्या माहितीत पाहिले. अल्कोहोलिकच्या जठराची सतत जळजळ होऊन त्याचा कायम दाह होत असतो (गॅस्ट्रायटीस). तसेच पुढे पुढे लहान आतड्यापर्यंतदेखील जळजळ आणि दाह होतो. ( गॅस्ट्रो एंटरायटीस ) सतत मळमळ, पोटात दुखणे, थंडी वाजून येणे, भूक न लागणे वगैरे विकार होत रहातात. अल्सर होण्याचे प्रमाणही फार असते.

**व्हिटॅमिन डेफिशियन्सी :** दारू पिणारा आहाराच्या बाबतीत काटेकोर नसतो. त्यामुळे कुपोषण आणि जीवनसत्वांची कमतरता सभवते. बेरीबेरी आणि पेलाग्रा वगैरे रोग होऊ शकतात. बेरीबेरी-मध्ये शरीरातील सर्व मज्जातंतूचा दाह होतो तर पेलाग्रामुळे मज्जा-तंतू, पचनक्रिया आणि त्वचेवर वाईट परिणाम होतो.

**सिरोसिस ऑफ लिव्हर :** यकृत हे अल्कोहोलच्या विघटनासाठी आवश्यक असते. अधूनमधून दारू पिणाऱ्याचे यकृत थोड्या दिवसात नीट होते, परतु सतत दारू पिणाऱ्यांचे यकृतातील पेशी सुरकुततात, शुष्क होतात आणि त्यांच्या जागी निकामी असे 'फायब्रस टिश्यु' निर्माण होतात. त्यामुळे यकृताची कार्यक्षमता घटत जाते. प्रथिने (प्रोटीन्स) आणि 'बी' जीवनसत्वाची शरीरात कमतरता झाली की, सीरोसीस लवकर होते. सीरोसीस सिरीयस होईपर्यंत पेशंटला कळतच नाही. नंतर मात्र अस्वास्थ्य, भूक न लागणे, मळमळ, उलट्या आणि पचनाच्या समस्या निर्माण होतात.




दारू आणि आहार यांचा जवळून संबंध आहे...

**अल्कोहोलिक मायोपॅथी :** सतत दारू पिण्यामुळे स्नायू खराब होत जातात. निकृष्ट आहार, नशेमुळे स्नायूंचे कार्य कमी होणे, तसेच मज्जातंतूंवर अल्कोहोलचे झालेले दुष्परिणाम यामुळे स्नायूंची कार्यक्षमता घटते. हृदय हेही स्नायूनी बनलेले आहे. अल्कोहोलमुळे हृदयावरही वाईट परिणाम होत जातो.

**मज्जासंस्थेची खराबी :** अल्कोहोलमुळे मेंदूच्या पेशी नष्ट होतात. तसेच शरीरभर मज्जाततूवर वाईट परिणाम होतात. निकृष्ट आहार आणि 'बी' जीवनसत्वाची कमतरता यामुळे मेंदूचे कार्य बिघडते. पिणाऱ्याला अधूनमधून थोड्या वेळासाठी किंवा जास्त वेळासाठी विसरायला होते. तो नीट विचार करू शकत नाही, स्नायूना फिटस् येतात, हातपाय थरथरतात, मनाने तो खचतो, मानसिक अस्वास्थ्य वाढते, निरनिराळे भास होतात. अनेक वेळा मज्जासंस्थेच्या क्रिया डामुळे न्युमोनिया, किडनी फेल्युअर अथवा हार्ट फेल्युअर होऊ शकतो.

**डेलिरियम ट्रेमेन्स : ( डिटीज ) :** खूप दारू पिणाऱ्याला मध्ये अनेक दिवस काही कारणानी दारू मिळाली नाही तर तो अस्वस्थ होतो. झोप येत नाही, चिडचिडा होतो. मग त्याला डिटीज होतात. ह्या स्थितीला त्याला जोर येतो, मनाचा गोंधळ होतो, भीती वाटते; हातपाय थरथर कापू लागतात. नाडी जलद पण अनियमित होते. त्याला निरनिराळे भास होऊ लागतात. हिंस्र जनावरे आपल्या मागे लागली आहेत, ती आपल्याला पकडतायत असे वाटून तो ओरडू लागतो.

**टर्मिनल अल्कोहोलिजम् :** अल्कोहोलचे शारीरिक वाईट परिणाम इतक्या प्रमाणात झाले असतात की, ती व्यक्ती जिवंत असून नसल्या-सारखी असते. मेंदूवर आणि एकूण शरीरावरील वाईट परिणामाने तो पिणारा एक हाडामासाचा गोळाच बनतो. त्याच्यावरील वाईट परिणामांवर कुठचाही उपाय लागू पडत नाही.

## दारूचे व्यसन–उपचार

दारू सोडायची आहे ? डॉक्टर्स, मानसशास्त्रज्ञ, धर्मोपदेशक, गुरुजन मदत करू शकतात. 'प्रॉब्लेम ड्रिंकर' स्टेजमध्ये दारू सोडणे सोपे असते, पण पुढे ते अधिकाधिक कठीण होत जाते हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे. आपल्याला कुठपर्यंत जायचे आहे, स्वत:चे कितीपर्यंत नुकसान करून घ्यायचे आहे हे पिणाऱ्यानेच ठरवले पाहिजे. शरी-राचा नाश आणि सुखी संसाराची होळी होईपर्यंत दारूचे व्यसन सांभाळायचे आहे की त्याआधीच धोका ओळखून दारूचा त्याग करायचा ते ठरवले पाहिजे.

दारू पिणाऱ्याबरोबर त्यांच्या जवळची माणसे, कुटुबातील माणसे यांनादेखील त्याच्याशी कसे वागावे याचे शिक्षण दिले गेले पाहिजे. कटकटी बायको मोटारीत बसली असता मोटार चालवणारा जसा वागतो तसेच संसारात होते. बायकोने 'अहो, हळू चालवा' अशी कटकट सुरू केली की, मोटार चालवणारा आणखीच जोरात चालवू लागतो, तसेच दारू पिण्याविषयी बायकोने कटकट केली की, नवरा अधिकच पिऊ लागतो. दारूचे व्यसन सोडवण्यासाठी जवळची कोण व्यक्ती कशी उपयोगी पडू शकेल हे मानसशास्त्रज्ञांकडून समजावून घेतले पाहिजे.

दारू सोडणे ही तशी फार गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. दारू सोडा-यची ठरवल्यावर सहज दारू सोडता येते, पण पिणारा सोडत नाही अशी अनेकाची समजूत असते. आपले व्यसन आपल्या कंट्रोलमध्ये आहे, हवे तेव्हा मी सोडू शकतो असेही काही पिणाऱ्याना वाटते परतु ह्या चक्रव्युहात शिरणे जितके सोपे असते तितके बाहेर पडणे सोपे नसते.

अल्कोहोल विथड्रॉवल सिन्ड्रोम– दारूची शरीराला इतकी सवय झालेली असते की, व्यसनाधीन व्यक्तीने अचानक दारू पिणे बंद केले तर त्याला पुढीलप्रमाणे त्रास होतो. साधारण २४ ते ४८ तासात त्रासाला सुरवात होते. शरीर थरथरणे, अशक्तपणा, थकवा, खूप घाम येणे, मळमळ आणि इतर त्रास सुरू होतात. जर दारूचे

जास्तच व्यसन असलेल्याने दारू सोडली तर त्याला जास्त त्रास होतो. जीव घाबरा होतो, मनाचा गोंधळ उडतो, झोप येत नाही, शरीर घामाने थबथबते आणि ती व्यक्ती खिन्न होते. काहींना फिटस् येतात. अनेकांना निरनिराळे त्रास होऊ लागतात त्यामुळे त्यांना आत्यंतिक भीती वाटते आणि ते भयंकर अस्वस्थ होतात. स्नायुंवरचा ताबा जातो आणि त्यांच्या वेडयावाकडया हालचाली होतात. काहींना मनाच्या गोंधळामुळे वाटते की, ते कामावर गेले आहेत. तिथे नेहमीच्या सवयीने काम करण्याचा प्रयत्न करतात. त्यांना वेड लागले आहे अशी खात्री पटावी असे ते वर्तन असते, आपल्या मागे हिंस्र जनावरे लागली आहेत असा भास होणे कॉमन आहे. अशा वेळी ती व्यक्ती अत्यंत घाबरलेली असते. काहींना घराच्या भिंती पडतायत, जमीन सरकतेय असे खरेखुरे दृश्य दिसते. ह्या सर्व प्रकारात वेडसरपणाने सैरावैरा पळून, पडून, हातातील वस्तू स्वतःलाच मारली जावून वगैरे साधारण ४ ते २५ टक्के पेशंटस्‌ना मृत्यू येतो. वरील प्रकारचा त्रास साधारण २ ते १० दिवस चालतो. नंतर पेशंट कित्येक तास झोपतो आणि मगच सर्व काही थांबते.

वरील कारणासाठीच दारुचे व्यसन सोडायचे असल्यास डॉक्टरांची, मानसशास्त्रज्ञाची तसेच पेशंटची ज्यावर श्रद्धा आहे अशा एखाद्या मोठ्या व्यक्तीची मदत घेतली पाहिजे. पॅराल्डीहायड, क्लोराल हायड्रेट, क्लोरडायाझे पोक्साइड, फेनोथायाझायन्स वगैरे औषधांचा पेशंटच्या स्थितीप्रमाणे योग्य प्रमाणात उपयोग करून डॉक्टर्स त्याला त्रासापासून मुक्त ठेवू शकतात. अनेक वेळा असे घडते की, कुणी व्यसनाधीन व्यक्ती स्वतःच्या इच्छेने आपल्या मुलीच्या, पत्नीच्या अथवा आईच्या सांगण्यामुळे दारू सोडण्यास तयार होतो; पण दारू बंद करताच वरील प्रकारचे त्रास इतके भयानक होतात की त्याचा तर निश्चय ढळतोच पण त्यात दारू सोड म्हणणारे प्रेमीजनही हबकतात आणि घाबरून त्याला पुन्हा दारू पिण्याची परवानगी देतात. अर्थात पुढे कधी दुसऱ्यादा दारू सोडण्याचा प्रयत्न होतो तेव्हा त्रासाचे स्वरूप पहिल्यापेक्षा तीव्र असते, त्यामुळे दुसऱ्यादाही माघार घेतली जाते. असे काही जणांच्या बाबतीत अधून मधून अनेकदा प्रसंग येतात. ह्या बाबतीत डॉक्टराचा सल्ला, उपचार, मार्गदर्शन अत्यंत आवश्यक असते, हे व्यसनी माणसाने तसेच त्याचे भले इच्छिणाऱ्या सर्वांनी लक्षात ठेवावे. या बाबतीत फॅमिली डॉक्टर मदत करू शकतात; परंतु पेशंटला हॉस्पिटल मध्ये ॲडमिट करणे अधिक चांगले, हॉस्पिटलमध्ये पेशंटवर २४ तास लक्ष राहते, तसेच इमर्जंसी किंवा कॉम्प्लिकेशन्समध्ये लगेच उपचार करता येतो.

दारू सोडण्यासाठी अनेक प्रकारचे उपचार सध्या उपलब्ध आहेत, त्यांची थोडक्यात माहिती आपण पाहू :

## मनोवैज्ञानिक उपचार

ग्रुप सायकोथेरपीचा सध्या जास्तीत जास्त उपयोग केला जातो. प्रत्येक व्यसनी व्यक्तिला मानसिक समस्यांसाठी उपाय हवा असतो, अशा उपायामुळे दारू सोडण्याचे प्रयत्न सुलभ होतात. दारू पिण्याची आवश्यकता का भासते हे समजून घेऊन त्याप्रमाणे त्याला मानसिक आधार देता येतो 'माझी बायको अशी आहे म्हणून मी पितो' 'मला आई वडिलांचे प्रेम मिळत नाही म्हणून मी पितो', 'कामावर बॉस जाच करतो', 'नशीब कुठेच साथ देत नाही म्हणून मी पितो' असे पिण्याचे कारण देणाऱ्याला त्या कारणातील फोलपणा समजावून द्यावा लागतो. समजा वरील राग, घरातल्या मंडळींवर राग, आयुष्यात फसवणाऱ्यांवर राग, स्वतःविषयी न्युनगंड, आपल्यात कसलीच धमक नाही अशी खात्री, अनामिक भीती, खिन्नता वगैरे भावनांवर ताबा ठेवणे, व्यसनी व्यक्तीला कठीण असते.

मानसशास्त्रीय उपचाराने पेशंटची खिन्नता, अनामिक भीती, चिंता यापासून सुटका केली तर दारू सोडणे आणि पुन्हा न घेणे ह्या प्रयत्नात सफलता मिळण्याची शक्यता वाढते. व्यसनी व्यक्तीचे मानसशास्त्रीय उपचार असतानाच त्याच्या जवळचे नातेवाईक, पत्नी आई, वडील किंवा जिवलग मित्र वगैरेंनाही मानसशास्त्रीय मार्गदर्शन दिले गेले पाहिजे. काही केसेसमध्ये व्यसनी इसम उपचार घेण्यास तयार नसला तरी त्याच्या जवळच्या नातेवाईकांनी मानसशास्त्रीय मार्गदर्शन घेतल्यास, व्यसनी इसमाशी त्यांच्या योग्य व्यवहाराने व्यसनी इसम काही दिवसात उपचार करून घेण्यास प्रवृत्त होतो.




मानसशास्त्रीय मार्गदर्शन महत्वाचं आहे.

मानसशास्त्रीय उपचारात दारूविषयी व्यसनी व्यक्तीच्या मनात तिरस्कार, घृणा उत्पन्न करून त्याला दारूपासून दूर सारण्यासाठी 'अॅवरजन थेरपी'चा उपयोग करतात, यात पेशंटला अॅमेटीन अथवा अॅपोमोरफीनसारखी औषधे देऊन त्यानंतर त्याच्या आवडीची दारू पिण्यास देतात, दारू घेतल्याबरोबर त्याला इतक्या बेफाम उलट्या होतात की, तो पुन्हा कित्येक दिवस दारूच्या वासालाही जात नाही अधूनमधून हीच प्रक्रिया करून त्याच्या मनात दारूविषयी कायम किळस निर्माण होऊ शकते, काही मानसशास्त्रज्ञ व्यसनीच्या मनात भीती उत्पन्न करण्यासाठी इलेक्ट्रिक शॉकचा उपयोग करतात, यास 'कंडीशन्ड रीफ्लेक्स ट्रिटमेंट' म्हणतात.

औषधोउपचार–सीडेटीव्ह, फीनोथायाझायन ट्रॅक्वीलायझर्स, आणि ॲन्टी डिप्रेसंट औषधे अल्कोहोलला पर्याय म्हणून वापरून दारू सोडता येते. पुढे ही औषधे हळूहळू कमी करीत जाऊन बंद करता येतात, अर्थात ही औषधे, त्याचे प्रमाण आणि औषधे घेण्याचा काळ हे सर्व काळजीपूर्वक ठरवावे लागते. ही औषधे जास्त प्रमाणात

वापरली जाऊन दारूऐवजी [ह्या औषधाचे व्यसन] अथवा दोन्ही व्यसने लागू शकतात.

इतर औषधी उपचारात जीवनसत्वाची कमतरता दूर करणे, यकृताच्या सुलभ कार्यासाठी आयुर्वेदीक औषधे देणे, जेवणातील कमतरता दूर होण्यासाठी अहार ठरवून देणे इत्यादी करता येतात. हल्ली असेही परिणामकारक औषधी उपचार उपलब्ध आहे ज्यामुळे दारूचे व्यसन सोडणे प्रत्येकाला सहज, सुलभ झाले आहे त्यास अॅन्टी अल्कोहोलिक्स असे नाव आहे.

अँटी अल्कोहोलिक्स–हा उपचार घेण्याचे पेशटने स्वत. ठरवले पाहिजे दुसरा कुणी त्यावर ह्या [उपचाराची जबरदस्ती करू शकत नाही. अर्थात अशी एखादी प्रेमळ व्यक्ती ज्यास 'कट्रोलिंग' व्यक्ती न मानता 'हेल्पफुल' व्यक्ती म्हणून स्वीकारतो त्या व्यक्तीकरवीही हा उपचार केला जाऊ शकतो.

ह्या उपचारासाठी 'डायसल्फिरॅम' नावाचे औषध वापरतात. आता हे औषध भारतातही बनू लागले आहे. हे औषध गोळ्याच्या स्वरूपात मिळते. हे औषध घेतल्यावर १२ तासात जर दारू घेतली तर भयंकर परिणाम होतात. चेहरा गरम होतो, नाका कानातून वाफा येऊ लागतात, डोके कमालीचे ठणकते, घामाने शरीर थबथबून निघते, छातीत हृदयाजवळ वेदना [होऊ लागतात. छातीत धडधडू लागते, पोटात चमक येते, उलटया होतात, आपण आता मरणार अशी खात्री वाटू लागते. हा अनुभव इतका भयानक असतो की ह्या गोळ्या घेणारा दारूचा वास देखील घ्यायला घाबरतो.

अल्कोहोलचे ऑक्सिडशन होऊन कार्बन डायॉक्साइड आणि वाफेत रूपांतर होण्याच्या प्रक्रिया होताना मध्ये अॅसिटाल्डीहायड तयार होणे ही एक पायरी असते. डायसल्फीरॅममुळे ही प्रक्रिया पूर्ण न होता अॅसिटाल्डीहायड तयार झाल्यावर बंद होते. त्यामुळे रक्तात अॅसिटाल्डीहायड वाढत जाऊन त्याचे वरील प्रमाणे वाईट परिणाम होऊ लागतात, हे परिणाम तसे धोकादायकही असतात. जर औषध आणि दारू जास्त प्रमाणात घेतली गेली तर पेशंट बेशुद्ध पडतो' त्याला आकडी येते आणि मृत्युमुखी पडतो, म्हणून हा उपचार काळजीपूर्वक, समजून सवरून आणि डॉक्टराच्या मार्गदर्शनाखालीच घेतला पाहिजे.

उपचारासाठी पेशटला हॉस्पिटलमध्ये अॅडमिट केले जाते. उपचार सुरू करण्याआधी तीन दिवस पेशंटने दारू घेतलेली नसावी हॉस्पिटलमध्ये आल्यावर पेशटची तपासणी केली जाते, त्यात हृदयरोग, मधुमेह, लिव्हर, किडनी आणि थायरॉयडचे रोग नसल्याची खात्री केली जाते कारण वरील आजार असलल्याना तसेच गरोदर महिलाना डायसल्फीरॅम उपचार देता येत नाही. पेशटला मग रोज ०·५ ग्रॅमची अशी गोळी दिली जाते, हा डोस एक ते तीन आठवडे तसाच ठेऊन पुढे प्रकृतीप्रमाणे ०·२५ ग्रॅम इतका कमी करतात किंवा काही केसेसमध्ये १ ग्रॅमपर्यंत वाढवतात. हे गोळ्या घेणे नियमित चालू असतानाच साधारण एक आठवड्यानंतर पेशटला त्याच्या आवडीची दारू अर्धा पेग देतात. दारू पिताच ५ ते १० मिनिटात वर वर्णन केल्याप्रमाणे वाईट परिणाम सुरू होतात, फक्त दारू कमी घेतल्यामुळे त्रासाचे स्वरूप कमी असते. पेशटला ह्या अनुभवावरून औषध चालू असताना दारू घेतल्यास पुढे त्रास होऊ शकेल ह्याची कल्पना येते. इतके झाल्यावर पेशटला घरी जाऊ देतात, आता रोज सकाळी १ गोळी घेणे इतकेच उपचाराचे काम रहाते, हे काम पेशंट स्वतः अथवा त्याच्या विश्वासातील प्रेमळ व्यक्ती देऊ शकते. रोज सकाळी गोळी खरोखर घेतली गेली आहे, याची खात्री केली पाहिजे.

हा उपचार चालू असताना मानसशास्त्रीय उपचार चालू असल्यास उत्तम. ह्या उपचाराने जर वर्षभर दारू सुटली तर मग कायमचीच सुटू शकते.

काही व्यसनी सुरवातीला गोळ्या नियमित घेतात; पण काही दिवसानी टाळाटाळ करतात, गोळी घेतल्याची 'अॅक्शन' करून गोळी बाहेर फेकून देतात. गोळी घेण्याच्या वेळी गोळी देणाऱ्या व्यक्तिबरोबर उगीच भांडण करतात आणि गोळी घेण्याचे साफ नाकरतात. [अशा वेळी पुन्हा सर्व श्रम वाया जातात, यावर उपाय म्हणून सध्या डायसल्फीरॅमचे इंप्लाट शरीरात बसवतात, हे इप्लांट प्रगत देशातून इंपोर्ट करावे लागतात. पोटावर अथवा मांडीवर 'लोकल अॅनेस्थेशिया' देऊन लहानसा कट घेतात, ह्या कटमधून बाजूबाजूच्या त्वचेच्या खाली इप्लांट बसवण्यासाठी जागा केली जातेट त्यात मग इप्लाट ठेऊन जखम शिवतात, एखादाच टाका घालावा लागतो, इंप्लांट इतके लहान असतात की, इतर काही त्रास होत नाही, ह्या इंप्लाटमधून रोज आवश्यक तितके डायसल्फीरॅम रक्तात मिसळते. हे इंप्लाट २ ते ३ वर्षे शरीरात कार्य करतात, त्या काळात किंचितही अल्कोहोल पोटात गेल्यास ५ मिनिटात त्रास सुरू होतो, यामुळे पेशट दारू घेऊच शकत नाही.

### अल्कोहोलिक्स अॅनॉनिमस

ही संस्था जगभर अल्कोहोलिक्सच्या भल्यासाठी काम करीत असते. भारतातही सर्व शहरामध्ये अल्कोहोलिक्स अॅनॉनिमसच्या शाखा आहेत, ज्यांना दारूच्या व्यसनापासून खरोखर मुक्ती मिळवायची आहे ते ह्या संस्थेत सामील होऊ शकतात. ह्या संस्थेत सर्व अल्कोहोलिक्स एकमेकाना आधार देतात, तसेच दारू सोडण्याच्या


## परसूच्या पशुकथा
**वसंत सबनीस**
**किंमत १२ रुपये**

परसू म्हणजेच परशुराम. बुटका, पहेलवानी देहाचा, बारीक डोळ्याचा आणि पिसाट केसाचा परसू, अचानक शाळा सोडून गेला तो वीस वर्षांनी भेटला. या काळात तो सारं जग भटकला. प्राणिसंग्रहालयातील नोकरी, संस्थानिकांबरोबरच्या शिकारी .मलायात हिंस्त्र श्वापदांचा व्यापार व शेवटी सर्कसबरोबर केलेली भटकंती असा त्याचा हा प्रवास होता. या प्रवासातील त्यानी सांगितलेल्या शिकारीच्या, जंगलातील वास्तव्याच्या व वन्य प्राण्यांच्या अनेक स्वभाववैशिष्टयांच्या या कथा...

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०.

प्रयत्नात सक्रीय मदत करतात. सतत भेटी-गाठी देऊन दारू सोडायची आठवण रोज करून देतात. काही केसेसमध्ये तर दर तासाला सभासदाला भेट देऊन दारूपासून परावृत्त करीत असतात, आपल्या सारख्याच किंवा आपल्यापेक्षाही जास्त व्यसनाधीन असलेले पण आता दारू सोडलेले सदस्य आपणासही दारूमुक्त जीवन जगण्यास मदत करीत आहेत ही भावना मदत करते.

### धार्मिक उपाय

प्रत्येक धर्मात अशी मडळे, ग्रुप्स अथवा संप्रदाय असतात, ज्यात सामील होऊन दारूपासून मुक्ती मिळवण्याचा प्रयत्न करता येतो, वारकरी मडळी, स्वाध्याय, स्वामीसमर्थ मंडळ, भजनी मंडळे, चिन्मय मिशन, वगैरे अनेक मंडळे आहेत. ज्यात दारू पिणे त्याज्य मानतात. दारू सोडण्याची शपथ घेऊन त्या मडळात जाता येते.

तसे करताच दारू पिणारे सवंगडी पेशटला वेडसर ठरवून त्याची दोस्ती सोडतात. रोज सायंकाळचे भजन कीर्तन प्रवचन आदी कार्यक्रमामुळे दारूची वेळ टळते. सतत जनसपर्काने दारू न पिण्याचा निश्चय अढळ रहातो. अनेकाच्या बाबतीत असे परिवर्तन शक्य असते.

### दारूचे व्यसन आणि लैंगिक शक्ती

पुरुषांच्या बाबतीत दारूचे आणि लैंगिक शक्तीचे बाबतीत अनेक समज आणि गैरसमज आहेत. आपण पाहिले की, अल्कोहोलचे ऑक्सिडेशन आणि विघटन यकृतामुळे होते, त्याचप्रमाणे दारूमुळे यकृताचे कायमचे नुकसान होत असते. यकृताच्या (दारूमुळे निर्माण झालेल्या) दोषामुळे पुढे दारू पिल्यावर दारूमुळे अशा प्रकारचे ॲन्झायम तयार होते की, त्यामुळे पुरुषत्वाचे हॉर्मोन 'टेस्टोस्टेरॉन' रक्तातून हळूहळू नष्ट होते. टेस्टोस्टेरॉन हे पुरुष शरीरातील अत्यंत महत्वाचे हॉर्मोन असते. टेस्टोस्टेरॉनमुळे शारीरिक पुरुषत्व दर्शविणारे परिणाम होत असतात, तसेच लिंगास ताठरता येण्याच्या प्रक्रियेत टेस्टोस्टेरॉन अत्यावश्यक असते. माउटसिनाई स्कूल ऑफ मेडिसिनमधील डॉ. रुबीन ह्या विकृती शास्त्रज्ञाने ह्याविषयी सशोधन करून सिद्ध केले आहे की, दारूमुळे जे टेस्टोस्टेरॉन नष्ट होते ते शरीराकडून भरून काढले जात नाही. सततच्या 'हव्या त्यापेक्षा कमी' असलेल्या टेस्टोस्टेरॉनच्या प्रमाणामुळे होणारे परिणाम भयानक असतात.

कधीमधी दारू पिणाऱ्याच्या शारीरिक आणि मानसिक पहाणीत असे आढळून आले की थोडी 'घेतल्यावर' मनावरील दडपण दूर होते, लाजरे-बुजरेपणा जातो, मनातील सुप्त भावना आणि विचार बोलके होतात; पण अल्कोहोल हे एक 'सेडेटिव्ह' म्हणजे मेंदूतील काही केंद्रातील कार्य दाबणारे औषध आहे आणि अशा औषधाचा शरीरावरील परिणाम (नशा) कमी होत असताना त्रास होतो. प्रत्येक वेळा दारू पिल्यावर 'डिप्रेशन', त्या पाठोपाठ ताण आणि 'अॅजिटेशन'चा अनुभव मिळतो. यातील ताण आणि 'अॅजिटेशन' दोन्ही लैंगिक क्रियेत अडथळा आणणाऱ्या स्थिती आहेत. थोड्या दारूने लैंगिक इच्छा उत्पन्न होते, बुजरेपणा जातो; पण प्रमाण जास्त झाले तर 'शारीरिक क्षमता' कमी होते, म्हणून लैंगिक शक्तीसाठी दारू घेणे अयोग्य आहे. हे व्यसन कधी दगा देईल कधी नपुंसक बनवेल ते सांगता येत नाही.

दारूचे व्यसन सोडताना देखील अचानक; परतु थोड्या काळासाठी नपुसकत्व येऊ शकते. अशा वेळी लैंगिक समस्या सल्लागाराचे मार्गदर्शन घेणे आवश्यक असते. दारूच्या व्यसनाच्या सदर्भातच नव्हे तर इतरही पुरुषामध्ये ताठरतेच्या सर्व कमतरतेसाठी 'प्युबीस रिंग' हा मॅकॅनिकल उपाय खात्रीने उपयोगी पडतो ताठरता कमी असणे, हवी तितका वेळ न टिकणे, मध्येच कमी पडणे किंवा नाहीशी होणे वगैरे कमतरतेमध्ये प्युबीस रिंगमुळे तात्काळ फायदा होऊन ताठरता पंधरा-वीस मिनिटे सहज टिकू लागते शभर रुपये किंमतीची प्युबीस रिंग अनेक वर्षे टिकते आणि हजारो वेळा वापरता येते प्युबीस रिंगबद्दल अधिक माहिती कुणास हवी असल्यास मी जरूर पाठवेन.

डायसल्फीरॅम औषधाच्या वापरात देखील त्या औषधाचा साईड इफेक्ट म्हणून लैंगिक शक्ती घटते. अशा वेळी योग्य लैंगिक सल्ला तसेच प्युबीस रिंगच्या उपयोगाने लैंगिक जीवन सुखी ठेवता येते. अनेक केसेसमध्ये दारू सोडताना लैंगिक शक्ती कमी होऊ लागताच पेशट पुन्हा दारूकडे धाव घेतो. लैंगिक शक्तीतील ही कमतरता काही ठराविक काळापुरतीच मर्यादित असते, हे त्यांना माहीत नसते. तसेच अशा वेळी 'बी' जीवनसत्व, थायमीन, टेस्टॉस्टेरॉन ही औषधे, योग्य लैंगिक सल्ला आणि प्युबीस रिंगसारखे साधनाच्या उपयोगाने हा काळ सहज पार पडतो हे वाचकानी लक्षात ठेवावे. □


प्रसिद्ध स्त्री-रोग तज्ज्ञ डॉ. बी. एन्. पुरंदरे
यांची आत्मकथा

**शल्य-कौशल्य** मूळ किंमत रु. ६०/-
सवलतीत रु. ४५/-

सुधारित २ री आवृत्ती

श्री. नानासाहेब यांचे रुद्राक्षावरील संशोधन, गर्भवती स्त्रियांना मुलगा होणार की मुलगी याची रुद्राक्षावरून ते करत असलेली परीक्षा व मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासंबंधीची त्यांची परखड मते असे मिळून सुधारित आवृत्तीत वाढवलेले प्रकरण ११ वे अत्यंत वाचनीय.

तसेच प्रसिद्ध लेखक श्री. रा. भि. जोशी याची
दोन संग्राह्य पुस्तके

१. सोन्याचा उंबरठा रु. ४०/-
२. घाट शिळेवरि उभी रु. ५०/-

एकूण ९०/- रु. किंमतीची पुस्तके ६५/- रुपयात.

संपर्क साधा : अश्वमेध प्रकाशन
द्वारा : ज्ञानदा ग्रंथ वितरण, कृष्ण निवास,
मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व ४२१२०१.




# ऊब / अपर्णा भावे

'रमेश…रमेश… '

…कोणी तरी त्याला गदागदा हलवत होतं. आपण जागं व्हायचं नाही असं ठरवलं तरी जागं व्हावंच लागणार असं त्या हलवण्यावरून कळलं. रमेशने डोळ्यावरची झोप आवरत डोळे किलकिले करून पाहिलं.

'रमेश…ऊठ…लौकर ऊठ !'

रमेशनं डोळे उघडायचा प्रयत्न केला तशी आसपासचा अंधार जणू जास्तच गडद झाला. खरं तर, डोकं जरा जडच झालं होतं; पण समोर विक्रांतचा चेहेरा दिसत होता… चिंताक्रांत.

'काय झालं ?'

…आपल्या झोपण्याच्या खोलीत विक्रांत आला कसा हे गूढ न उकलून रमेशने जरा अडखळत विचारलं.

'तू-तू ठीक आहेस ना ?'–विक्रांत.

'म्हणजे ?'

'नाही. त्या दोघांना रात्री जरा जास्तच झालेली दिसते आहे. दोघंही अजिबात हलत नाहीयेत. मी म्हटलं, 'तू तरी उठतो आहेस की नाही ? रात्री फार वेळ बसला होतात का रे ? मला सवय नाही ना जागायची म्हणून मी शेवटी निघून गेलो.

विक्रांत बोलत होता तसतसा रमेशला एकेका गोष्टीचा उलगडा होत चालला. ही आसपासची जागा परकी का वाटते आहे हे त्याच्या लक्षात आलं. तो आत्ता त्याच्या खोलीत नव्हताच मुळी ! हे विक्रांतचं घर होतं, शेतावरचं. नेहेमी स्वतःच्या घरी असलेल्या बंधनांना वैतागून सगळ्या मित्रांनी बाहेर कुठेतरी मोकळेपणानं एकत्र जमायचं ठरवलं होतं. त्याप्रमाणे ते शहरापासून दूर विक्रांतच्या गावी आले होते.

इथे सगळाच राकट आडदांडपणा होता. त्यांना ओळखणारं तर कुणीच नव्हतं. त्यामुळे प्रत्येकजण दिवसभर मन मानेल तसा वागला. रात्री मनसोक्त पिणं आणि नंतर झणझणीत जेवण. तरी त्यातल्या त्यात विक्रांतचं घर आणि गाव असल्यामुळे तो जरा जबाबदारीने वागत होता. रात्रीसुद्धा तो तसा जरा लौकरच झोपला.

'…रमेश, ए रमेश ऐकतो आहेस ना मी काय बोलतोय ते ?' …विक्रांतने कंदिल उचलून रमेशच्या चेहेऱ्याजवळ आणून, त्याचा चेहेरा न्याहाळत त्याला विचारलं,

'अं ! ऐकतोय ना… बोल तू ! रमेशने चेहेरा, डोळे यावरून हात फिरवत विचारलं, 'काय झालं ?'

'झालं म्हणजे असं… थोडा प्रॉब्लेम आहे यार !… हे दोघं तर असे मुडदे झाले आहेत ! काही मदत केली तर तूच करू शकशील–'

'मदत ?… आणि मी ?' जडावल्या डोळ्यांनी रमेशनं विचारलं. मग गरगरणारं डोकं दोन्ही हातांनी धरत, सरळ आडवा होत म्हणाला, 'बाबा रे, आता याक्षणी तरी मी काही करू शकेन असं वाटत नाही.'

विक्रांत त्याच्याकडे हताश होऊनच पहात राहिला. तेवढ्यात दारावरची कडी जोरजोरात वाजली. विक्रांत चडफडत उठला. पाय ओढत दारापाशी गेला. बाहेर कोण होतं त्यांच्याशी तो काही तरी बोलला. परत आत येऊन दार लावून टाकून त्यानं सरळ रमेशला बिछान्यातून बाहेर खेचलं आणि तो त्याला दबक्या आवाजात म्हणाला,

'हे बघ, सगळा गोंधळ झालाय. इथला बाहेरचा एक गडी काल खपला आणि खरं सांगायचं तर त्याला पोचवायला आपल्याला जावं लागणार–'

'आं ?… पण का ?'

'गाव किती तरी लांब आहे. बाहेर मरणाची थंडी आहे. कोणीही त्याला पोचवायला तयार नाही. त्यात इथे सगळे मिळून गडी आठ. हा खपला. एक म्हातारा. उरलेल्यातले फक्त दोघं तयार झाले कसेबसे. तो मुडदा शेतावर ठेवायचा तरी किती वेळ ?'

'अरे, पण म्हणून काय त्या गड्याला

पोचवायला आपण दोघांनी जायचं? तेही अशा थंडीत मरतमरत... आपल्याला नाही जमणार ..' अस म्हणत रमेश परत बिछान्यात घुसणार तोच विक्रांतनें त्याला मागच्या मागे खेचलं.

'त्याच्याकडे गडी म्हणून पाहू नको रमेश. तू विचार कर, एक माणूस मेलाय आणि प्रेत पोचवायला कोणी नाही म्हणून ते प्रेत तसच पडून राहिल आहे--'

विक्रांत बराच वेळ किती तरी प्रकारांनी रमेशला समजावून सांगत होता. शेवटी तो काय म्हणतोय ते रमेशच्या लक्षात आलं

'बरं बाबा!... तू म्हणशील तसं...'

नाईलाजाने रमेश म्हणाला. त्याच वेळी ठार झोपलेल्या आपल्या दोघा दोस्ताकडे पाहून त्याच्या मनात आलं आपलीही अशीच अवस्था असती बरं झालं असतं. मग काही विक्रांत आपल्या पाठीमागे लागला नसता.

रमेशची नाखुषी विक्रांतला कळत नव्हती असं नाही फार काय, शहरात असता तर तो स्वत: असाच अलिप्तपणे वागला असता; पण शहरातले वागण्याचे नियम गावी राबवून कधीच चालत नाही. त्यासारखा मूर्खपणा नाही. खेडूत माणसं शहरात गेल्यावर गावढळ म्हणून शहरी लोक त्याला हसतात; पण ही खेड्यातली माणसं कोणी जर माणुसकी विसरून वागायला लागला तर त्याला वाळीत टाकायलाही कमी करत नाहीत खेड्यातल्या या सामाजिक शिक्षा सोसायच्या म्हणजे काही तोंडच्या गप्पा नव्हेत.

मनाशी हा विचार करत, थोडी रमेशची आणि थोडी स्वतची समजूत काढत विक्रांत म्हणाला,

'तसं आपल्याला काही कराव लागणार नाही रमेश सामान वगैरे इथं असतच... जरी नसल तरी त्याचं ते पाहून घेतील... आपण फक्त खांदा द्यायचा...'

... रमेशने एकदम आपल्या खांद्याना तळहाताने चाचपलं. नक्की आपल्याला काय कराव लागणार आहे ते त्याला आत्ता कुठे नीटसं कळल.

आजवर काही त्यानं कुणाला शब्दश: खांदा दिला नव्हता शहरात तशी कधी वेळही आली नव्हती. त्यातून घरात लहान! म्हणून असल्या कामातून तो कटापच असायचा आणि आत्ता एकदम 'कुणाच्या कुणाला' खांदा द्यायची वेळ आली होती!

खांद्याला हात लावताच त्याला एकदम केनकीची आठवण झाली. फार लाडात आली म्हणजे एखाद्या मांजरीसारखी अगचटीस येऊन ती खांद्यावर डोकं घुसळायची.

... त्या आठवणीनेही रमेश हलकेच स्वत.शी हसला.

'का रे हसलास?'

'अं!' रमेश एकदम भानावर आला. खांदे उडवून हसत म्हणाला, 'काय यार! अगदी 'कुणाच्या खांद्यावर' झालय् बघ... च्यायला!... जरा कुठे मजा करायला म्हणून आलो तर ...'

... दारावरची कडी वाजल्यानं रमेशचं वाक्य अर्धवटच राहिलं त्यानं फक्त प्रश्नार्थक नजरेन विक्रांतकडे पाहिल. विक्रांत म्हणाला,

'चल!... ते आलेले दिसतायत. ही घोंगडी पांघर!'

'घोंगडी?'

'अरे बाबा .. इथली थंडी तुला माहिती नाही. त्या फालतू शहरी शाली--स्वेटर टिकणार नाहीत दुसरी गोष्ट म्हणजे इथे तुला कोण पहायला येणार आहे?'

रमेशनं काही न बोलता विक्रांतकडे पहात तो जसा वागेल तस वागायच ठरवल. मनाशी त्याने विचार केला,

'चला!... हाही एक अनुभव. नाहीतरी 'रुटीनचा कटाळा आला' ही आपली तक्रार होतीच ना?'

त्यानंतर मात्र त्याला आपल्या मनाशी विचार करायलाही वेळ मिळाला नाही .. इतक घडलेल्या घटनेने त्याला बांधून घेतलं. कोणाचंही क्रियाकर्म इतक्या जवळून आणि तरीही इतक्या अलिप्तपणे तो प्रथमच पहात होता त्यामुळे त्या साऱ्या प्रकारातले अगदी बारीकसारीक बारकावेसुद्धा तो कळत--नकळत टिपून घेत होता. मध्येच एकदा थंडीची जीवघेणी जाणीव झाली तशी त्यानं अंगावरची घोंगडी घट्ट लपेटून घेतली या जाडयाभरडया घोंगडीतूनही आपल्याला थंडी जाणवते आहे याचं त्याला मनोमन नवल वाटलं. ते सहा गडी मात्र सराईतपणे पटपट आपलं काम उरकत होतं. थंडी त्याच्या गावीही नव्हती इतके ते त्या माणसाला ठेवणं, बांधणं यात गढून गेले होते.

रमेश, विक्रांत आणि जरा बाजूला बसलेला तो म्हातारा हे तिघंच स्वस्थ बसले होते. रमेश तर अजून पुरता हँगओव्हर गेलेला नसतानाच हे विपरीत घडल्यामुळे जरासा चक्रावला होता; पण बारीक नजरेनं त्याचं निरीक्षण चालू होतच! 'तिरडी बांधणं हे एक वेगळच शास्त्र आहे--' अशा निष्कर्षाप्रत तो एव्हाना येऊन पोहोचला होता. सगळी बांधाबांधो पूर्ण होत आली तशी आता आपलं काम सुरू होणार याची विदारक जाणीव रमेशला झाली. तो हळूच कुजबुजत्या स्वरात विक्रांतला म्हणाला,

'विक्रांत, ही भानगड जमेल ना रे मला?'

--त्या सरशी त्या सगळ्यांनी माना वळवून रमेशकडे पाहिलं. तो म्हातारा तर अस्फुट हसल्याचा भास झाला रमेशला या रात्रीच्या भयाण शांततेत आपली कुजबुज असं अनाऊन्समेंटचं रूप धारण करेल याची कल्पनाच नव्हती रमेशला; पण एकदा हे लक्षात आल्यावर मग मात्र तो अगदी गप्प बसला.

विक्रांतने त्याला धीर देण्यासाठी त्याचा हात हातात घेऊन हलकेच दाबला तेव्हा फार बरं वाटलं रमेशला. त्या आश्वासक स्पर्शाचा प्रतिसाद रमेशने स्पर्शानेच दिला. या सगळ्या ग्रुपमध्ये ते दोघंच काय ते निराळे होते. म्हणूनच ते दोघ एकमेकांच्या अगदी जवळचे बनले

-- एव्हाना त्या लोकांचं सगळं काम पूर्ण झालं होतं त्यांनी हातानच रमेश आणि विक्रांतला खूण केली तशी ते दोघं जोडीनंच पुढे झाले.

-- एरवी चेष्टेत रमेशन 'खांदा देणं' हा शब्द किती वेळा तरी वापरला असेल पण अक्षरश: खांदा द्यायची ही पहिलीच वेळ. पण त्यामुळेच आता रमेशला अक्षरश: ब्रह्मांड आठवलं. त्यात त्या विचित्र पायवाटा आसपासची झाडी...हे चौरजणं... समोरचा मडकंवाला आणि वाट दाखवणारा कंदिलवाला!...चंद्राचा अपुरा प्रकाश. त्यातून ते सगळेच अगदी नि.शब्दपणे वाट कापत चालले होते. खरं तर मनातून वाटत होतं वाट लौकर संपावी; पण त्यामुळेच वाट लांबत चालली होती कीकाय कोण जाणे.

आपल्या खांद्यावरचं ओझं प्रेताचं आहे हे जाणवून रमेशला राहून राहून लहानपणी वाचलेल्या प्रेत–वेताळ या चांदोबातल्या गोष्टी परत परत आठवत होत्या.

...खांद्यावरचं ओझं खाली उतरवायची वेळ आली तोपर्यंत रमेशच्या मनाला एक प्रकारचा बधिरपणा आला होता. त्यामुळेच ते लोक पुढे काय करतायत इकडे अजिबात लक्ष न देता रमेश एका बाजला उभा राहून सुन्न मनाने सगळं न्याहाळत होता. नजर इकडे तिकडे फिरत होती खरी पण मनाला काहीच बोध होत नव्हता.

– असा किती वेळ गेला कोण जाणे. बऱ्याच वेळाने रमेशला समोर प्रकाश दिसला. त्या प्रकाशापेक्षाही नजरेनं त्यामागची ऊब टिपली. इतका वेळ बधीर अवस्थेत असलेल्या अवयवांना एकाएकी ऊबेची आस लागली. आपण काय करतो आहोत हे कळण्यापूर्वीच रमेश हलके हलके पुढे सरकत होता. फार बरं वाटत होतं, मन सुखावत होतं. मघासारखी थंडी आता बोचरी वाटत नव्हती.

रमेशने नकळत त्या ऊबेचा मागोवा घेत आपले हात उभारले. आता त्या हातांनी तो चेहऱ्याला स्पर्श करणार तोच त्याला एकदम भान आलं, ही ऊब, ही शेकोटी जी पेटली आहे तीत माणूस जळतोय...तो जी ऊब घेऊन अंग शेकत होता ती एक चिता होती–त्या प्रेताची !

ही विदारक जाणीव झाली तशी रमेशचे हात हलके हलके खाली आले. दोन्ही हातांनी त्यानं आपला चेहरा झाकून घेतला. त्याच्या तोंडून एक बेसावध हुंदका फुटला.

– 'कवटीचा आवाज आला की, परतायचं...' असा विचार करणारे गडी 'या पावण्याला का एकदम उमाळा आला' असा विचार करत आश्चर्याने पहायला लागले.

# ऐलमा पैलमा, शिक्षण देवा

## लीला पाटील

## तुम्ही शिक्षक व्हायचं का ठरवलंय ?

### He who cannot, teaches

दरवर्षी महाराष्ट्रात नवे सहा हजार माध्यमिक शिक्षक तयार होतात. त्यांना 'तुम्ही शिक्षक व्हायचे का ठरविले आहे ?' असा प्रश्न केला तर त्यांनी त्याबाबत फारसा सांगोपांग व मूलभूत विचार केलेला नाही हे समजून येते. मला वाटते, वयाच्या दुसऱ्या तिसऱ्या वर्षापासून ते थेट बावीस तेवीस वर्षापर्यंत आपण शिक्षक पाहात असल्यामुळे शिक्षक होणे म्हणजे काय हे पर्यायाने आपल्या बरेचसे परिचयाचे असते. शाळेच्या आवारात वावरणे, शिक्षक खोलीत जाणे–येणे, मुख्याध्यापकांनी बोलावल्यावर त्यांच्या खोलीत जाणे आणि खडू, डस्टर, वह्यांचे गठ्ठे सांभाळत या वर्गावरून त्या वर्गावर जाणे म्हणजे शिक्षक होणे हे आपण पाहिलेले असते. घंटा झाल्यावर वर्गात जाणे आणि घंटा होईपर्यंत शिकवीत राहणे हे विद्यार्थी म्हणून आपण अनुभवलेले असते. 'गप्प बसा', 'बोलायचे नाही', 'माझे ऐका– ही शिक्षकांची ध्रुपदे आपण ऐकलेली असतात. शिक्षकांच्या कामांपैकी वह्या तपासण्याचे काम कंटाळवाणे असू शकेल इतपत अंदाज आपण केलेला असतो. पण सर्वसाधारणपणे 'शिक्षक का व्हायचे' याबद्दलचा फारसा समग्र विचार आपण करीत नाही. आर्किटेक्ट, डॉक्टर, इंजिनियर होण्याचे निर्णय घेताना विद्यार्थी व पालक हे दोघेही अधिक जागरूक असतात. बर्नार्ड शॉने आपल्या बोचऱ्या भाषेत म्हटले आहे. 'He Who can, does. He who cannot teaches' पण शॉनंतर कालप्रवाहाचे बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले आहे. भारत देश स्वतंत्र झाला आहे. 'शिक्षक हे भावी पिढीचे शिल्पकार आहेत.' हे शिक्षकविषयक पुस्तकातले वाक्य आता प्रत्यक्षात यावयाचे असेल तर He who can, teaches असेच असावे लागेल. अर्थातच त्यासाठी शिक्षक पेशात येऊ इच्छिणाऱ्यांची निवड त्यांच्या देणगीच्या भरघोसपणावर न ठरता इतर बाबींवर ठरवावी लागेल. निदान शिक्षक होण्यासाठी ज्यांची निवड होते त्यांना अधिक जागरूक बनवावे लागेल.

### शिक्षक यासाठी व्हायचे

कोणताही जीवनमार्ग (career) निवडताना आपल्या मनात एकापेक्षा जास्त हेतू असतात. शिक्षक होण्याचा जीवनमार्ग निवडण्यामागे तुमच्या मनात कोणते हेतू आहेत ? पुढील वाक्यात जे हेतू प्रतिबिंबीत झाले आहेत त्यांपैकी काही तुमच्या अंतरंगात तरळत आहेत का ? आणि त्याशिवाय कोणते नवे हेतू शिक्षक होण्याच्या तुमच्या निर्णयामागे आहेत ?

१) दररोज पन्नास–साठ पोरे नियंत्रित करावयाची आणि त्यांच्यावर सत्ता गाजवायची हे मला आवडते.

२) पदवी/पदव्युत्तर परीक्षेसाठी मी निवडलेल्या विषयांमुळे मला शिक्षकच व्हावे लागणार.

३) आयुष्यात पुढे नक्की काय करायचे हे ठरेपर्यंत शिक्षक होणे सुरक्षित.

४) कोणत्या तरी मोठ्या धंद्यात कोणीतरी क्षुद्र माणूस म्हणून राहण्यापेक्षा शाळेसारख्या लहानशा जगात शिक्षक होऊन प्रतिष्ठा मिळविणे बरे.

५) मला मुख्याध्यापक व्हायचे आहे. शिक्षक झाल्याशिवाय मुख्याध्यापक कसे होता येईल ?

६) धंद्यातील जीवघेणी स्पर्धा मला आवडत नाही. शिक्षक होणे हा उदात्त पर्याय वाटतो.

७) कोणाला तरी काही तरी समजावून देणे, दुसऱ्याच्या वाढीला हातभार लावणे मला आवडते. म्हणूनच मी शिक्षक व्हायचे ठरविले आहे.

८) माझा विद्यार्थी भविष्यकालात कोणत्या तरी क्षेत्रात कीर्तीमान होईल ही भावनाच मला उत्तेजक वाटते.

९) आपला समाज बदलविणे जरूर आहे आणि त्यासाठी मी शिक्षक होऊ इच्छितो.

१०) मुलांकडे बहुधा सर्वजण दुर्लक्ष करतात. आणि त्यातल्यात्यात ओबडधोबड


मुलांकडे तर कोणीच लक्ष देत नाहीत. शिक्षक होऊन अशा दुर्लक्षित मुलांसाठी काही करावे असे वाटते.

११) कमी धोक्यांचा आणि तरीही बरा पगार व भरपूर सुट्ट्या देणारा धंदा शिक्षकी शिवाय दुसरा कोणता ?

१२) माझ्या पालकांना / नवऱ्याला मी शिक्षक व्हावे असे वाटते.

१३) लहानपणी मला शिक्षक फार आवडत असत. शिक्षक होऊन आपणही मुलांना आवडावं असे वाटते.

वरीलपैकी कोणती कारणे तुम्हाला क्लिक झाली ?



## शिक्षकीपेशातील काटे

अनेकदा असे दिसते की शिक्षक होण्यामागे ज्या कल्पना, जो ध्येयवाद असतो तो व्यवहारात पार धुवून काढला जातो आणि मग जे शिल्लक राहते ती नुसती शिक्षकाची नोकरी ! यासाठी शिक्षक होण्यापूर्वीच शिक्षकीची काटेरी बाजूही माहीत असायला हवी, निदान तिची ढोबळ कल्पना हवी. अनेक वर्षे शिक्षकी केलेले बरेच लोक सांगतात की या पेशात उणी बाजूच जास्त ! असे म्हणणाऱ्या लोकांचे अभिप्राय समजून घेऊ या.

१. सतत पाच–सहा तास पन्नास–साठ विद्यार्थ्यांना काबूत ठेवण्याचा ताण प्रचंड असतो.

२ दररोज पाच–सहा तास घसा खरडून खरडून थकायला होते.

३. सतत गोंगाटाच्या वातावरणात रहावे लागल्यामुळे संध्याकाळी अगदी शक्तिपात झाल्यासारखे वाटते.

४. पुन: पुन: त्याच त्या चुका गृहपाठांतून आपल्यापुढे येतात आणि वाटते की आपण अगदी थर्डक्लास शिक्षक आहोत.

५. विद्यार्थी, मुख्याध्यापक, संस्थाचालक, पालक व शासनाचे अधिकारी या साऱ्यांनाच आपल्याला खूष ठेवले पाहिजे या जाणीवेने अनेक नकोसे वाटणारे समझोते करावे लागतात आणि मग आपलीच आपल्याला चीड येत राहते.

६. मुला–मुलींची प्रेम प्रकरणे, वैमनस्य आणि भांडणे निस्तरता निस्तरता नाकीनऊ येतात.

७. 'अध्यापक कम, क्लार्क जादा' असे म्हणावे इतके लिखावटीचे काम करावे लागते. नानाविध प्रपत्रे आणि पावत्या, पालकांना पत्रे, प्रगती पत्रके, अनेक नोंदी, पाठांची टाचणे, कामासाठी करावा लागणारा पत्रव्यवहार, मतावल्यांना उत्तरे ह्या साऱ्यात जीव भोवंडून जातो.

८. इतर शिक्षक रजेवर असता त्यांची तासिका घ्यायची आहे असे कळले की उलटी होईल की काय असे वाटते.

९. प्रत्येक पालकाला आपले मूल एक 'अनमोल रत्न' वाटत असते. पालकाच्या भावना न दुखविता सत्यकथन करताना तारेवरची कसरत होते.

१०. कित्येकदा काही कारणांवरून तणाव निर्माण होतात. काटयाचा नायटा होऊ नये म्हणून पाऊलच पुढे टाकू नये असे वाटते.

११. शाळेची इमारत दोन–तीन मजली असेल तर जिने चढून–उतरून पिट्टा पडतो.

प्रत्येक पेशात काही जमेची तर काही उणी बाजू असते, शिक्षकीपेशा याला कसा अपवाद असणार ? काही लोकांना हा पेशा अत्यंत चेतनादायक व आव्हानात्मक वाटतो, तर काहींना तो अत्यंत रट्टाळ वाटतो. खरे सांगू Beauty lies in the eye of the beholder या उक्तीप्रमाणे कोणत्याही पेशातील चेतना व आनंद त्या पेशात आपण कसे काम करतो यावर अवलंबून असतो. पहिली तारीख, वेतनवाढीची तारीख आणि सेवानिवृत्तीची तारीख याच महत्वाच्या तारखा आणि मिळणारा पगार व सुट्ट्या हेच शिक्षकीपेशाचे फलित असे मानणाऱ्यांना शिक्षकीपेशातील आनंद कसा उमजावा ? परंतु अशा लोकांनी Children enter school as question mark and leave as periods असे तरी आपल्या अध्यापनामुळे होणार नाही अशी आकांक्षा बाळगली तरीही त्यांना शिक्षकीतील आनंद अधूनमधून भेटत राहील. □

## पुस्तके

# आधुनिक जगाची मार्मिक चिकित्सा

अगदी प्राचीन काळापासून आत्ताच्या आधुनिक युगापर्यंत झालेल्या मानवाच्या प्रवासाचे चित्रण अनेकांनी केले आहे आणि हे करताना प्रगतीचा आलेख मांडणे हेच त्या चित्रणाचे मुख्य सूत्र राहिले आहे. आर्थिकदृष्ट्या मार्क्सने माणसाच्या प्रवासाचे विश्लेषण केले आहे. सरंजामदारी व्यवस्थेतील मानवापासून ते भांडवलशाही समाजातील मानवापर्यंत आणि भांडवलशाही नष्ट झाल्यानंतरच्या आदर्श साम्यवादी, राज्यविरहीत समाजापर्यंत. समाजशास्त्रज्ञांनी समाजव्यवस्थेच्या उन्नत स्वरूपाची मांडणी केली आहे. आधुनिक विज्ञानानुसार तर मानवाने निसर्गावर मात करण्याइतपत झेप घेतली आहे.

पण या सर्व ऐतिहासिक घडामोडीनंतरही ‘ नराचा–नारायण ’ होण्याची प्रक्रिया खरोखर घडली आहे का ? ‘ नारायण ’ ही संकल्पना एकवेळ बाजूला ठेवू, कारण काहींच्या मते ती संकल्पनाच प्रतिगामी आहे.

पण आपण ज्याला सामाजिक, नैतिक मूल्ये म्हणतो ती समाजात खरोखर रुजली आहेत का, याचा विचार झाला पाहिजे. ‘ आदिम अवस्थेपासून जेटयुगापर्यंत ’ माणूस झाला हे सांगणं सोपं आहे पण कित्येकदा एक पाऊल पुढे आणि दोन पाऊले मागे या गतीने सुद्धा आपण चालत असतो. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर लोकशाही, स्वातंत्र्य, समता ही मूल्ये जगाला मिळाली, असे इतिहासाच्या पाठ्यपुस्तकात शिकत असतानाच प्रत्यक्षात येणारे अनुभव वेगळेच असतात आणि ह्याची कठोर चिकित्सा फारशी कोणाला करावीशी वाटत नाही. कारण स्वप्नरंजनात राहण्याचा किंवा दिवास्वप्न पाहण्याचा एक आनंद असतो. आपल्या जीवनात आलेली अपयशे स्वतःचे मन स्वीकारायला तयार नसते अशा वेळी कुठल्यातरी ‘ संरक्षण यंत्रणेचा ’ आधार घेऊन आपण स्वतःला फसवत असतो. तीच गोष्ट समाजाची आहे. स्वातंत्र्य, लोकशाही, समता, समाजवाद अशा मोठमोठ्या संकल्पना आणि शब्द यांची अनेक समाजांना गरज वाटते ती याचमुळे. मग ती लोकशाही साम्यवादी दंडुक्याखाली चालविण्यात येणाऱ्या रशियासारख्या राज्यातही असते. ( फक्त त्याला ‘ आर्थिक लोकशाही ’ म्हणायचे ) आणि लष्करी दडपशाहीच्या सहाय्याने राज्य करणाऱ्या पाकिस्तानमध्येही ‘ मर्यादित लोकशाही ’ असते. ही झाली दोन ठळक उदाहरणे पण इतर तथाकथित लोकशाही समाजातही हीच स्थिती आहे. समाजवाद आणि साम्यवादाचीही काही वेगळी कथा नाही.

अर्थात या सगळ्या गोंधळाचे किंवा फसवाफसवीचे वर्णन कोणी केलेच नाही असे नाही; पण यातही गंमत अशी की, अमेरिकेच्या उणिवांबद्दल रशियन विचारवंत लिहितात किंवा रशियातील हुकुमशाही राजवटीचे वर्णन अमेरिकेतील पंडित करत असतात. या सगळ्यापासून अलिप्त, काहीशा तटस्थ दृष्टिकोनातून मानवजातीबद्दलचे मूल्यमापन उद्‌बोधक ठरू शकेल. श्री. ज. शां. देशपांडे यांनी असा एक प्रयत्न करून पाहिला आहे; पण तो करताना शास्त्रीय विश्लेषणाचा आधार त्यांनी घेतलेला नाही. काहीशा हलक्याफुलक्या पद्धतीने आणि उपरोधाच्या अंगाने त्यांनी ही चिकित्सा केली आहे. पण म्हणून त्याचे महत्त्व कमी होत नाही. उलट आपल्या विनोदी आणि उपरोधिक सुरात लेखक सहजपणे अनेक सत्य मार्मिकपणे सांगून जातो. ‘ जगाचे ओझरते दर्शन–काल, आज, उद्या ’ या २६ लेखांच्या संग्रहामध्ये श्री देशपांडे सर्व प्रकारच्या समाजांबद्दल काहीनाकाही टिपणी करतात.

‘ कम्युनिस्ट जगातून प्रवास ’ या लेखात रशियातील प्रशासन, घटना बांधणीची पद्धत, वाहातूक, कुटुंबपद्धती, शिक्षण, रशियन महिला, भाषा व संस्कृती, धर्म अशा अनेक अंगांचा ओझरता उल्लेख लेखकाने केला आहे. भारत, अमेरिका, व्हिएतनाम, मंगोलिया या देशातील परिस्थितीबद्दल स्वतंत्र लेखांद्वारे तर ‘ उरलेले जग ’ या लेखात इतर अनेक देशातील मानवी प्रवृत्तींचे वर्णन लेखकाने केले आहे.

विकसनशील राष्ट्रांचे दारिद्र्य व त्यांना कोट्यावधी रुपयांची मदत करणारी धनिक राष्ट्र यांच्यातील संबंधांबद्दल लेखकाने एक महत्त्वाचे विदारक सत्य सांगितले आहे. विकसनशील राष्ट्रांचा विकास ( ! ) यावर लेखकाने लिहिले आहे युनोसारख्या जागतिक संस्था व जागतिक बँका कर्ज व तज्ज्ञ पुरवतात; पण मदत करण्यामागचा मुख्य हेतू या विकसनशील राष्ट्रांना मिंधे करणे हा असतो. एका पदार्थाची निर्मिती १० प्रक्रियांनंतर होत असेल तर आरंभापासून सर्व प्रक्रिया करणारा प्रकल्प विकसनशील राष्ट्रात कुणी उभारणार नाही. मग या राष्ट्रांचे पुढारी ऐटीत सांगत असतात, आमच्या कारखान्यात ९५ टक्के सामुग्री आम्हीच बनवतो; पण ५ टक्के बाहेरून येणाऱ्या गोष्टी आल्या नाहीत तर कारखाना बंद पडेल हे कोणी सांगत नाही.

इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, भारत हे देश लोकशाही राज्यव्यवस्था असलेले देश मानले जातात. येथे खरी लोकशाही आणि स्वातंत्र्य आहे काय ? याचा आढावा घेताना लेखक म्हणतो, ‘ पूर्वी प्रत्येक मतदाराला उमेदवार माहीत असे. नावलौकिकावर पैशाने गरीब असलेले लोकही पूर्वी निवडून येत असत. आता मोठमोठे राजकीय पक्ष निर्माण होऊन पक्षाची यंत्रे उमेदवार ठरवतात. बहुसंख्य मतदार उमेदवाराचे तोंडही बघत नाहीत. प्रचाराच्या गदारोळात मानवाची विचारशक्ती नष्ट होते, किंवा विचारांच्याऐवजी भावनाच मनावर कब्जा मिळवतात.

लोकशाहीप्रमाणेच स्वातंत्र्याचाही अत्यंत मूलभूत असा विचार लेखकाने केला आहे. आजच्या माणसाला ‘ मी कोण ?’ याचा विचार करण्यासही वेळ नसतो. व्यक्ती समाजाशी कोणत्याही मर्यादेपर्यंत तडजोड करण्याची सवय स्वतःला लावून घेते, किंबहुना तशी ती लावून घेणे तिला भागच असते. आधुनिक जगात माणूस हा त्याची मालमत्ता किंवा अधिकार यावरून ओळखला जातो. या दोन गोष्टीं ज्याच्याजवळ नाहीत, त्याची किंमत शून्य. बुद्धिवादावर आधारित

नवीन समाजरचना करताना माणसाने सामाजिक बाबतीत विसंगतता ठेवली. त्यामुळे माणसाने जी यंत्रे व यत्रणा निर्माण केल्या त्यांचा तो क्षुद्र गुलाम बनला. स्वातंत्र्य आणि लोकशाही समाजामधली ही वस्तुस्थिती लेखकाने प्रत्येक प्रकरणातून निरनिराळ्या सदर्भात माडली आहे.

'संस्था व नवे सस्थानिक' या लेखात ढोंगी प्रवृत्तींचा अधिक कडक शब्दात लेखकाने परामर्श घेतला आहे. पूर्वीचे राजेरजवाडे व संस्थाने कालबाह्य झाली असली तरी नतर जगभर सर्वत्र गवतासारखी नवीन संस्थाने व संस्थानिक उगवले. सरकारी कचेऱ्या, समित्या, कारखाने, सहकारी संस्था, प्रयोगशाळा, विश्वविद्यालये; वृत्तपत्रे, साहित्य मडळे इत्यादी प्रत्येक सस्था संस्थान झाल्याने त्याचे सूत्रधार चालक हे आधुनिक संस्थानिक झाले. पूर्वीच्या राजे लोकाना आपल्या प्रजेबद्दल थोडातरी जिव्हाळा होता. नवीन संस्थानिकाच्यात त्याचा मागमूसही नसतो. आताच्या लोकशाहीत एक रुपया खाल्ला तर माणूस तुरुगात जातो; पण हे नवीन राजे बिनदिक्कत दिवसाढवळ्या लाखानी पैसे खातात. हल्लीच्या लोकशाहीतील या नव्या राजेशाही वर्गाचे अस्तित्व कसे शोषण करणारे आहे यावर प्रकाश टाकण्यास लेखकाचे वरील विवेचन पुरेसे आहे.

आधुनिक सस्कृतीवर टीका करणारे बहुतेकजण भूतकाळ किंवा प्राचीन संस्कृती अत्यंत श्रेष्ठ असल्याचे मानतात. विज्ञानाने लावलेले नवेनवे शास्त्रीय शोध आम्ही प्राचीनकाळीच लावले होते असा दावाही काही जण करतात. लेखक या टोकापर्यंत जात नसला तरी आधुनिक युगाच्या समस्यांबद्दल लिहिताना भारतातील प्राचीन समाजव्यवस्थेचा गौरवाने उल्लेख त्यांनी अनेकदा केला आहे हे विचारात घेण्यासारखे आहे. एका प्रकरणात लेखक म्हणतो, व्यक्तीचे स्वातंत्र्य व समाजाच्या गरजा याचा समन्वय साधला गेला पाहिजे ही गोष्ट भारतीय ऋषीनी अचूक ओळखली होती.

या लेखसंग्रहातील सर्वात मनोरंजक लेख 'आधुनिक व्यवस्थापन' हा आहे. 'माणूस'-मध्ये हा लेख मुद्दाम प्रसिद्ध करण्यात आला होता. कर चुकवेगिरी, उधळपट्टी, 'कागदी कामे', आत्मविहीन यंत्रणा, सल्लागारांचा सुळसुळाट हो आधुनिक व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये आहेत. आधुनिक व्यवस्थापनातील या प्रत्येक वैशिष्ट्याचे तपशीलवार वर्णन लेखकाने अत्यंत मार्मिकपणे केले आहे. केवळ मनोरंजनासाठी पुस्तके वाचणाऱ्यानाही हा लेख आवडेल.

आधुनिक व्यवस्थापनातील ठळक उणिवांचे हे उल्लेख भारताच्या आजच्या संदर्भातही मुद्दाम लक्ष देण्याजोगे आहेत. नव्या पंतप्रधानानी देशात आधुनिक व्यवस्थापन आणण्याचा किंबहुना त्याची सरसकट आयात करण्याचा जो प्रयत्न चालविला आहे तो भारताच्या दृष्टीने किती निरुपयोगी व निष्फळ आहे याचा गाभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

एकदरीत या सर्व लेखांचा सूर आधुनिक जगातील मानवी प्रवृत्तीची मार्मिक पद्धतीने चिकित्सा करण्याचा आहे. अर्थात इतर काही विषयावरील लेखही यात आहेत. 'थोरो–एक अमेरिकन विचारवंत', 'एका थोर मानवतावादी तत्त्वज्ञाचे कार्य', 'मगोलियाची चित्तवेधक सफर', इ. वास्तविक पुस्तकाची निर्मिती ही एखादा विशिष्ट विषय डोळ्यासमोर ठेवून करणं जास्त महत्त्वाच आहे. वर उल्लेख केलेले लेख पुस्तकात समाविष्ट करण्याचा मोह लेखकाने टाळला असता तर 'पुस्तक' म्हणून या लेखसंग्रहाचे महत्त्व अधिक वाढले असते. हे लेख निरनिराळ्या नियतकालिकामधून यापूर्वी प्रसिद्ध झालेच होते; पण त्याचे पुस्तक तयार करताना विशिष्ट भूमिकेवर आधारित अशी त्याची रचना व्हावयास हवी होती.

आधुनिक जगात माणूस कसा दिशाहीन झाला आहे हे लेखकाने निरनिराळी उदाहरणे देऊन दाखवून दिले आहे. ही पुस्तकाची 'थिम' आहे असे म्हणायला हरकत नाही निरनिराळ्या आधुनिक मूल्याच्या नावाखाली आपण काय काय करत असतो याचा शोध घेण्याचा लेखकाने केलेला प्रयत्न स्तुत्य असाच आहे विकसनशील राष्ट्रामध्ये केवळ जगण्यासाठी आवश्यक असलेली 'साधने' नाहीत आणि सर्वप्रकारची अत्याधुनिक साधने उपलब्ध असलेली राष्ट्रे जीवनाचे 'साध्य' शोधण्याचा प्रयत्न करताहेत. हा असमतोल हे पुस्तक वाचताना वारंवार जाणवतो.

जगातील अनेक देशांना लेखकाने भेटी दिल्या. तिथले वैयक्तिक, सामाजिक जीवन जवळून पाहिले आणि जिथे प्रवास करता आला नाही त्याची उणीव त्या भागाशी संबधित भरपूर वाचन करून भरून काढली. त्यामुळे खरोखर हे पुस्तक वाचल्यानंतर जगाचे ओझरते दर्शन घडवल्याचा आनंद मिळतो.

—निरंजन आगाशे

जगाचे ओझरते दर्शन
काल आज व उद्या
ज. शां. देशपांडे
प्रकाशक– ह अ भावे
पृष्ठे : १७६, मूल्य : ३६ रु.

# कवितेची स्वतंत्र वाटचाल –उगवाई

हा वसंत सावंतांचा दुसरा कवितासंग्रह अलिकडेच प्रसिद्ध झाला आहे. सुमारे दहा-अकरा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'स्वस्तिक' या सग्रहामुळे कवी म्हणून वसंत सावंतांचे नाव मराठी काव्यप्रांतात सुस्थिर झाले. १९६० नंतर मराठी कवितेने जी विविध वळणे घेतली त्यामध्ये निसर्ग कवितेची संपन्न परंपरा सिद्ध करण्यात ना. धों. महानोरांबरोबरच वसत सावंतांची कामगिरीही लक्षणीय आहे मुक्त मनाने निसर्गाचा अनुभव घेऊन त्याच्या रगरुपाची नादमधुर चित्रे रेखाटण्याची या दोघांची शैली, मराठी रसिकाना पूर्वपरिचित असलेल्या बालकवींच्या शैलीहून वेगळी आहे. तसेच स्वतःची पृथगात्म वाट शोधणारी, आपल्या व्यक्तित्वाचा ठसा उमटवणारी आहे, हे जाणकाराच्या लक्षात आले होते. महानोरानी अजिंठा परिसरातील निसर्ग रसशृंगारपूर्णतेने चित्रित केला तर वसंत सावंतांनी सह्याद्रीच्या परिसरातील निसर्ग श्रद्धायुक्त अंतःकरणाने सगुण साकार केला आहे.

पण वसत सावंतांच्या कवितेच्या पृथःगात्मेचा शोध घेण्यासाठी इतर एखादा

कवीशी तुलना करण्याची आवश्यकता आहे, असे नाही. त्यांच्या 'स्वस्तिक' आणि 'उगवाई' चा एकत्र विचार केला तरी दोन–अडीच दशकातील त्यांच्या कवितेची स्वतंत्र वाटचाल आणि पर्यायाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची समृद्धी लक्षात येते.

'स्वस्तिक' व 'उगवाई' ही त्यांच्या काव्यसंग्रहाची शीर्षके कवी सावंतांच्या श्रद्धाशीलवृत्तीची दर्शक आहेत. शुभसंचिताचे 'स्वस्तिक' भाळावर रेखले जावे अशी आकाक्षा कवीने पहिल्याच दर्शनी कवितेत व्यक्त केलेली आहे. सभोवतालच्या वादळी अंधारात निरंतर समईची ज्योत प्रज्वलित व्हावी ही शब्दयोजनाही त्याचीच द्योतक आहे. 'उगवाई' च्या प्रवेशपृष्ठावरील कवितेतील–

'मी रोज थोडा थोडा काळोख पितो
मी रोज मला नकळत उगवत जातो.'

हे उद्‌गारही वरील आकांक्षेशी समांतर आहेत. त्याच वृत्तीने कवी उगवाईमातेची प्रार्थना करतो : साता सकट समयी तिने आपल्या वशाचे रक्षण केले आहे, त्या पुण्याईवरच आपण जगत आहोत–

'आई, उगवाई
तुला फुटे सूर्यबिंब
तेणे माझ्या घरादारा
मला, अमृताचे कोंब'

कवीची ही श्रद्धावृत्ती त्याला भोवतालच्या अंधारातून वाटचाल करण्यास, काळोख पिऊन टाकण्यास, दुःखाचा उपशम करण्यास समईची ज्योत लावण्यास प्रेरणा देते.

सश्रद्धता हा कवी सावंतांच्या कविप्रकृतीचा स्थायिभाव आहे, याच्या अनेक खुणा त्यांच्या कवितांतून आढळतात. विठूच्या अभंग ओवीचा वारसा त्यांच्या पूर्वजांना मिळाल्याचा उल्लेख त्यांनी 'स्वस्तिक' च्या अर्पणपत्रिकेत केलेला आहेच. इतर अनेक कवितांतूनही त्याचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष निर्देश आहे. त्यांच्यादृष्टीने कधी निसर्गाचे प्रसन्नरुप परमेश्वरमय बनते–

'ही आंबोली 'आबोली' नसतेच, ते पृथ्वीचे अग असते चक्क परमेश्वर झालेले.' किंवा 'सुदरवाडी' हे गाव म्हणजे परमेश्वराला पहाटे पडलेले एक मधुरे स्वप्न असल्याचे कवीला जाणवते, तसेच 'सह्याद्रीच्या निळ्या धारेवर कळस उगवाई' चा त्यास आपल्या गावाची खूण पटवून देतो, या परमेश्वररुपाबरोबरच अनेक संतमहंतांची आठवण 'उगवाई' तील कवितातून ठळकपणे नोंदवली आहे. साटमबुवा, गैबीनाथ, सोहिरोबानाथ, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे संतांचे उल्लेख केवळ शोभादर्शक नाहीत तर कवीची अनन्यसाधारण निष्ठा त्यामागे आहे.

### लयबद्धता

'तुला शोधणारे होते संत, तुला गाठणारे महंत, मी सामान्य हाडामासाचा माणूस' ही जाणीव तीव्र स्वरूपात आहे. 'मधली भिंत' ही कविता या दृष्टीने प्रातिनिधिक मानता येईल. संतमेळ्यातील अनेकांच्या व्यक्तित्वाचा अचूक, समर्पक वेध घेऊन सर्वसामान्यांना वाटणारे पंढरीच्या वाटेचे आकर्षण कवीने अधोरेखित केले आहे.

'आज तुकाराम असता तर' ही वसंत सावंतांची काव्यसंमेलनातून विशेष गाजलेली कविता या संग्रहात समाविष्ट झालेली आहे. उपरोक्त सश्रद्धतेच्या संदर्भात या कवितेची आठवण काहींना होईल; पण ही कविता संत तुकारामाबद्दलची असली तरी तिचे आशयांग सर्वस्वी वेगळे आहे. तिची प्रकृती विडंबनात्मक स्वरूपाची आहे. तुकारामाबद्दलची सद्‌भावना हेच केवळ तिचे आशयकेंद्र नसून आधुनिक काळात कवी कलावंतांना ज्या यांत्रिक, साचेबद्ध व्यवहाराला सामोरे जावे लागते त्याबाबतचा उद्वेग या कवितेतून व्यक्त होतो. आकाशवाणी–दूरदर्शनचे अधिकारी, नियतकालिकांचे संपादक यांची खमंग रेवडी या कवितेत उडवलेली आहे. उपहास–उपरोधाची वीण पक्की जमल्यामुळे कविता वाचनीय बनते, रसिकांची टाळी मिळवते. विशेषतः तुकारामाचा आधुनिक अवतार हास्याची लकेर उमटवतो; पण सावंतांची ही काही दर्जेदार कविता नव्हे. जुन्या–नव्याचा अनाठायी, अवाजवी मेळ जुळवल्यामुळे विदुषकी वळणाचा विनोद साधला गेला तरी विवेकाचे भान सुटल्याने प्राचीन व अर्वाचीन मूल्यव्यवस्थांची गल्लत केली जाते. एकावरील अन्याय दर्शविताना दुसऱ्यावर अन्याय केला जातो. सुदैवाने या वळणाच्या आणखी काही कविता या संग्रहात नाहीत.

'आनंदगौरी', 'सुदरवाडी', 'ते गाव माझे' या काही लक्षणीय कविता कवीची मन.प्रकृती प्रकट करणाऱ्या आहेत. निसर्गसौंदर्याचा शुद्ध अनुभव प्रकट करणाऱ्या या कवितात सवेदनाचित्रे, सांस्कृतिक संदर्भ लयबद्धतेने प्रकट होतात; पण मधूनच नाटकी आविर्भाव डोकावून आधुनिक जगाल कोपरखळी मारण्याचा मोह कवीला टाळता येत नाही त्यामुळे कवितेचा मूळ आशयानुभव एकसंधतेने व्यक्त होण्यात व्यत्यय येतो.

'पाण्यावरती झाडे' सारखी कविता अधिक उत्कटतेने प्रकट होते. मूळ भावानुभव विस्कळीत न होता ससवेद्य व सतालपणे साकार होतो. 'झाड' ही प्रतिमा या संग्रहात तऱ्हेतऱ्हेने प्रकट झालेली आहे. 'स्वस्तिक' मध्ये जसे 'धुके' हा निसर्गघटक तसे या संग्रहात 'झाड' हा निसर्गघटक कवीला विशेषत्वाने भावलेला जाणवतो.

'पाण्यावरती झाडे आणिक झाडावरती पाणी
तळात कोठे झुळझुळ गोकुळ मलाच फुटतो गाणी'

अशी तनामनातून भावपालवी फुटून कवी झाडांशी समरसून एकरूप होतो. झाडाची वेदना ही त्याची वेदना बनते–

'...तुझे कचाकचा खांदे तोडले भररस्त्यात
त्यादिवशी प्रत्येकक्षणी मी हसमुसून रडलो...
त्या दिवशी पाखराना आधार उरला नाही,
सावल्याचे हिरवे गाणे लोपून गेले'

'झाडे बोलू लागतात, सलू लागे चंद्र मला' अशी त्याची अवस्था होते. कधी प्रकाशाने झपाटलेले झाड भेटते तर कधी 'झाडावरती चद्र आणखी समोर निळसर जळे दिवा' असा भास होतो.

'दूर्वांत उमटलेली टवटवीत दवफुले
म्हणतात मला 'आमचे मुके घे, आमचे मुके घे'
मुके घेताना कोसळे आकाश, चादणे होऊन'

कवीचे हे वृक्षप्रेम त्याला एवढे व्याकुळ बनवते की–

'ज्या गावात नसतात झाडे
ते गाव, मला कसे आपले उगाचच वाटते !'

किंवा

'दुःख दिले झाडा, त्याची धग माझ्या हाडाझाडातून वीज लवे भूमीहून खोल,
अबोलीचे बोल तसे दुःख माझे खोल'

असे हे कवीचे जगणेच झाडमय झाले

आहे–

'झाडात कोण बोले? माझ्यात कोण डोले?' हे कवीचे उद्‌गार अशा वेळी सार्थ ठरतात.'

झाडांप्रमाणेच 'घर' या संकल्पनेनेही कविमनाचा कब्जा घेतला आहे.

'घरांत मी या, घरांत मी पण, घरांत नाही.'

किंवा

'घरभिंतींना आभाळाचे आज दिली अपुली पुण्याई, निळी निळाई'

कविमनातील हे घर केवळ चार भिंतींचे नाही, व्यवहारातील घराने नाकारले तरी–

'घरानेच मला नाकारले भर शैशवात तेव्हापासून आभाळाने जवळ केले'

आणि अवघ्या विश्वातच संचार होऊ लागला, कवी म्हणून जडणघडण होऊ लागली. 'घरानेच मला नाकारले' ही कवीता कविमनाची समग्र भूमिका समजावून घेण्याच्या दृष्टीने फार अर्थपूर्ण आहे. तसेच 'आम्ही आकाश पहात आयुष्य घालवले' ही कविताही वास्तव जग आणि कविवृत्ती यांचे नातेसंबंध व्यक्त करणारी आहे. 'स्वर्गंधरामीलना' ची अनेक श्रेष्ठ कवींची आवडती संकल्पना या कवितेतही सूचित झालेली आहे.

कवी वसंत सावंतांच्या विविध रचनाबंधाचे काही आकर्षक नमुनेही 'उगवाई'-मध्ये नजरेत भरतात. 'उन्हाच्या गौळणी' चटपटीत अन् काहीसा नर्म उपहास करणाऱ्या म्हणून लक्षात राहतात. 'चाकरमान्याचा उखाणा', 'आहेस सर्व साक्षी' ही गझल, 'नि:संगाची लावणी' व काही ओवीसदृश्य रचना या वेधक आणि उत्कंठावर्धक असल्या तरी त्यामधून कविमनाची समरसता तात्काळ प्रत्ययास येत नाही.

तीच गोष्ट प्रेमकवितांबाबत जाणवते.

'माझ्या दारांतले गुलाब तोडल्यापासून
फिरून ती कधी आली नाही
आणि आता गुलाब दिले तरी ती येणार नाही!'

अशा संयमित प्रेमभावनांचे सूचन करणाऱ्या काही कविता या संग्रहात भेटतात. 'फास', 'उलघाल', 'तिघी', 'माझे माझ्याशी संभाषण', 'गौरी' यामधून प्रेमाची उत्कटता, व्याकुळता, विरहार्तता, अनाकलनीय ओढ या भावच्छटांचा संस्मरणीय प्रत्यय येत नाही. प्रणयाचे रंगढंग, प्रणयमुग्ध आतुरता, लडिवाळपणा वगैरे न्यासविन्यास प्रकट करण्याची मुळात उर्मी वेताचीच असेल तर तशी अपेक्षा धरणेही रास्त ठरणार नाही.

या उलट काही चिंतनप्रवण कविता वाचकाला अंतर्मुख करणाऱ्या आहेत. 'मी माणसाला शोधतो आहे' या कवितेतून बाह्य जगातील भ्रष्टता पाहून कवीचा उद्वेग उफाळून येतो, 'तुम्ही जेव्हा जाता' मधून सामान्यांचे कर्तव्य व नाकर्तेपणा बोचत राहतो तर 'माझे शिवशिवणारे हात' मधून भोवतालच्या विश्वात अनर्थाशिवाय काहीच हाती लागत नाही म्हणून खंत वाटत राहते. इतरही काही कवितांतून तत्कालीन घडामोडींच्या संदर्भातील प्रतिक्रिया नोंदवल्या जातात.

–सुरेश जोशी

उगवाई
वसंत सावंत
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
पृ : ९६, किंमत : २५/– रु.

---

## गारांचा पाऊस

शोभा भागवत

## पारिजाताला आंबे यावेत?

एका मोठ्या इमारतीचं बांधकाम चालू होतं. काही कामगारांना तिथेच राहण्यासाठी झोपड्या बांधून दिल्या होत्या. त्यातल्या एका झोपडीत एक कुटुंब रहात होतं. आई, वडील, चार मुलं. मोठा आठ–नऊ वर्षांचा मेहबूब त्याच्या छोट्या दीड वर्षाच्या बहिणीला पाठुंगळी घेऊन इकडे तिकडे जाताना नेहमी दिसायचा. मेहबूबचे केस कायम धुरकटलेले, पिंजारलेले. अंगावरचे कपडे मळके, फाटके. त्याची बहीण झरीना. डोक्याचा चमनगोटा. अंगात काहीतरी ढगळ अडकवलेलं. हातापायांच्या काड्या. मलूल चेहरा. मेहबूब त्या मानानी चलाख वाटायचा. तरी चेहऱ्यावर एक त्याच्या वयाला न शोभणारी चिंता कायम दिसायची.

एकदा मेहबूब आला तो डाव्या डोळ्याखाली जखम घेऊन, डोळा सुजून मिटला होता. जखम भाजल्याची होती. बरीच खोल होती. 'काय झालं रे?' विचारलं तर म्हणाला, 'आईनी चिमटा चुलीत तापवून डाग दिला.'

डागाचा नेम जरा चुकला असता तर मेहबूबचा डोळाच भाजला असता. डोळ्याखालच्या त्या जखमेचं ड्रेसिंग, उपचार बरेच दिवस केले. मेहबूब न चुकता ठरलेल्या वेळी झरीनाला पाठुंगळी घेऊन यायचा. औषध घ्यायचा. जखमेचं ड्रेसिंग करून घ्यायचा, काहीतरी खायचा, झरीनाला भरवायचा पुन्हा चालू लागायचा.

एक दिवस त्याला काय वाटलं कुणास ठाऊक, विश्वास वाटला असेल. बोलावंसं वाटलं असेल. म्हणाला,

'आमचा बाप दारू पिऊन येतो तेव्हा आईला मारतो. एकदा तर त्यानी लाकडाचं दांडकं तिच्या पाठीत घातलं ते मोडलं. तो आईला मारायला लागला की मी त्याला म्हणतो मारू नको; पण तो मला मारतो तेव्हा आई कधी म्हणत नाही त्याला मारू नको म्हणून. तिनी म्हणायला पायिजेल. हाय का नाय? मी किती काम करतो. झरीनाला सांभाळतो. माझे कपडे मीच धुतो. आईला काय लागलं तर आणून देतो. कधी नाय म्हणत नाही. तरी आई मलाच मारते. एकदा मी बाहेरून आलो तर मला धरून हा डाग दिला. मला वाटतं आपण पळून जावं. काय पण काम करावं. पैसे मिळवावे. मग एकदम मोठं झाल्यावर घरी यावं...'

मेहबूब खूप मनापासून बोलत होता. मधे मधे झरीनाला समजावत होता. खायला घालत होता.

घरात इतका तिरस्कार सोसणाऱ्या, मार खाणाऱ्या या जिवाच्या मनात आपल्या धाकट्या बहिणीबद्दल प्रेमाचा जिवंत झरा कसा वाहू शकतो याचं मी आश्चर्य करत होते मनात! आई वडील ह्या त्याच्या

गुणाचं कधी चीज करत असतील का ?

मुलांना डाग देण वगैरे प्रकार कदाचित सुखवस्तू घरात सर्रास घडत नसतील. पण इतर अनेक प्रकारे मुलांशी वाईट वागणं, शिक्षा करणं चालू असतच.

एका सभेत पालकांना सांगितल होतं, तुमच्या मुलाबद्दल बोला, तर प्रत्येकानी मुलांबद्दल तक्रारीच करायला सुरुवात केली. ठीक आहे ह्या तक्रारी ज्या मुलांच्या आहेत त्याचाच एक तरी चागला गुण सांगा असं अवाहन केल तरी त्याला प्रतिसाद येईना. पुन्हा तक्रारी सुरूच !

आपण काय दृष्टीनी आपल्या मुलांकडे पाहतो याचा पालकानी एकदा शांतपणे विचार करावा. 'अगदी ऐकत नाही हो भयकर वाड आहे' ह्या विधानाची दुसरी मुलाकडची बाजू असते 'त्याला स्वत:ची मतं आहेत मनात असेल तेच करून पहायची जिद्द आहे. प्रयोगशीलता आहे.'

खाण्याच्या बाबतीत तर मला अनेकदा अनुभव आलाय की मुलं फार शहाणी असतात. त्याना हव तेवढं ती बरोबर खातात. पोट जड झाल्याच त्याना लगेच कळतं. वर ताटातलं सपवण ह्या बधनापायी ती जास्त खात नाहीत.त्या त्याच्या समजशक्तीला दाद देऊन आपण घरात योग्य ते पदार्थ, त्याच्या हाताशी येतील असे ठेवले. तर खा रे बाबा खा रे बाबा म्हणून मागे लागायची काही जरूर नसते. आयाना इतर उद्योग नसणे, मुलाला खाऊपिऊ घातल म्हणजे आदर्श आई असण्याचं आपलं कर्तव्य पार पाडलं अशी समजूत असण, मुळात शरीरशास्त्र, आहारशास्त्र यांची पुरेशी समज नसणे अशी अनेक कारणं मूल खात नाही ह्या तक्रारी-मागे असतात.

मुलांच्या कित्येक बाबतीत तर मुलापासून आणि स्वत:पासूनही चार पावलं दूर जाऊन आपल्याला विचारच करता येत नाही. पालकत्वाबाबत अनेक अंधश्रद्धा मनात असतात. त्यात

- ओरडल्याशिवाय मुलांना कळत नाही.
- त्यांचा अपमान करणं हा आपला अधिकारच आहे.
- मारानी मुलं वठणीवर येतात.
- शिस्त म्हणजे आपण केलेले नियम मुलानी बिनतक्रार पाळण.
- शिक्षा केल्याशिवाय चूक कळत नाही.
- कोंडून टेवणं, घराबाहेर टेवणं, बांधून ठेवणं, उपाशी टेवणं, अबोला धरणं, टाकून बोलणं ह्या परिणामकारक शिक्षा आहेत.

अशा अनेक अंधश्रद्धा सुशिक्षित पालकाच्यासुद्धा मनात असतात असं करणं बरोबर नाही अस म्हटल तर त्याच्या मनात प्रचंड गोंधळ उडतो. मग वळण लावायचं कसं मुलांना ? हा प्रश्न त्याना भेडसावतो. असा गोंधळ उडतो याचाच अर्थ मूल वाढवण्याबद्दल पुरेसा विचार केलेला नाही आणि हा विचार करायचा, अभ्यास करायचा तर काही भाराभर पुस्तक घेऊन त्यात डोक खुपसून बसायला नको.

आपल्याला काय योग्य वाटतं आणि काय अयोग्य वाटत याच्या नैसर्गिक प्रेरणाच आपण मारून टाकतो. त्यामुळे मन आपल्याला योग्य सदेश देईनासं होतं. मुलाला उपाशी ठेवल्यावर तुम्हाला अस्वस्थ वाटतं ना? डोळ्यात पाणी येत ना ? मग नका करू असं मुलाला मारल्यावर तुमची झोप उडते ना ? मग नका ना मारू. मुळात आपण चुकीचं वागतो आणि वर ते मुलाला वळण लावण्यासाठी योग्यच असलं पाहिजे अशी समजूत करून घ्यायचा प्रयत्न करतो. सुधारण्याची संधी भरपूर असते. आपलं चुकलं हे मुलाजवळही कबूल करता येतं; पण तिथे पालक म्हणून आपला अहंकार आड येतो.

मेहबूबची कथा ऐकून आपण सगळे कळवळतो बिचारा म्हणतो काय हा आईचा दुष्टपणा म्हणतो. गरिबी म्हणजे पाप आहे म्हणतो. पण थोड्याफार प्रमाणात आपणही हा दुष्टपणा करत असतो. तेव्हा मुलाच्या चुका कोणत्या? शिक्षा करून काय होत ? आपल्या चुका कोणत्या? मूल वाढवण्याबाबत आपल्या मनात अंधश्रद्धा कोणत्या आहेत ? याचा जरा शांतपणे विचार करू या.

मूल म्हणजे लोखंडाची निर्जीव कांब आहे का ? ठोकून ठोकून वळण लावायला ? का वाढणारं रोप आहे ? त्याच्या मुळाची माती सैल केली, खतपाणी योग्य तेवढं वेळेवर दिलं, पुरेसं ऊन, पुरेशी सावली दिली, लागला तर आधार दिला, आणि त्याच्या त्याच्या वेगानी त्याला वाढू दिलं तर चुकेल का काही ? पारिजातकाच्या झाडाला आंबे लागावेत आणि फणसाच्या झाडाला चाफ्याची फुलं यावीत असं म्हणणं म्हणजे वळण का ? □

---

रंगभूमी

## वेगळा नाट्यविषय-समर्थ प्रयोगदर्शन असणारे 'सविता दामोदर परांजपे'

वि. भा. देशपांडे

---

शेखर ताम्हणे या नवोदित लेखकाने लिहिलेले 'सविता दामोदर परांजपे' हे सरळ व्यक्तिनामाचे शीर्षक असलेले नाटक प्रतिपदा-अनुभव याच्या वतीने नुकतेच रंगभूमीवर आणलेले आहे 'चीत्कार' नाटकानंतर मनोविश्लेषणात्मक, गंभीर प्रकृतीचे हे नाटक लक्षवेधी ठरणारे आहे.

नाटकाच्या शीर्षकावरून प्रेक्षकाच्या मनात विविध कल्पना तरंग निर्माण होणे शक्य आहे; पण हे नाटक केवळ सविता परांजपे नामक कोणा एका व्यक्तीचे नाही. तर सविता दामोदर परांजपेबरोबरच कुसुम अभ्यंकर आणि तिचा नवरा शरद असे तिघांचे आहे. शरदच्या जीवनात आलेल्या दोन युवती—एक सविता आणि दुसरी कुसुम-दोघी सख्ख्या मैत्रिणी. यातल्या सविताशी शरदचा विवाह न होता कुसुमशी होतो. ज्या दिवशी हा विवाह होतो त्याच रात्री सविता आत्मघात करून घेते. ही एक महत्त्वपूर्ण घटना नाटकाच्या पार्श्वकथेत आहे. जळीत सविता ही कुसुमच्या शरीर-मनात प्रवेश करते, तिला झपाटते आणि अधूनमधून तिला संत्रस्त करते. या सूत्रावर नाटकाचा डोलारा उभा आहे. कुसुमच्या पोटात कळा येणे किंवा मरणप्राय वेदना होणे आणि तिने गळ्यातले मंगळसूत्र काढणे ही सविता व्यक्त होण्याची किंवा कुसुमचे व्यक्तित्व भंग पावून सविताने ती जागा घेण्याची महत्त्वपूर्ण खुण असते !

व्यक्तिमनाचे दुभंगपण अथवा व्यक्तीची दुर्मनस्कता नाट्यमाध्यमातून पाहण्याची आपल्याला सवय आहे. प्रश्न असतो तो ही दुर्मनस्कता कोणत्या कारणासाठी, कोणत्या रूपात नाटककार आपल्यापुढे पेश करतो याचा ! या नाटकात कुसुमला सविताने झपाटणे हे मुख्य सूत्र आहे. पूर्वजन्म किंवा पुनर्जन्म याबाबत मानसशास्त्रज्ञही ठामपणाने सागू शकले नाहीत. त्याहीबाबतीत मतभेद मोठ्या प्रमाणात आहेत. तो वादग्रस्त मुद्दा बाजूला ठेवून नाट्यांतर्गत घटना प्रसंगांचा अन्वयार्थ लावायचा म्हटला तर हे झपाटणे, त्यातून येणारी गूढता याचा विचार महत्त्वाचा आहे. ज्या कुसुमला सविताचे व्यक्तित्व संत्रस्त करते आहे, त्या कुसुमला या घटनेचा नेमका अर्थ बराच काळ ध्यानी येत नाही. तिला होणाऱ्या वेदनांवर उपाय म्हणून तिने आणि तिच्या नवऱ्याने अनेक गोष्टी करून पाहिलेल्या आहेत. पण त्यात यश न आल्याने नव्याने कोणी 'काही सागितले तर ते करण्याची तयारी आहे. ती तयारी कुसुमची फारशी नाही पण शरदची आहे. अशाच नव्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून अशोक देशमुख नावाचा एक तरुण जो त्याच्या ओळखीच्यांपैकी कोणाचा नातेवाईक येतो आणि नाटकाच्या घडण्याला-कथानकाला गती येते.

नाटककाराने अशोकला आणून जशी नाट्यघटिताची गती वाढवली तशीच त्यामध्ये गूढता निर्माण केली. पण त्यामुळे शका वाढत गेल्या. जो अशोक एका महत्त्वाच्या विज्ञानसंस्थेत सहाय्यक संशोधक म्हणून काम करणारा आहे, हस्तज्योतिष जाणणारा आहे, त्याने अशीच एक परक्या कोण्या मुलीची झालेली अवस्था पाहिलेली आहे. या ठिकाणी प्रश्न असा निर्माण होतो की; विज्ञानाशी संबंधित असणारा, शास्त्र जाणणारा हा तरुण कुसुमच्या या बदलघटनेकडे विज्ञान दृष्टीने सातत्याने का पाहात नाही ? त्याच्या उपयाची दिशा विज्ञाननिष्ठ, सतर्क का राहात नाही ? कुसुमला जेव्हा पोटात दुखण्याचा त्रास आरंभित होतो तेव्हा तो ज्या पद्धतीने तिच्या समोर हाताचा पंजा किंवा तळहात दाखवून तिला काही प्रश्न विचारतो, काही माहिती वदवून घेतो त्या गूढतेचा नेमका अर्थ ध्यानी येत नाही. विज्ञानयुगात विज्ञाननिष्ठा असणाऱ्या व्यक्ती विज्ञानाच्या अधिष्ठित असलेले उपाय का योजीत नाहीत असे मनात येऊन जाते. अंधश्रद्धा आणि विज्ञाननिष्ठा यातील निवाडा नाटककाराने स्पष्टपणाने व्यक्त केलेला नाही. बराच काळ आणि विशेषत: नाटकाच्या अखेरीच्या टप्प्यात तो गुंता तसाच ठेवला आहे. तो जाणीपूर्वक ठेवला आहे की, नाटककाराची भूमिका स्वच्छ नाही याचा उलगडा होत नाही.

## लक्षवेधी संवाद

व्यक्तीला झपाटणे, व्यक्तीचे द्विस्तरावर व्यक्त होणे या गोष्टीबरोबरच नाटककाराने कुसुमला असलेली शरीरसुखाची अतृप्ती याही विषयाची जोड दिली आहे. या दोन्हीचा परस्पर संबंध दाखवण्याचा यत्न केला आहे. पण तो पुरेसा अन्वर्थक वाटत नाही. या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. त्यावरचे उपायही भिन्न आहेत. संभाव्य कारणांपैकी शरीरसुखाची अतृप्ती हे एक कारण असू शकते; पण त्या कारणपूर्तीने मूळचा प्रश्न संपणारा नाही. आणखी एक खटकणारी गोष्ट म्हणजे घड्याळजी असलेला अय्यंगार या पात्राची निर्मिती. ज्या सविताने शरद-कुसुमला त्याच्या लग्नात भेट म्हणून घड्याळ दिले होते, त्याचा एक विशेष संदर्भ अय्यंगारच्या वडिलांशी जोडलेला आहे. हा संदर्भ उपरा असूनही मान्य होण्यासारखा आहे; पण संदर्भ व्यक्त करण्यासाठी या पात्राची निर्मिती इतक्या उथळ-उपऱ्या पद्धतीने करण्याचे कारण नव्हते. सादरीकरणात तर हा अय्यंगार हास्य निर्मितीऐवजी हास्यास्पदच वाटला. मूळ लेखनातही तितकाच तो सुमार आहे. तो अधिक गांभीर्याने, वजन घेऊन यायला हवा.

या नाटकाबाबत अशा काही शंका, प्रश्न असले तरी नाटकाची गुणवत्ता कमी मानण्याचे कारण नाही. शेखर ताम्हाण यांनी एक चागला विषय नाट्यमाध्यमातून हाताळला आहे. कुसुम-शरद-अशोक अशा काही महत्त्वपूर्ण व्यक्तिरेखा ( आणि अर्थात अदृश्य असलेली सविता ) निर्माण करून कलाकारांना आव्हान निर्माण केले हे महत्त्वाचे. नाटकाचे पहिलेच लेखन काहीसे चाकोरीबाहेर जाऊन करणे ही एक स्वागतशील गोष्ट आहे. लेखकाकडून अधिक काही अपेक्षा कराव्यात असी परिस्थिती पहिल्या लेखनाने निर्माण होणे दुर्मिळ असते; पण ते इथे घडलेले आहे. जीवनाचा आणि रंगभूमीचा अनुभव जसजसा गडद होत जाईल तसतसा लेखनाचाही प्रत्यय येत राहील अशी आशा बाळगण्याइतकी जाण या नाट्यलेखनात आहे. संवादभाषेच्या बाबतीत तर विशेषत्वाने लक्षवेधी आहे.

वेगळा नाट्यविषय, आव्हानात्मक व्यक्तिरेखन असलेल्या या नाटकाला प्रयोगरूपाने उभा रहाण्यासाठी तितकाच चागला दिग्दर्शक आणि कलाकारसंच लाभावा लागतो. निम्मे अधिक यश त्यावर अवलंबित असते. तसे या नाटकाला लाभले. दिग्दर्शक आहे राजन ताम्हाणे. राजनला छोट्या छोट्या पण लक्षवेधी भूमिकांत आपण पाहिलेले आहे; पण व्यावसायिक नाटकात दिग्दर्शक म्हणून तो प्रथमच येत आहे. नाट्यलेखकाप्रमाणे याच्याकडूनही आणखी नव्या नाटकांच्या दिग्दर्शनाची अपेक्षा करावी इतकी मान्यतेची कामगिरी त्याने केली आहे. मुळातल्या नाट्यविषय — आशयाची जात ओळखून त्याला अनुकूल असे कलाकार निवडणे, ज्यावेळी कलाकार नाववाले असतात तेव्हा त्या दडपणाने बुजून न जाता त्याना दिग्दर्शन करणे हे अवघड असते. या ठिकाणी राजनची महत्त्वाची कामगिरी अशी की, नाटकाची गती आणि उत्कंठा कायम ठेवण्यासाठी पात्रांच्या हालचाली, विरचना, शब्द-संवादांची गती आदी गोष्टी त्याने प्रमाणबद्ध, परिणामकारक ठेवल्या आहेत. कोठेही नाटक अवघडलेले, कंटाळवाणे झाले नाही. रंगमंचाचा वापर पूर्णत: केलेला आहे. नेपथ्य आणि पार्श्वसंगीत याचा उपयोगही नाट्यपरिणाम वाढवण्यासाठी करवून घेतलेला आहे. नेपथ्य आहे बापू लिमये याचे. रंगभूमीचा दीर्घकाळ अनुभव असलेल्या बापूने नेपथ्य यथायोग्यपणाने केलेले आहे. घर त्रिस्तरीय ठेवून नाट्यपरिणाम घडविण्यासाठी ते आवश्यक तेवढे सोयीचे, सुटसुटीत केले आहे. प्रयोगदर्शनाला त्याने अडथळा होत नाही. फक्त एकच गोष्ट ध्यानात आली नाही ती म्हणजे वरच्या स्तरावर असलेल्या झोपण्याच्या खोलीचे दार ( एक तर प्रत्यक्षात ते दाखवले नव्हते, ते आहे असे गृहीत धरले तरीही ) सतत उघडे कसे ? कोणीही परका माणूस तिथे एकदम कसा जाऊ शकतो ?

पुरुषोत्तम बेर्डेने दिलेले पार्श्वसंगीत नाट्य-प्रयोगाचा परिणाम अधिक गडद करणारे होते. विशेषत: घड्याळाच्या आवाजासदृश असणारा टिक्‌टिक्‌ हा ध्वनी जसा कालसूचक वाटला तसाच गूढसूचकही. या पार्श्वध्वनीने वातावरण निर्मितीही चांगली केली.

कुसुम आणि शरदच्या मध्यवर्ती भूमिकेसाठी रिमा लागू आणि सुधीर जोशी हे दोघे होते असे म्हटल्यावर प्रयोगाची गुणवत्ता यांच्या अभिनयाने दुणावली हे निराळे सांगायला नको रिमाने पुरुष नाटकापासून अभिनेत्री म्हणून आपली प्रतिमा प्रथम श्रेणीच्या कलाकारात करवून ठेवलेली आहे. तिचे दिसणे, रंगमचावरचे वावरणे आणि मुख्यत: भूमिकेची समज विलक्षण ताकदीची आहे. तिच्या अभिनयातील परिपक्वता आणि त्यातून आलेली सहजता आपल्याला प्रयोगदर्शनात खिळवून टाकणारी आहे तिने या नाटकात कुसुम आणि सविता या दोन्ही व्यक्तिरेखा नेमकेपणाने पेश केल्या. कुसुमचा हसरा भाव, वेदना सहन करण्याची क्षमता आणि पोटदुखी सुरू झाल्यावर सविताच्या रूपाने येणारे वेगळे व्यक्तिमत्त्व यातला फरक तिने तपशिलात दाखवला. तसाच लक्षात राहतो तो सुधीर जोशी. गेल्या वर्ष–दोन वर्षात त्याने 'टूरटूर', 'पर्याय', 'शातेचं कार्ट', 'नांदा सौख्यभरे' इत्यादी नाटकातून विविधरंगी भूमिका करून आपल्या अभिनयगुणाचे सुखद प्रदर्शन केलेले आहे. त्याने या नाटकात शरदच्या भूमिकेत अस्वस्थ नवरा, प्रियकर, अशा वेगवेगळ्या छटा व्यक्त केल्या. आपल्या जीवनातील अव्यक्त भावनाची ओळख मुद्राभावाने करून दिली. त्याच्या भरीव, प्रसन्न चेहऱ्याचा उपयोग अनेक मुद्राभाव व्यक्त करण्यासाठी सहजपणाने होतो. ह्या दोघांच्या साथीला संजय मोने (अशोक देशमुख), मजू मालगुडे (नीता), सुनील शेंडे (डॉ. मलिक) हे कलाकार होते. या प्रत्येकाने आपापली भूमिका यथायोग्यपणाने केली. संजय मोने हा एक गुणी कलाकार असा वाटला की, त्याला एखादी मोठी भूमिका मिळायला हरकत नाही. सुनील शेंडेने केलेल्या डॉक्टरच्या भूमिकेला विशेष आव्हानात्मक काही नव्हते. खरे तर त्याचा वापर आहे यापेक्षा थोडा अधिक व्हायला हवा होता. मजू नीताच्या भूमिकेत दिसली योग्य; पण तिचे बोलणे आवश्यकतेपेक्षा अधिक लाडिक वाटले. त्याची इतकी गरज नव्हती.

वेगळा नाट्यविषय आणि त्याचे समर्थ प्रयोगदर्शन म्हणून 'सविता दामोदर परांजपे' पहाण्यासारखे आहे. □

चित्रपट

# सेन्सॉरबद्दल थोडं....

सेन्सॉर बोर्ड हे दूरदर्शनप्रमाणेच टिकेच्या माऱ्यातून सुटलेलं नाहीय. सेन्सॉरचा निर्णय अनुकूल, प्रतिकूल कसाही असो, या ना त्या कारणाने सेन्सॉरविरुद्ध टीका होतच राहते त्यातूनच सेन्सॉर बोर्ड असावे की नसावे असा नेहमीचा वादही नव्या पार्श्वभूमीवर नव्या उत्साहानं चघळला जातो. त्या निमित्ताने सेन्सॉर सेन्सॉरचं धोरण, सेन्सॉरची तत्व, सेन्सॉरची मार्गदर्शक सूत्र (guide lines) या साऱ्या गोष्टींचा ऊहापोह होतो. अर्थात हा वर्षानुवर्ष चालत असलेला रीतीरिवाज असला आणि त्यातून बाधीव–भरीव असं काही हाती लागलं नसलं तरी सेन्सॉर बोर्डचे अध्यक्ष बदलल्यानंतर मात्र सेन्सॉरची कार्यपद्धती आणि धोरणात होत गेलेल्या बदलानं सेन्सॉरविषयी विचार मात्र वेळोवेळी होण्याची संधी मिळत गेली. सेन्सॉर बोर्डचे नवे अध्यक्ष विक्रमसिंग यानी अध्यक्षपदाची सूत्रं हाती घेऊन अजून वर्षही पूर्ण झाल नाही तोच सेन्सॉरच्या धोरणात होत गेलेला बदल प्रकर्षानं जाणवायला लागला. साहजिकच या बदललेल्या धोरणाविरुद्ध काहीकडून नाराजीचे सूर उमटले तर काहीनी स्वागत केलं; पण एक गोष्ट खरी की, खुशीच्या सूरापेक्षा नाराजीचा सूर मात्र मोठा आहे. मुळात विक्रमसिंग याची सेन्सॉर बोर्डच्या अध्यक्षस्थानी नेमणूक व्हावी यालाच पहिल्यादा विरोध होता कारण विक्रमसिंग यांची चित्रपटसृष्टीला आणि सामान्य जनाना ओळख आहे ती 'फिल्मफेअर' या चित्रपट नियतकालीकाचे सपादक म्हणून, तसंच जवळ जवळ वीस वर्षांहून अधिक काळ नियमितपणे चित्रपटांची परखड समीक्षा करणारे समीक्षक म्हणून आणि एवढ्या मोठ्या कालावधीतील समीक्षामुळे विक्रमसिंग याची कलात्मक चित्रपटाना पोषक आणि व्यावसायिक चित्रपटांच्या विरोधात असलेली मतं जाहीर आहेत. आज चित्रपटसृष्टीत व्यावसायिक चित्रपटनिर्मात्याची सख्या जास्त आहे. तेव्हा विक्रमसिंग यांच्या नेमणुकीला मोठ्या प्रमाणावर आक्षेप घेतला गेला तर नवल नाही. व्यावसायिक चित्रपटनिर्मात्याच्या नाराजीला पुष्टी मिळाली ती अगदी अलिकडच्या काळात पुनर्विचार समितीकडे जाणाऱ्या चित्रपटांच्या संख्येत वाढ झाल्यानं कारण सर्वसाधारणपणे चित्रपट सेन्सॉर बोर्डकडे पाठवला जातो तेव्हा चित्रपट प्रदर्शित करण्याची तारीख ठरलेली असते; पण चित्रपट पुनर्विचार समितीकडे पाठवला गेला की या प्रक्रियेत वेळेचा अपव्यय होतो, ओघाओघानं चित्रपट प्रदर्शनाची तारीख पुढं ढकलावी लागते. त्यामुळं चित्रपट निर्मात्यावरचा आर्थिक बोजा वाढतो आणि या साऱ्यात चित्रपट निर्मात्याला जो मानसिक ताण सहन करावा लागतो तो आणखी वेगळाच चित्रपटनिर्मात्याच्या मनात धुमसणाऱ्या या असंतोषात भर घातली गेली ती 'औरतका इन्तकाम', 'आजकी आवाज' 'भीमा', 'कानून क्या करेगा' सारख्या चित्रपटावर बंदी घालण्याच्या मागणीचा सेन्सॉरनं लावलेला धडाका या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी केली होती ती या चित्रपटांमध्ये मोठ्या प्रमाणावर चित्रित केलेल्या हिंसाचार, गुन्हेगारी आणि अत्याचाराच्या आधारावर.

'आजकी आवाज' हा बी. आर. चोप्रा निर्मित आणि रवि चोप्रा दिग्दर्शित चित्रपट 'Death wish I' या परकीय चित्रपटाची सही सही नक्कल. आपल्या बहिणीवर होणारा अत्याचार उघड्या डोळ्यांनी पाहून बिथरलेला नायक या प्रकरणी पोलीस किंवा कायदा याची काही मदत मिळत नाही, हे पाहून आणखी बिथरतो आणि एक नाही, दोन नाही चक्क एकवीस खून करतो तरीही या माथेफिरू नायकाची भलावण करत पोलीस आणि जज्जच त्याच्या सुटकेची मागणी करतात. 'आजकी आवाज' मध्ये बहिणीच्या बलात्काराचा सूड नायक भाऊ घेतो, तर 'औरत का इन्तकाम' मध्ये स्वत:वर झालेल्या बलात्काराचा सूड नायिका स्वत:च गुंडांना मारून घेते आणि स्वत: आत्महत्या करते, 'कानून क्या करेगा', 'भीमा' सारखे चित्रपट कायदा आणि न्याय यांच्यावरचा लोकांचा विश्वास उडवणारे. चित्रपटांचा समाजावर भलाबुरा परिणाम होतो का नाही हा वादाचा विषय आहे; पण एक गोष्ट मात्र खरी की, चित्रपटातील गुन्हेगारीचा समाजमनावर परिणाम होतो आहे, समाजातील गुन्हेगारीचं प्रमाण वाढण्यास चित्रपट कळत नकळत कारणीभूत होत आहेत, हे वेळोवेळी प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यावरून नजरेस येत आहे. मुंबईच्या एका पोलीस कमिशनरनं गोरेगाव इथं

झालेल्या बलात्काराची पद्धत ही ‘इन्साफ का तराजू’वरून उचलली असल्याचं म्हटलं होतं. तर एका चित्रपट नियतकालीकानं चित्रपटावरून कल्पना घेऊन झालेल्या गुन्ह्यांच्या काहण्याही प्रसिद्ध केल्या होत्या. याच भूमिकेतून या चित्रपटांवर बंदी घालण्याची मागणी सेन्सॉरनं केली होती. या बाबतीत ‘आज की आवाज’ चित्रपट तयार करणाऱ्या चोप्रा गटातून अशी माहिती मिळते की, परीक्षण समितीच्या सभासदानी या चित्रपटाला काही कटस्‌सह ‘अे’ प्रमाणपत्र देण्याचं मान्य केलं होतं. फक्त त्यातील शेवटच्या कोर्टसीनविषयी परीक्षण समितीच्या सभासदाना काही शका होत्या व त्यासाठी कायद्याच्या दृष्टीकोनातून या प्रसंगाची तपासणी व्हावी, अशी सूचना केली होती; पण सेन्सॉर बोर्डच्या अध्यक्षांनी हा प्रश्न पुनर्विचार समितीकडे सोपवण्याच्याऐवजी चित्रपटावर एकदम बंदीच आणली. तसंच चोप्रा गटाच्या मते सेन्सॉरन या कोर्टसीनमध्ये जसे बदल करायला सांगितले होते तसे बदल करून सेन्सॉरबोर्डकडे नवी प्रिंट देण्यात आली होती; पण तरीही सेन्सॉरनं उलट अडवणुकीचच धोरण स्वीकारलं होतं. तर सेन्सॉर सदस्यांच्या मते चोप्रा यांनी कोर्टसीनमध्ये बदल न करताच प्रिंट पाठवली होती. बी. आर. चोप्रा हे स्वतः जवळजवळ दहा वर्षाहून अधिक काळ सेन्सॉर बोर्डचे सदस्य होते. त्यामुळं सेन्सॉरच्या तत्वांचं उल्लंघन होऊ नये, अशी पूर्ण काळजी घेतली होती आणि हा चित्रपट चित्रपटसृष्टीतल्या बड्या बड्या मडळींनी पाह्यला आणि त्यात आक्षेपार्ह काही आढळल नाही, असं ते छातीठोकपण सागत असले तरी ‘इन्साफ का तराजू’ आणि ‘आजकी आवाज’ दोन्ही चित्रपटाना सेन्सॉरचा विरोध होता.

‘आजकी आवाज’, ‘औरतका इन्तकाम’ वगैरे आजच्या काळातली उदाहरणं असली तरी बऱ्याच काळापूर्वी आलेल्या ‘शोले’चं उदाहरण कुणी विसरलं नसेल. ‘शोले’ चित्रपटही त्यातील हिंसाचारामुळेच. सेन्सॉरच्या कचाट्यात सापडला होता आणि या चित्रपटाला प्रमाणपत्र देण्याचं सेन्सॉरनं साफ नाकारलं होत. अभिनेता रणजित याच्या ‘लालच’ चित्रपटावरही सेन्सॉरनं बंदी घालण्याची मागणी केली होती. सेन्सॉर बोर्डचे *अध्यक्ष विक्रम सिंग याना* चित्रपटातील सेक्सचं वाढतं प्रमाण जितकं भिववत नाही, तितकी भीती चित्रपटातील वाढत्या गुन्हेगारी आणि हिंसाचाराची वाटते. कारण चित्रपटातील सेक्सच्या मुक्त प्रदर्शनाला आपल्या संस्कृतीमुळे म्हणा किंवा आणखी कशामुळे म्हणा पण मर्यादा आहेत; पण हिंसाचाराचं तस नाही. उलट या प्रकारच्या चित्रपटाचा प्रेक्षकवर्ग दणदणीत आहे. त्यामुळं या चित्रपटाची चलती आहे आणि म्हणूनच परदेशी चित्रपटांबरोबरच भारतातही अशा प्रकारचे चित्रपट मोठ्या प्रमाणावर तयार होऊ लागलेत. तसंच चित्रपटसृष्टीत होत गेलेल्या तांत्रिक प्रगतीमुळं सध्याच्या चित्रपटातला हिंसाचारही अधिक वास्तवतेच्या अंगानं जाणारा आहे आणि म्हणूनच अधिक अगावर येणारा आहे. सेन्सॉरच्या मार्गदर्शक सूत्रांचं तर उल्लंघन करणारा आहेच; पण समाजमतही बिघडवणारा आहे, *त्यामुळं अशा चित्रपटाविरुद्ध आज सेन्सॉरनं* कडक भूमिका घेतली असली तरी या चित्रपट निर्मात्यानी उपलब्ध वेगवेगळे मार्ग स्वीकारून सेन्सॉरच्या कचाट्यातून सुटका करून घेतलेली आहे. राजरोजपणे प्रदर्शित झालेले हे चित्रपट पाहून सामान्य लोकाना मात्र सेन्सॉरवरचा विश्वास उडायला लागला आहे.

## रिमेक–अस्पष्ट धोरण

कुठलाही प्रादेशिक चित्रपटाचा रिमेस हा स्वतंत्र चित्रपट गृहीत धरून परत सेन्सॉर करण्याचं सेन्सॉर बोर्डच धोरण स्वागतार्ह असलं तरी ते प्रत्यक्षात किती उपयोगी पडेल किंवा त्यामुळं चित्रपटातील वाढत्या हिंसाचाराला किंवा अश्लीलतेला कसा आळा बसेल शंकाच आहे. कारण ‘मेरी आवाज सुनो’, ‘इन्किलाब’, ‘अंधा कानून’ सारखे चित्रपट मद्रास सेन्सॉर बोर्डमध्ये माफक काटाकाटीसह पास झाल्याच्या पार्श्वभूमीवर याच चित्रपटाच्या रिमेकना सेन्सॉरकडून होणारा विरोध, सेन्सॉरविरुद्ध कडवेपणा तयार व्हायला कारणीभत होतो. चुकीची पुनरावृत्ती होऊ नये अशी सेन्सॉरची भूमिका असली तरी याचा परिणाम मात्र काहीसा उलटाच होतो. कारण चित्रपटातील हिंसाचाराला विरोध करण्याच्या सेन्सॉरच्या दृष्टिकोनामुळं चित्रपटात हिंसाचाराचे प्रसग जरूरीपेक्षा जास्त लाबीचे चित्रित केले जाऊ लागले आहेत. म्हणजे सेन्सॉरनं कटस्‌ दिले तरी थोडेफार प्रसंग चित्रपटात राहू शकतील तसच सेन्सॉरनं सुचवलेले बदल करून किंवा प्रसंग गाळून चित्रपट सेन्सॉर करून घेतला तरी चित्रपट प्रदर्शित करताना मात्र मूळ प्रिंटच दिली जाते. अशीही उदाहरणं आहेत. सेन्सॉर बोर्डलाही या गोष्टीची कल्पना आहे पण त्या बाबतीत पुढाकार घेऊन काही करणं हे सेन्सॉरला शक्य नाही.

रिमेकच्या बाबतीत सेन्सॉरचं स्पष्ट धोरण असलं तरी डब केलेल्या चित्रपटाच्या बाबतीत मात्र सेन्सॉरला हे अधिकार नाहीत. त्यामुळ मद्रासकडचे कित्येक सेक्सनं भरलेले चित्रपट सेन्सॉर बोर्डाला झक्कत पास करावे लागले आणि या चित्रपटाना आंबटशौकीन प्रेक्षकाची होणारी हुल्लड पाहता असे चित्रपट डब करण्याचं प्रमाणही वाढलं आहे.

‘माफीचा साक्षीदार’ हा अलिकडच्या काळातील प्रसिद्ध ‘जोशी अभ्यंकर’ खून खटल्याची पार्श्वभूमी घेऊन तयार करण्यात आलेला एक चित्रपट. अतिशय सब्जेक्टिव्ह *स्वरूपाचा हा चित्रपट सत्य खून खटल्यावर* आधारीत असल्यामुळ या चित्रपटात चित्रित केलेल्या प्रसगाना सेन्सॉरचा विरोध होता. सेन्सॉरनं या चित्रपटात काही बदलही सुचवले होते; पण आधीच सेन्सॉरच्या कात्रीत सापडल्यानं वाढलेल्या आर्थिक बोजामुळं हैराण झालेल्या निर्मात्याला आज तरी हे बदल करता येण शक्य नाहीच. परिणामी आज तरी हा चित्रपट अनिश्चित भविष्याच्या मोक्यात सापडलेला आहे. यावरून एक असा वेगळाच विचार डोळ्यासमोर येतो की, चित्रपटाची कथा अथवा मूळ विषय सेन्सॉर होणं आवश्यक ठरेल का? किंवा ते अधिक फायद्याचं होऊ शकेल का? कारण त्यामुळं निर्मात्याचा पैसा आणि वेळ दोन्हीवर गदा येऊ शकणार नाही; पण यातही अनेक कच्च्या गोष्टी आहेत कारण कथा किंवा मूळ *विषय ऐकून एकूण चित्रपट कसा उभा राहू* शकेल याची खात्री देता येत नाही आणि पटकथा सेन्सॉर करावी म्हणाव तर सेन्सॉरला सर्व बाजूनं हुलकावण्या देण्यात पटाईत असलेले चित्रपट निर्माते सेन्सॉरला दाखवलेल्या पटकथेनुसारच चित्रपट तयार करतील याची खात्री देता येत नाही. त्यामुळं सेन्सॉरचा त्रास दुप्पट होण्याचीच शक्यता जास्त, तेव्हा सर्व परिस्थितीचा विचार करता एक गोष्ट स्पष्ट जाणवते की, सेन्सॉरच्या मर्यादा उघडच आहेत. त्यामुळ सेन्सॉर चित्रपटसृष्टीला दिशा दाखवायला किंवा चित्रपटाचा दर्जा सुधारायला असमर्थ असलं तरी कमीत कमी सेन्सॉरचं काम नीट चालावं यासाठी चित्रपटसृष्टी आणि प्रेक्षक दोन्हींची मदत अपेक्षित आहे.

—शुभदा रानडे

## विधानसभा निवडणूक

पृष्ठ ५ वरून

दोन्ही पक्षांना मिळाल्या असत्या ! 'पुलोद' चा कार्यक्रम व घटक पक्ष यांच्या आधारे शहरी मतदार व शे. का. प. आणि कॉंग्रेस (स)चे तरुण कार्यकर्ते या जोरावर ग्रामीण मतदार सांभाळण्याचे कसब त्यांनी दाखवले.

'पुलोद'च्या घटकपक्षांपैकी उल्लेखनीय कामगिरी १२ जागा मिळवून शे. का. प. ने केली. जनता आणि भा. ज. प. ला जागा त्यांच्यापेक्षा जास्त मिळाल्या हे आकड्याचे गणित जितके खरे तितकेच फसवेही ठरू शकते. एकूण जागा लढविणे व त्या जिंकणे या हिशोबात शे. का. प. च सर्वात सरस ठरला. इतरांचे अनेक उमेदवार 'हमखास' येणार असे वाटत असताना सपशेल पराभूत झाले. पुण्यात विठ्ठल तुपे व अण्णा जोशी यांनी जेमतेम शेकड्याचे आधिक्य मिळवून जेमतेम पत राखली.

दोन्ही कम्युनिस्ट पक्ष गेली कित्येक वर्षे आहेत तेवढेच, म्हणजे प्रत्येकी दोन आमदार राखून आहेत. लाल निशाणचे नागनाथ अण्णा नायकवाडी व कामगार आघाडीचे तीन आमदार ही नव्या 'डाव्यांची' भर आहे. याशिवाय अंतुले, बरेच वर्षांनी शिवसेनेचे छगन भुजबळ हे चेहरेही आहेत. तसे फुटकळ बरेच काही आहे. कधी नव्हे ते एन्. डी पाटील 'निवडून' आले. तिरपुड्यांचा पडण्याचा वारसा त्यांच्या 'राजकुमारांनी' चालू ठेवला; पण सर्वात महत्त्वाचे आणि निर्णायक म्हणजे शेतकरी संघटना ! 'पुलोद'ला नासिक, धुळे जिल्ह्यात सर्वबहुसंख्य जागा मिळणे, वर्धामध्ये ६ जागा मिळणे हे लक्षणीय आहे. एवढेच नव्हे 'पुलोद'च्या विरोधातील माधवराव गायकवाड, सुदाम देशमुख हे कम्युनिस्ट उमेदवारही शेतकरी संघटनेच्या पाठिंब्यावर निवडून आले. शेतकरी संघटना 'दबाव गट' म्हणून काम करेल याचीच ही पॉझिटिव्ह चिन्हे !

हे झाले निवडणुकांच्या निकालाचे चित्र आणि चरित्र; पण बरेच प्रश्न यातून निर्माण होतात. महाराष्ट्र जसा देशाच्या मध्यभागी आहे, तसा राजकीय दृष्ट्याही 'मॉडरेट' आहे. दक्षिणेत विरोधक प्रबळ आहेत. तर उत्तरेत कॉंग्रेस (आय) ! १०४ जागा मिळवणारा 'पुलोद' विरोधी पक्ष म्हणून कितपत विधायक कामगिरी बजावेल ? पक्षांतरविरोधी विधेयकातील पळवाटेनुसार एक-तृतियांश सदस्यांनी पक्षत्याग केल्यास ते पक्षांतर ठरत नाही. याचा उपयोग किंवा दुरुपयोग होऊन मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीसाठी कॉंग्रेस (आय) व कॉंग्रेस (स) दरम्यान काही आयाराम-गयाराम किंवा फोडा व झोडा प्रकार होईल काय ? झाल्यास इतर विरोधी पक्षांची भूमिका काय राहील? डाव्यांची एकजूट हा नेहमीप्रमाणे 'ठराव' असेल का यातून एकत्रीकरणाची प्रक्रिया सुरू होईल ? आणि शेतकरी संघटना आपल्या हिताचे राजकारण प्रत्यक्ष विधानसभेत कशी राबवेल ? तज्ज्ञांच्या दृष्टीने अभ्यासाचे व मतदारांना उत्सुकतेचे असे अनेक प्रश्न आहेत, ज्याची उत्तरे भविष्यातच मिळतील !

□


५००+५ = ४००+५००

निवडक आणि दर्जेदार राजहंस प्रकाशने
आपल्या संग्रही ठेवण्यासाठी

**राजहंस ऑगस्ट '८४ योजना**

आपण ५०० रुपयांची ठेव ५ वर्षांसाठी राजहंस प्रकाशनाकडे ठेवल्यास व्याजाच्या मोबदल्यात ४०० रुपये किंमतीची राजहंस प्रकाशने आपणास मिळतील व ५ वर्षांनंतर ५०० रु. ची ठेवही परत मिळेल.

**शिवाय**

पुढील ५ वर्षांत प्रकाशित होणारी सर्व राजहंस प्रकाशने २५% सवलतीत सभासदांस मिळू शकतील. (पोस्ट खर्च सभासदांचा).

अपेक्षित सभासद नोंदणी झाल्यावर योजना बंद होईल.


**सविस्तर योजना पत्रक मागवा.**

**राजहंस प्रकाशन**
१०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०.
वेळ: सकाळी ११ ते ५
•
वा. र. गोडे, जोशीवाडी, चितळे पथ कॉर्नर,
४१, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई ४०० ०२८.
वेळ: दुपारी २ ते ७

PAN ADS

विज्ञान

# धान्याची साठवण




धान्याची नासधूस कशी थांबवावयाची हा माणसापुढील फार मोठा प्रश्न आहे. सध्या जगात सर्व लोकसंख्येला पुरेल एवढे धान्य पिकते पण किडे, आळ्या, पाखरे, उंदीर, घुशी यांच्यामुळे प्रचंड धान्य वाया जाते. एकट्या भारताचा विचार केला, तर पिकलेल्या धान्याच्या वीस टक्के धान्य वाया जाते असा अंदाज आहे. आपल्या देशातील उंदरांची संख्या लोकसंख्येपेक्षा कितीतरी जास्त आहे.

आशिया-आफ्रिका खंडातील कित्येक देशात एकसारखे दुष्काळ पडत असतात. इथिओपिआचे उदाहरण अगदी ताजेच आहे. अन्नधान्याचा पुरेसा साठा असेल तर जगातील कोणत्याही जगात अन्नाविना माणसे मरायचे कारण नाही. अर्थात धान्याच्या वाहतुकीचेही प्रश्न आहेत. अमेरिका, कॅनडा, फ्रान्स इ.सर्व राष्ट्रे मोठमोठ्या हौदातून पाणी भरल्यासारखे धान्य नेतात; पण दुष्काळी देशात ते मानवी मजूरांकरवी पोत्यांत भरून पुढे पाठवावे लागते. त्यात फार वेळ मोडतो. त्यापेक्षा दुष्काळप्रवण प्रदेशातच साठे उभारता आले तर?

इस्राएलमध्ये व्होलकॅनी इन्स्टिट्यूट नावाची एक संस्था आहे. तेथील संशोधक श्री. जोनॅथन डोनाहे यांना असे वाटते की, बहुतेक दुष्काळी प्रदेश वाळवंटी आहेत व ते धान्यसाठा करण्याला अगदी योग्य आहेत. खुद्द इस्राएल हाही बव्हंशी वालुकामयच आहे. परंतु तेथील लोकांनी अभ्यास, जिद्द व अत्यंत परिश्रम करून वाळवंटी प्रदेशातून अनेक पिके, विपुल प्रमाणात काढण्याची किमया साध्य केली आहे. अन्नधान्याच्या बाबतीत हे ज्यू राष्ट्र स्वावलंबी तर आहेच पण ते धान्याची निर्यातही करू शकतात. स्वाभाविकच इस्राएलला धान्याच्या साठवणाची व रक्षणाची फार काळजी घ्यावी लागते. व्होलकॅनी इन्स्टिट्यूटमध्ये धान्याची साठवण व रक्षण यांचे संशोधन करणारा मोठा विभाग आहे.

वाळवंटांत दिवसाचे तापमान खूप जास्त. ४०° से पेक्षा अधिक असते तर रात्रीचे तापमान खूप कमी, काही ठिकाणी ०°से. पेक्षाही कमी असते. या नैसर्गिक गोष्टींचा उपयोग करून घेता येईल असे श्री. डोनाहे यांचे मत आहे. त्यांनी चिवट प्लॅस्टिकच्या आवरणाखाली धान्याचे मोठे साठे केले. तंबूत ठेवलेल्या ढिगासारख्या या धान्यांतून रात्रीची थंड हवा मोठमोठ्या जोरदार पंपांनी व्यवस्थित खेळवली. ०° ते १०° से. तापमानात अळ्या, किडे यांची वाढ खुंटते. त्यामुळे वरील तंबूतील धान्य फारशी नासधूस न होता शिल्लक राहू शकते. अर्थात दिवसाच्या उष्णतेने धान्य तापते; पण धान्य उष्णतेचे मंदवाहक असल्याने वरचा थर तापला तरी आत धान्य थंडच राहते. उन्हाळ्यात तापमान काही वेळा ४८° से. पर्यंत जाते. त्या वेळची गरम हवा धान्यातून खेळविल्यास पुष्कळशी कीड मरून जाते.

अनेक कारखान्यांत निरुपयोगी कार्बनडाय ऑक्साइड तयार होत असतो. कारखाने हा वायू मोठ्या प्रमाणावर हवेत सोडून देतात. व्होलकॅनी इन्स्टिट्यूटच्या शास्त्रज्ञांनी या फुकट जाणाऱ्या कार्बन डाय ऑक्साइडचाही उपयोग करून घेण्याचे ठरविले. नैसर्गिक वातावरणात ऑक्सिजनचे प्रमाण १८ ते २० टक्के असते. त्यावरच पृथ्वीवरील सर्व जीवजिवाणू जगतात. इस्राएली शास्त्रज्ञ हजारो टन धान्य साठवलेल्या पॉलिथीनच्या पिशव्यांमध्ये कार्बन डाय ऑक्साइड सोडतात व आतली हवा जास्तीत जास्त काढून टाकतात. त्यामुळे आतील सर्व किडे, अळ्या, पाखरे, उंदीर, घुशी...असे सर्व प्राणी गुदमरून मरतात.

काही प्राचीन व पारंपारिक पद्धतींचाही नीट अभ्यास केला पाहिजे. 'सतत सात वर्षे दुष्काळ पडला तरी जोसेफच्या लोकांना धान्य पुरले.' असा बायबलमध्ये उल्लेख आहे. जोसेफने धान्य साठविण्यासाठी कोणता उपाय योजला होता? श्री. डोनाहे यांच्या संशोधनानुसार आजसुद्धा बदाऊनी लोक जोसेफचीच पद्धत वापरत असावेत. बदाऊनी लोक टेकडीच्या माथ्यावर मोठा लांबरुंद खड्डा खणतात. कडक उन्हाने तो कोरडा ठणक झाल्यावर त्यात धान्य भरतात. धान्यावर गवत व काटक्या पसरून त्यावर विशिष्ट चिकण मातीचा पातळ थर पसरून देतात. वाळवंटी प्रदेशात पाऊस खूप कमी पडतो. त्या पावसाने चिकण माती ओली झाली की तिचा घट्ट पापुद्रा तयार होतो व आत धान्य सुरक्षित राहू शकते.

भारतातील कृषी-तज्ज्ञांनीही येथील हवामानाला योग्य ठरेल अशी धान्य साठवणाची पद्धत, स्थानिक पातळीवर शोधून काढली पाहिजे. धान्यावर कोणतीही रासायनिक द्रव्ये उडवणे हे शक्य तो टाळले पाहिजे.

## ऊष्ण पोषाख

पोलिस, सैनिक, वैमानिक व इतर अनेक लोकांना भल्या पहाटे १५। २० किलोमीटर किंवा अधिक अंतरावरील आपल्या कामाच्या ठिकाणी हजर रहावे लागते. तेवढे अंतर जाण्यासाठी हे लोक सामान्यपणे फटफटी, स्कूटर, मोपेड असलेल्या दुचाकी वाहनांचा उपयोग करतात; पण आधीच थंडी आणि त्यात वेग त्यामुळे फार गारठायला होते. हात, पाय, कान इत्यादी अवयव नुसते गोठून जातात.

या लोकांसाठी आता एक विद्युत्-पोषाख तयार झाला आहे. या पोषाखात दोन अस्तरांच्यामध्ये विद्युत् वाहक तारांचे जाळे असते. त्या सर्व मंडलांची टोके खिशातील एका प्लगला जोडलेली असतात तो प्लग वाहनाच्याच बॅटरीला जोडता येतो. वाहनात बसून प्लग जोडताच १० सेकंदात पोषाखाचे तपमान २८° से. असे उबदार होते. पोषाख अत्यंत साधा, सुरक्षित असून साध्या पाण्याने धुता येतो व त्याला इस्त्रीही होते.

—भा. रा. बापट

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–28

इंदिराजींना गोळ्या घालणारे
त्यांच्या विश्वासातले त्यांचेच अंगरक्षक..

□

राष्ट्रीय गुपितांचा
आंतरराष्ट्रीय बाजार मांडणारे
वरिष्ठ सरकारी अधिकारी...

□

स्वतःच्या प्राणापलिकडे ज्यांनी
विश्वास आणि निष्ठा जपायची
ती ही माणसं अशी आडवाटेला
का बहकली ?

कोण आहेत ही माणसं ?

सारा देश हादरवणारी
ही दोन कारस्थानं

त्यांनी केव्हा, कशी रचली ?
त्यापाठीमागचे सूत्रधार कोण ?
त्यांच्या जबान्या काय सांगतात ?...
यातून त्यांनी कमावलं काय ?
देशानं गमावलं काय ?

या दोन प्रकरणांचा शोध,
अस्वस्थ करणारा...

भरपूर छायाचित्रांसह
प्रकाशित झाले.

पहा व सवलतीत घ्या.

शिरीष सहस्रबुद्धे

मूळ किंमत : ४० रुपये
सवलत किंमत : २८ रुपये
सवलत ३१ मार्चपर्यंत.

राजहंस प्रकाशन
पुणे

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.